
म. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. नं. [illegible]

# राव महाराज



REFBK-0004831

वि. पां. दांडेकर

४७८

कै. विनायक लक्ष्मण  भावे, चरित्र माला

पुस्तक ३ रें

# श्रीमंत सयाजीराव महाराज

[ व्यक्ति आणि कार्य ]

लेखक–वि. पां. दांडेकर, एम्. ए. बडोदें

REFBK-0004831
4839

प्रकाशक–गणेश महादेव आणि कंपनी–पुणें शहर

किंमत ८ आणे

मुद्रक व प्रकाशकः—गणेश महादेव वीरकर
साहित्य-सेवक छापखाना, ६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर
मार्च, १९३३

[ या व पुढील आवृत्तींचे हक्क प्रकाशकांकडे आहेत ]

४५८
६५५०
सं. नं. ४५६ १५-७-३३

पितृसदृश महाराज

## श्रीमंत सयाजीराव गायकवाड

यांच्या चरणीं सादर समर्पण

नम्र सेवक

**वि. पां. दांडेकर**

# प्रस्तावना

गेल्या पाऊणशे वर्षांच्या हिंदुस्थानच्या इतिहासांत ज्या थोड्या व्यक्तींनीं अहर्निश प्रयत्न करून भरीव व लोकोपयोगी कार्य करून दाखविलें, व अद्यापि दाखवीत आहेत, अशा थोड्या महानुभावांत श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांची गणना अवश्य करावी लागेल. महाराजांच्या समाजसेवेचें क्षेत्र दिसायला लहान असलें तरी तिचा परिणाम दूरदूरच्या प्रांतांत झालेला स्पष्ट दिसतो. डोंगरमाथ्यावर पडलेला पाऊस जरी एका विशिष्ट नदीच्या मार्गानें वाहून गेला तरीं त्याचे ओघळ डोंगरांत जागजागीं सुरूच असतात. बडोदें संस्थानापुरता जरी महाराजांच्या सुधारणांचा प्रत्यक्ष अंमल होत असला तरी त्यांचा परिणाम इतरहि आढळतोच आढळतो. सद्विचारांचा प्रभाव चांगल्या निरोगी हवेप्रमाणें न दिसणारा पण परिणामानें जाणण्याजोगा असतो. महाराजांनीं गेल्या पन्नास वर्षांत घडवून आणलेल्या सामाजिक, शिक्षण विषयक, औद्योगिक, धार्मिक व इतर सुधारणांचा परिणाम इतरत्र त्यांच्या अनुकरणांत झालेला दिसतो. अमुक सुधारणा बडोद्यानें प्रथम करावी व मग इतरांनीं तिचें अनुकरण करावें, असा प्रकार गेल्या २५।३० वर्षांत अनेक वेळां अनेकांनीं घडलेला बघितला असेल. याचें श्रेय जर कोणाला द्यायचें असेल तर तें श्रीमंत सयाजीराव महाराज यांनाच दिलें पाहिजे. पुढें काय घडेल याचा नक्की अंदाज त्यांना असतो. त्यामुळें एखाद्या द्रष्ट्याच्या ( Seer ) भूमिकेवर उभे राहून ते उपाययोजना किंवा सुधारणा करीत असतात. आणि यामुळें ते क्वचितच चुकतात.

गणेश महादेव आणि कंपनीच्या 'यशवंत' मासिकाकरितां एक शब्दचित्र मी लिहिण्यास घेणार तोंच, अशा थोर पुरुषाचें अल्पसें स्वतंत्र चरित्रपुस्तकच प्रकाशित करण्याची कल्पना गेल्या पंधरा दिवसांतच गणेश महादेव आणि कंपनीचे चालक माझे मित्र श्री. ग. म. वीरकर यांस सुचून मला पत्रानें कळविलें; त्यांचा माझा ऋणानुबंध लक्षांत घेऊन त्यांनीं सुचविल्याप्रमाणें मी चरित्र लिहून देण्यास कबूलहि झालों. नफ्याकडे विशेष दृष्टि न ठेवतां, कै. भावे चरित्र मालेचीं थोरांचीं थोडक्यांत व आवाक्यांतील किंमतीचीं हीं पुस्तकें प्रकाशित करण्याची त्यांची कल्पना निःसंशय अभिनंदनीय आहे. अशा या प्रयत्नाला महाराष्ट्रीयांनीं सक्रिय सहानुभूति दाखविली पाहिजे, हें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं.

वर सांगिल्याप्रमाणें हें चरित्र लिहिण्याची कल्पना आयत्यावेळीं ठरली. लिखाण बडोद्यास सुरू तर छपाई पुण्यास चालू! पृष्ठसंख्या लहान पण मर्यादित, अशा स्थितींत, श्रीमंत महाराजांना हें पुस्तक मनोभावें अर्पण करून आदर व्यक्त करण्याची येथील वहिवाटीनुसार मामुली व पद्धतशीर परवानगी मिळविणें आयत्यावेळीं अशक्य झालें. परंतु त्यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचेवर चोंहीकडून शुभसुमनांचा वर्षाव होत असतांना, शुद्ध व सात्विक हेतूनें प्रेरित होऊन, परवानगी न घेतां, त्यांना अर्पण केलेल्या या चरित्रसुमनाचा अहेर महाराज खचित झिडकारणार नाहींत, या आत्मविश्वासानें हें पुस्तक त्यांनाच अर्पण केलें आहे.

या चरित्राकरितां फिलिप सार्जंटकृत The Ruler of Baroda, स्टॅनले राईसकृत Life of Sayajirao III, Baroda Gazeteer वगैरे पुस्तकांचा मला बराच उपयोग करून घेतां आला त्याबद्दल या पुस्तकांच्या कर्त्यांचा मी फार आभारी आहें.


वडोदें
१७-३-३३

वि. पां. दांडेकर

६०७० सं. १५।१।३३

# अनुक्रमणिका

प्रकरण १ लें—गोपाळरावाचे सयाजीराव .... ९
प्रकरण २ रें—बडोद्यांतील बेबंदशाही .... १५
प्रकरण ३ रें—शिक्षणाची सुरवात व शेवट.... २४
प्रकरण ४ थें—अधिकार प्राप्ती .... ३८
प्रकरण ५ वें—राज्यतंत्र कीं राज्ययंत्र .... ४५
प्रकरण ६ वें—गृहसौख्य .... ५१
प्रकरण ७ वें—बापट कमिशन .... ६२
प्रकरण ८ वें—इ. स. १९११ .... ७५
प्रकरण ९ वें—सुधारणा .... ८३
प्रकरण १० वें—आवडीनिवडी व स्वभाव .... १११
प्रकरण ११ वें—आठवणी व आख्यायिका .... १२०



श्रीमंत सयाजीराव महाराज

# श्रीमंत सयाजीराव महाराज

## प्रकरण पहिलें

## गोपाळरावाचे सयाजीराव

इ. स. १८७५ च्या मे महिन्यांत मनमाडपासून अठरा मैलांच्या अंतरावर असलेल्या कवळाणा नांवाच्या गांवांत एक मनोवेधक व आश्चर्यकारक प्रसंग घडला. कवळाणा गांव किती लहान. शे दोनशे घरांच्या वसतीचा. तेथील गरीब गांवकऱ्यांच्या आयुष्यांत आश्चर्यापेक्षां येथून तेथून सारखेपणाच पसरलेला ! सूर्यानें रोज सकाळीं उगवावें व संध्याकाळीं अस्तास जावें किंवा तारकांनीं रोज रात्रीं आपले नेत्र उघडावे व सकाळीं मिटून घ्यावे—अशा प्रकारच्या सतत व एकसारख्या घडणाऱ्या गोष्टीच कवळाणेकरांनीं पाहिलेल्या. त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं बदल बघितलेला खरा; पण तो ऋतुमान व कालमानाप्रमाणें घडलेला.

पण आजचा प्रसंग कांहीं औरच. कवळाणेकरांनीं सकाळीं उठून पूर्वेकडे असलेल्या सूर्याचें दर्शन घेतलें व गांवाच्या शिवेकडे बघितलें तों काळे डगलेवाले पोलिस गांवाकडे येत असलेले त्यांना दिसले. गांवकऱ्यांना साहजिकच आश्चर्य वाटलें. अजूनहि एखाद्याच्या दाराशी

पोलिस आला कीं, शंका, आश्चर्य, भीति या भावना एकाच वेळीं आपल्या मनांत उद्भवतात. मग पन्नास साठ वर्षांपूर्वी पोलिसांना पाहून कवळाणे येथील ग्रामस्थांना काय वाटलें असेल याची कल्पनाच केलेली बरी. सर्व भयभीत व आश्चर्यचकित होऊन गांवाकडे येत असलेल्या पोलिसपार्टीकडे बघत राहिले. पोलिस गांवकऱ्यांच्या जवळ आले, त्यांच्याशीं बोलूं लागले, पण आश्चर्य हें कीं, त्यांच्या नजरेंत क्रौर्य किंवा वाणींत कठोरपणा लवमात्र दिसेना. त्यामुळें कांहीं घाबरलेले कवळाणेकरहि आपापलीं मुंडाशीं सांवरून धिटाईनें पुढें आले व पोलिसांच्या चवकशीला मदत करूं लागले.


पोलिसांनीं चवकशी केली ती काशिराव गायकवाड व त्यांच्या तीन मुलांविषयीं. हीं तीन मुलें म्हणजे आनंदराव, आपले चरित्रनायक गोपाळराव* व संपतराव हीं होत. आनंदरावांचें वय त्या वेळीं सतरा वर्षांचें, गोपाळरावांचें बारा वर्षांचें व संपतरावांचें दहा वर्षांचें होतें. या तीन मुलांना व त्यांच्या वडिलांना घेऊन पोलिस-पार्टी नाशिक येथें गेली. तेथें गेल्यावर कर्नल एथरीज यांनीं काशिरावांना जवळ बोलावून घडलेल्या प्रसंगावर प्रकाश टाकला. श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांना बडोद्याच्या गादीवरून पदच्युत करण्यांत आलें असून त्यांच्या जागीं योग्य व लायक वारस नेमण्याची हिंदुस्थान सरकारची इच्छा असल्याचें त्यांनीं सांगितलें. हें ऐकून काशिरावांना बरें वाटलें.

त्यानंतर कर्नल एथरीज व नाशिकचे कलेक्टर या दोघांनीं मिळून उपाध्यायांच्या साहाय्यानें काशिरावांच्या मुलांचा बडोद्याच्या गादीवर वारसाहक्क शाबीत होतो असें सिद्ध केलें. इतकें सर्व झाल्यावर काशिराव व त्यांचे तीन पुत्र यांना बडोद्यास पाठविण्यांत आलें.

* चरित्रनायक गोपाळराव यांचा जन्म कवळाणें येथें ता. १७ मार्च १८६३

तेथें काशिरावांचे बंधु* उखाजीराव आपला मुलगा दादासाहेब याच्या बरोबर अगोदरच आलेले होते. तेंव्हां खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाईसाहेब गायकवाड यांनीं आनंदराव, गोपाळराव, संपतराव व दादासाहेब या चार हक्कदारांपैकीं कोणालाहि दत्तक म्हणून घ्यावें असें ठरलें. त्यापैकीं आनंदराव व दादासाहेब हे दोघे वयानें मोठे म्हणून नवीन शिक्षणसंस्कार सुलभतेनें ग्रहण करायला अयोग्य असें समजून त्यांना एकीकडे सारण्यांत आलें. संपतराव अगदींच लहान असें मानून त्यांचाहि प्रश्न निकालांत काढण्यांत आला. राहातां राहिले गोपाळराव. जमनाबाईसाहेबांना गोपाळरावांची तरतरीत मुद्रा व पाणीदार डोळे हीं दोन्हीं पसंत पडून त्यांनीं गोपाळरावांना दत्तक घ्यावयाचें ठरविलें.

* उखाजीराव–काशिराव वगैरे मंडळींचा बडोद्याच्या गायकवाडांशीं कसा संबंध पोहोंचतो हें दर्शविण्याकरितां खालीं जरूरीपुरती वंशावळ दाखविली आहे.



या बाबतींत एक मजेदार गोष्ट बडोद्यांत प्रसिद्ध आहे, ती अशी:- आनंदराव, गोपाळराव व संपतराव या तिघांना जेव्हां जमनाबाई-साहेबांसमोर उभें करण्यांत आलें त्या वेळीं त्यांनीं तिघांनाहि कां आलांत असा प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचें उत्तर आनंदराव व संपतरावांना देतां आलें नाहीं; पण गोपाळरावांनीं "महाराजा होण्याकरितां आलों" असें स्पष्टपणें जमनाबाईसाहेबांना सांगितलें. हें पाहून त्या खूष झाल्या; व त्यांनीं गोपाळरावांना पसंत केलें.

वरील कथेंतील सत्यांशाबद्दल आम्हांला जबरदस्त शंका आहे. पण तें कांहींहि असलें तरी, जमनाबाई साहेबांनीं केलेली निवड मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकार या दोघांनाहि पसंत पडून ता. २७ मे रोजीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें काशिरावांनीं आपला मुलगा गोपाळराव जमनाबाईसाहेबांच्या मांडीवर दत्तक दिला. त्यानंतर उंची वस्त्रें परिधान करवून गोपळरावांना कँपमधून राजवाड्यांत नेण्यांत आलें. तेथें ब्रिटिश सरकाराचे प्रतिनिधि या नात्यानें सर रिचर्ड मीड यांनीं त्यांना तिसरे सयाजीराव म्हणून बडोद्याच्या गादीवर बसविलें. त्यानंतर ब्रिटिश सरकारकडून व बडोदें संस्थानाकडून तोफांची सलामी देण्यांत आली व अशा तऱ्हेनें हा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला.

यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणें कवळाण्याचे गोपाळराव बडोद्याचे सयाजीराव महाराज बनले ! केवढी अकल्पित व अघटित घटना ही ! कवळाणेकरांना ही बातमी समजली असेल तेव्हां त्यांना किती आश्चर्य व आनंद वाटला असेल ! आणि कोणालाहि आनंदाश्चर्य वाटावें असाच प्रसंग घडला. भाग्यवान् मनुष्याचें भाग्य नेहमीं अशाच फलप्रद गोष्टी घडवून आणतें. श्रीमंत सयाजीराव महाराज पुराणकाळांत जन्मास आले असते, तर हा सर्व प्रकार दैवी चमत्कार म्हणून सहज एखाद्या पौराणिक कथेचा विषय होऊन बसता; पण सध्याच्या बुद्धि-

प्रधान युगांतहि या घटनेला कांहीं कमी महत्त्व आहे असें नाहीं. अशाच प्रसंगांनीं मनुष्याच्या प्रयत्नांपलीकडे कांहीं तरी शक्ति आहे याची खात्री बरोबर पटते.

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचें चरित्र म्हणजे सद्भाग्य व सत्प्रयत्न यांच्या सुरुचिर संगमाचें सुंदर फळ होय. **दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषं**—हे उद्गार जितक्या उचित अभिमानानें कर्णानें उच्चारले असतील तितक्याच अभिमानानें, पण थोड्याशा निराळ्या अर्थानें ते सयाजीराव महाराजांनाहि उच्चारतां येतील. त्यांना राज्यपद मिळालें तें त्यांच्या सद्भाग्यामुळें यांत शंका नाहीं. पण स्वतःच्या राज्याला त्यांनीं जें पद प्राप्त करून दिलें आहे तें त्यांच्या अहर्निश सत्प्रयत्नांचेंच एकमेव फळ होय असें कोणीहि म्हणेल.

**अथ खलु क्रतुमयः पुरुषः** ही उपनिषद्-वाणी इतर अनेक थोर पुरुषांप्रमाणें श्रीमंत सयाजीराव यांच्या बाततींतहि खरी ठरलेली आढळते. मनुष्य हा क्रतुमय किंवा इच्छामय आहे; म्हणून नेहमीं सदिच्छा बाळगतात. सदिच्छांना सत्प्रयत्नांची जोड मिळाली, कीं परमेश्वरी कृपा-प्रसाद कांहीं दूर नाहीं. मनुष्य हा स्वतःच्या दैवाचा नियंता आहे, अशा अर्थाची इंग्रजींत एक सुप्रसिद्ध म्हण आहे. त्या म्हणीचा पाठ-पुरावा करण्याकरितां एखाद्याला उदाहरण हवें असेल, तर तें सयाजी-राव महाराजांच्या पन्नास-पंचावन्न वर्षांच्या उज्वल कारकीर्दीचें देतां येईल. महाराजांची ही कारकीर्द म्हणजे मनुष्यप्रयत्नांनीं केवढें मोठें भरीव कार्य करून दाखवितां येतें याची मूर्तिमंत साक्ष होय.

महाराजांना जेव्हां राज्यपद प्राप्त झालें त्या वेळची बडोद्याची स्थिति अत्यंत गुंतागुंतीची, बिकट व जोखमीची होती. अशा त्या मोह उत्पन्न करणाऱ्या परिस्थितीला धैर्यानें तोंड देऊन त्यांनीं सयश मिळ-

विलें यांतच त्यांच्या चरित्राचें खरें रहस्य सांठविलें आहे. ही परिस्थिति लक्षांत आल्यावांचून श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कामगिरीची किंमत कळावयाची नाहीं; म्हणून कांहीं वर्षें मागें जाऊन बडोद्यांतील वस्तुस्थिति होती तरी कशी हें आपण पाहूं या.

## प्रकरण दुसरें

# बडोद्यांतील बेबंदशाही

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत बडोद्याच्या भाग्यश्रीला उतरती कळा लागली होती. बुडत्याचा पाय अधिकाधिक खोल जावा, त्याला आपला तोल सावरतां येऊं नये, जशी स्थिति बडोद्यांतील राज्यकारभाराची सुमारें १८४० ते १८७४ पर्यंत सुरू होती. या चाळीस चव्वेचाळीस वर्षांतून खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीचीं कांहीं वर्षे अर्थातच वजा करावयाला हवींत. तीं वजा केल्यावर बाकी राहिलेल्या वर्षांत बडोद्याचा कारभार अत्यंत असमाधानकारक होता असें मोठ्या कष्टानें म्हणणें भाग आहे. दुसरे सयाजीराव व त्यांचीं तीन मुलें-गणपतराव, खंडेराव, मल्हारराव, यांच्या अमदानींत बडोद्याच्या प्रगतीच्या दृष्टीनें चांगल्या गोष्टी थोड्या घडल्या.

दुसरे सयाजीराव द्रव्यलोभी विशेष होते. आपल्या मनाप्रमाणें न वागणाऱ्याचा छळ ते दयाशून्य हृदयानें करीत. त्यांच्या अठ्ठावीस वर्षांच्या अमदानींत त्यांच्या हातून लोकोपयोगी गोष्टी जवळ जवळ घडल्या नाहींतच. शिवाय वरिष्ठ सरकारशीं त्यांचा एकप्रकारें बेबनाव होता. त्यामुळें हिंदुस्थान सरकारची बडोद्याकडे पाहण्याची दृष्टि जरा तेढीच होती.

दुसरे सयाजीराव निवर्तल्यावर त्यांचे ज्येष्ठ पुत्र गणपतराव गादीवर आले. पण हे स्वभावानें मऊ, चारित्र्यानें कमजोर, व विद्येनें

शून्य असल्यामुळें यांची कारकीर्द म्हणजे कारकीर्दच होती. त्यांनीं कोणाचें फारसें वाईट केलें नाहीं; तसेंच कोणाचें चांगलेंहि केलें नाहीं. दैवानें त्यांना राजे केलें होतें, त्याला ते काय करणार! गणपतराव इ. सन १८५६ मध्यें वारले.

गणपतरावांच्या नंतर खंडेराव महाराज गादीवर आले. हे कणखर स्वभावाचे, निर्व्यसनी व कांहींसे हेकेखोर होते. यांना कुस्तीचा व शिकारीचा फार नाद होता. ते स्वतः उत्तम कुस्ती खेळत व त्यांच्या पदरीं नामांकित पहिलवानांचे संघ असत. शिकारीचा यांना इतका शोक होता कीं, मकरपुऱ्याच्या मागच्या बाजूला एक मोठें वन याकरितां तयार करण्यांत आलें होतें. काम करण्याची यांची तऱ्हा फार जलद असे. कुठल्याहि गोष्टीचा ते तावडतोब निकाल करीत. न्यायदानाचें कामहि हे फार झपाट्यानें करीत.

कित्येक वेळां लोकोपयोगी काम करण्याची यांची पद्धत जरा चमत्कारिक असे. असें सांगतात कीं, एकदा शहरांत पाण्याचा पुरवठा करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यांत आली. नर्मदेचें पाणी कालवा बांधून बडोद्याला आणण्याची ती योजना होती. ती पुढें सफळ झाली नाहीं; तेव्हां त्या कामाकरितां काढून ठेवलेल्या द्रव्यनिधींतून मकरपुऱ्याचा राजवाडा, दोन चांदीच्या तोफा, कांहीं जडजवाहीर इत्यादि वस्तु निर्माण करण्यांत आल्या! जणूं काय या वस्तूंनीं लोकांची तृषा शांत होणार होती!

पण एकंदरींत डामडौल, वैभव, विलास यांची त्यांना मनापासून आवड. बडोदें येथील जवाहीरखान्यांत जें मौल्यवान जवाहीर दिसतें तें खंडेराव महाराजांनीं खरीद केलें होतें. त्याचप्रमाणें मोत्यांची चादर म्हणून जी दाखविण्यांत येते, तीहि त्यांनींच पैगंबराच्या कबरीवर

टाकण्याकरितां तयार करविली होती. पुढें ते वारले त्यामुळें पैगंबराच्या कबरीकडे ती चादर न जातां बडोद्याच्या नजरबागेंतच राहिली.

नजराणे घेण्या–देण्याची पद्धतहि श्रीमंत खंडेराव महाराज यांच्या कारकीर्दींत विशेष रूढ होती. महाराजांचा सत्कार करण्याची, त्यांच्या-बद्दल वाटत असलेला आदर दर्शविण्याची, ती एक सामान्य व सन्मान्य रीति त्या वेळीं समजली जाई. सरकारी नोकरांना व आश्रितांना तर तिचा नेहमीं अवलंब करावा लागे. किंबहुना ज्याला कोणाला कांहीं फायदा करून घ्यावयाचा असेल त्याला नजराणा अर्पण करणें हा एक बहुमूल्य पण फलप्रद मार्ग असे. या नजराणे घेण्याच्या पद्धतीमुळें खंडेराव महाराजांच्या पदरीं किती तरी नालायक कारभाऱ्यांचा जमाव जमला होता. व असल्या नालायक लोकांमुळेंच बडोद्याची प्रगति त्या काळीं होऊं शकली नाहीं.

त्यांतच एकीकडे खंडेराव महाराजांचे धाकटे बंधु मल्हारराव यांचीं कारस्थानें सुरू होतीं. बडोद्याची गादी आपणाला मिळावी म्हणून त्यांनीं खंडेराव महाराजांच्या विरुद्ध कट केला. याचा परिणाम म्हणून मल्हारराव यांना पाद्रा येथील तुरुंगांत इ. स. १८६३ मध्यें टाकण्यांत आलें.

खंडेराव महाराज गायकवाड यांच्या अमदानींत बडोद्याचें महत्त्व वाढविणारीं कांहीं फार कृत्यें घडलीं असें नाहीं; पण, कारण कांहींहि असो, ते फार लोकप्रिय होते. त्यांचा रुबाबदार भव्य चेहेरा, त्यांची दातृत्वशक्ति, त्यांचा मायाळू दिलदार स्वभाव यांमुळें बडोद्यांतील प्रजाजनांना ते हवेहवेसे वाटत. दूरदूरच्या पहिलवानांप्रमाणें काशी–रामेश्वराकडील पंडितहि महाराजांच्या कृपाछत्राखालीं कांहीं काल राहून आपला फायदा करून घेत.

हिंदुस्तान सरकारशींहि त्यांचें नातें अत्यंत सलोख्याचें होतें. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं खंडेराव महाराजांच्या साम्राज्यनिष्ठेवर अवलंबून हिंदुस्थानसरकारनें आपलें गुजरातेंतील सैन्य काढून तें दिल्ली—लखनौ-कडे नेलें होतें. आणि त्या वेळीं गुजरातेंत शांतता राखल्याबद्दल बंडाचा वणवा शांत झाल्यावर हिंदुस्तानसरकारनें बडोदें सरकारला पूर्वीं जो कर द्यावा लागे त्याची माफी केली. त्याचप्रमाणें " हिज हायनेस दि महाराजा गायकवाड ऑफ बरोडा " ही पदवीदेखील त्याच वेळीं मिळाली. याशिवाय खंडेराव महाराज यांना दत्तक घेण्याचा अधिकार देण्यांत आला तो वेगळाच.

अशा प्रकारें खंडेराव महाराजांच्या चौदा वर्षांच्या कारकीर्दींत बडोद्याचा भाग्यरवि बराच तळपत असलेला दिसतो न दिसतो तोंच त्या भाग्यरवीला खग्रास ग्रहण लागण्याची वेळ आली. श्रीमंत खंडेराव महाराज ता. २८ नोव्हेंबर १८७० रोजीं स्वर्गवासी झाले. त्यांना औरस संतति नव्हती व त्यांनीं कोणाला दत्तकहि घेतलें नव्हतें. अशा परिस्थितींत मल्हारराव यांना गादी मिळण्याचा संभव दिसूं लागला. पण खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाईसाहेब, ह्या गरोदर आहेत अशी बातमी बाहेर आल्यानें त्यांना अपत्य होऊन कांहीं निकाल लागेपर्यंत मल्हाररावांनीं फक्त देखरेख ठेवावी असा निकाल मुंबई सरकारनें दिला. मल्हाररावांचें मन खट्टू झालें व त्यांनीं जमनाबाईसाहेबांचा भावी मुलगा आपल्या मार्गांत न येईल अशी कपटयोजना सुरू केली. जमनाबाई-सारख्या सच्छील स्त्रीवर मोठाच प्रसंग ओढवला. पण त्या माऊलीनें प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें व रेसिडेंट कर्नल बार यांना आपल्या बाळंत-पणाची सोय रेसिडेन्सींत करण्याविषयीं सांगितलें. त्याप्रमाणें जमना-बाईसाहेब ता. ५ जुलै १८७१ रोजीं प्रसूत होउन त्यांच्या पोटीं ताराराजे जन्मास आल्या.

मग मल्हाररावांचा आनंद काय विचारतां! ते आतां खरखुरे महाराजा बनले. ते हत्तीवर बसून आनंदानें गांवांतून फिरले व लोकांना त्यांनीं बक्षिसें वाटलीं. आणि लागलीच बडोद्यांतील बेबंदशाहीला सुरवात झाली. खंडेराव महाराजांच्या कारभाऱ्यांवर व मदतनीसांवर सूड उगवावयाला त्यांनीं लागलीच सुरवात केली. खंडेराव महाराजांचे दिवाण भाऊ शिंदे यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें व मागाहून त्यांच्यावर बहुतेक विषप्रयोग होऊन ते वारले. आपल्या भावाच्या अधिकाऱ्यांच्या ऐवजीं मल्हाररावांनीं स्वतःच्या नालायक माणसाची योजना त्या कामीं केली. जमनाबाईसाहेबांना तर हा सर्व प्रकार पाहून खेद झाला; व त्या आपल्या मुलीबरोबर पुण्यास निघून गेल्या.

इकडे मल्हारराव महाराजांनीं आपल्या कलंकित कारकीर्दीला सुरवात केली. राजवाड्यांत नाचतमाशे, रंगढंग, विलास, अत्याचार वगैरे सुरू झाले. शहरांतील कुलीन स्त्रियांना रस्त्यांतून जाण्याची भीति उत्पन्न झाली. कोणाची अब्रू कोणीहि केव्हांहि लुटावी असा प्रकार सुरू झाला. महाराजांच्या पदरीं बदमाश, हलकट लोक होते. त्यांनीं चोंहीकडे हाहाःकार उडविला. जे नागरिक त्यांच्या नीच हेतूंना कबूल होत नसत त्यांचे अनन्वितपणें हाल करण्यांत येत. लोकांचा कोणीच त्राता उरला नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली.

इतक्यांत कर्नल रॉबर्ट फेअर नांवाच्या गृहस्थाची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. तो १८ मार्च १८७३ रोजीं बडोद्यास आला. त्याच दिवशीं त्याला अशी बातमी कळली कीं, शहरांत आठ जणांना फटक्याची शिक्षा देण्यांत आली आहे. यापूर्वीच्या बातम्या त्यांच्या कानांवर आल्याच होत्या. त्यामुळें चौकशीकरितां कमिशन नेमण्याविषयीं त्यांनीं ब्रिटिश सरकारजवळ आग्रह धरला. या कमिशनमध्यें कर्नल रिचर्ड मीड व इतर तीन सभ्य होते. या कमिशननें फारसा कडक

निर्णय न देतां ‘बडोद्यांतील राज्यकारभार सुयन्त्रित नाहीं’ असा मोघमच दिला. यानंतर त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड नॉर्थब्रुक यांनीं एक प्रकारचा निर्वाणीचा खलिता मल्हारराव महाराजांना लिहिला. त्यांत त्यांनीं राज्यकारभारांत सुधारणा करण्याविषयीं व बेबंदशाही बंद करण्याविषयीं लिहिलें होतें. मल्हाररावांनीं सुव्यवस्था करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर १८७५ ठेवण्यांत आली, व तेवढ्या अवधींत त्यांनीं आपले बदसल्लागार बदलून ब्रिटिश सरकाराला मान्य होईल असा आपला दिवाण नेमण्याविषयीं सांगण्यांत आलें.

या निर्वाणीच्या खलित्याचा थोडासा उपयोग झाला; नाहीं असें नाहीं. मल्हाररावांनीं आपले दिवाण नाना खानविलकर यांना बदलून त्यांच्या जागीं दादाभाई नौरोजी यांना आपले दिवाण नेमलें, व नाना खानविलकर यांना आपले प्रतिनिधि म्हणून नेमलें, कर्नल फेअर यांना या दोन्ही गोष्टी आवडल्या नाहींत. दादाभाई ता. ४ ऑगस्ट १८७४ रोजीं आपल्या बरोबर बऱ्याच जातीबंधूंना घेऊन आले. बडोद्यांतील अधिकाऱ्यांना एक पारशी गृहस्थ आपल्यावर टेंभा मिरवायला आलेला पाहून बरें वाटलें नाहीं. कर्नल फेअर यांना तर हें सर्व नाटकच वाटलें.

कर्नल फेअर यांची वागणूक इतकी कडक होती कीं, दादाभाईंच्या सांगण्यावरून मल्हाररावांनीं हिंदुस्थान सरकारला फेअरला बडोद्याहून काढण्याविषयीं पत्र लिहिलें. मल्हाररावांना अनुकूल असें या पत्राचें उत्तर आलें. कारण त्यांत रेसिडेंट फेअर याला रेसिडेन्सी सोडण्याविषयीं व कर्नल सर लुई पेली यांस रेसिडेंट नेमलें असल्याची हकिकत होती.

पण रेसिडेंटांची अशा तऱ्हेनें अदलाबदल होण्यापूर्वी बडोद्यांत एक प्रक्षोभकारक गोष्ट घडली. कर्नल फेअर हा ता. ७ नव्हेंबर रोजीं सरबत पिऊन आजारी झाला. सरबताच्या ग्लासामध्यें पाहतां त्याच्या-

४८३७

खालीं कांहीं पदार्थ आढळला. पृथक्करण करतां त्यांत हिऱ्याची पूड व आरसेनिक नामक विष आढळलें. कोणी तरी कर्नल फेअरवर विषप्रयोग केला होता. पण तो कोणीं केला हें त्या वेळीं कळलें नाहीं. व कर्नल फेअर यांस सर लुई पेली यांना आपल्या जागेचा चार्ज देऊन जावें लागलें.

सर लुई व मल्हारराव महाराज यांचें प्रथम कांहीं दिवस ठीक होतें. पण पुढें बिनसलें. मल्हाररावांनीं लक्ष्मीबाई नांवाच्या आपल्या रखेलीशीं लग्न लाविलें होतें. हिला डिसेंबरमध्यें एक मुलगा झाला. मल्हारराव त्याला आपलाच मुलगा मानूं लागले. व त्याचें नांव सयाजीराव ठेवण्यांत आलें. या वेळीं सर लुई हिंदुस्थानसरकारच्या सांगण्यावरून आपली हजेरी द्यावयाला राजवाड्यांत गेले नाहींत.

इतक्यांत सर लुईचें लक्ष दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीकडे वेधलें गेलें. हिंदुस्थान सरकारनें आपले गुप्त पोलिस बडोद्यांत ठेवले होते. या गुप्त पोलिसांनीं रेसिडेन्सीमधील दोन शिपायांकडून मल्हाररावांनीं त्यांना कर्नल फेअरवर विषप्रयोग करण्याकरितां विष दिलें असल्याबद्दल कबुलीजबाब घेतले. इतकें कळल्यावर कांहीं तरी इलाज करणें प्राप्तच होतें. ता. १४ जानेवारी १८७५ रोजीं हिंदुस्थान सरकारनें मल्हारराव महाराजांना अटक केल्याचें व पुढील चौकशी संपेपर्यंत कारभार आपल्या हातीं ठेवण्याचें जाहीर केलें.

मल्हाररावांनीं अटक केल्याच्या वेळीं कोणताहि प्रतिबंध केला नाहीं. त्यांना रेसिडेन्सींत नजरकैदेंत ठेवण्यांत आलें. त्यानंतर सर लुईनें नागरिकांना गोळा करून खरी हकिकत समजावून सांगितली, व हिंदुस्तान सरकारची इच्छा संस्थान खालसा करण्याची नाहीं असेंहि सांगितलें. फौजेचा बाकी राहिलेला पगार देऊन टाकल्यामुळें कांहीं गडबड झाली नाहीं.

पुढें कमिशन नेमण्यांत आलें. त्यांत सर रिचर्ड कौच, सर रिचर्ड मीड, मेलविल हें तीन युरोपियन व ग्वाल्हेरचे महाराज, जयपूरचे महाराज व सर दिनकरराव हे तीन हिंदी अशा सहा जणांच्या कमिशनपुढें मल्हारराव महाराजांवरील असलेल्या आरोपाची चौकशी झाली. त्यांत युरोपियन व हिंदी सभासदांत भिन्न मत पडल्यामुळें कमिशनचा रिपोर्ट जरी सरकारला मान्य झाला नाहीं तरी मल्हाररावांना पदच्युत करण्याचें त्यांनीं ठरविलें.

याच वेळीं जमनाबाईसाहेबांनीं खंडेराव महाराज दत्तकाचा अधिकार गाजवल्यावांचून निवर्तल्याची हकिकत सरकारच्या नजरेस आणली. व एखादा गायकवाड कुटुंबांतील योग्य मुलगा पाहून आपणाला दत्तक घेऊं देण्याविषयीं कळविलें. सरकारला हा बेत पसंत पडला व त्यांनीं १९ एप्रिल रोजीं मल्हारराव महाराजांना त्यांच्या दुश्शीलाबद्दल व बदराज्यकारभाराबद्दल पदच्युत केल्याचें जाहीर केलें.

तीन दिवसानंतर मल्हाररावांना मद्रास येथें नेण्यांत आलें. आपल्या जागीं आपला पुत्र जयाजीराव यांस गादी देण्याविषयीं त्यांनीं सरकारला विनंती केली; पण ती मान्य करण्यांत आली नाहीं. आणि अशा तऱ्हेनें बेबंदशाही कारभाराचा शेवट झाला. मल्हाररावांच्या कांहीं अनुयायांनीं २८ एप्रिल रोजीं छोटेसें बंड करण्याचा विचार केला, व त्याप्रमाणें ब्रिटिश अधिकाऱ्यांवर दगडफेक, काठीमार वगैरे अत्याचाराला सुरवात झाली. जयाजीरावाला गादी मिळवून देण्याविषयीं हा व्यर्थ खटाटोप होता. पण सर रीचर्ड मीड यानें वेळींच सावध होऊन बंडाचा मोड ताबडतोब केला व बऱ्याच जणांना अटक केली. त्यानंतर त्यानें व्यापाऱ्यांना रेसिडेन्सींत बोलावून बडोद्याचें स्वातंत्र्य पूर्वीप्रमाणेंच अबाधित असल्याचें सांगितलें

एवढ्या आश्वासनानें लोक खूष झाले. कारण त्यांना मल्हार-रावांच्या कारकीर्दीचा कंटाळा आला होता. त्यांना राजा हवा होता, पण तो जुलमी राजा नको होता. त्यामुळें सर्वसाधारण प्रजाजनांना मल्हारराव गेल्याबद्दल मुळींच वाईट वाटलें नाहीं.

त्यांतच ता. २ मे रोजीं जमनाबाईसाहेबांना पुनः बडोद्यांत परत आलेल्या पाहून लोकांना बरें वाटलें. पुढें जमनाबाईसाहेबांनीं रेसि-डेंट मीड व नवीन नेमण्यांत आलेले दिवाण सर टी. माधवराव यांच्या सल्ल्यानें गोपाळराव गायकवाड यांची बडोद्याच्या गादीवर कशी स्थापना केली ही हकीकत मागील प्रकरणांत आलीच आहे.

---

## प्रकरण तिसरें

# शिक्षणाची सुरवात व शेवट

बाल सयाजीराव यांचें शिक्षण कवळाणे येथें मुळींच झालें नव्हतें. त्यामुळें मराठी लिहिण्यावाचण्यापासूनच त्यांच्या शिक्षणाला सुरवात झाली. ता. ७ जून १८७५ रोजीं सरस्वतीपूजन वगैरे प्राथमिक विधि संपल्यावर त्यांच्या मराठीच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. त्या वेळची त्यांची शाळा राजवाड्याच्याच वरच्या मजल्यावर असे. येथें केशवराव पंडित व व्यंकटेश जोशी ऊर्फ भाऊ मास्तर त्यांस पांच तास शिकवीत. महाराजांच्या बरोबर दादासाहेब व संपतराव हेहि शिक्षण घेत. त्या वेळच्या शाळेचा सयाजीरावांना किती तरी कंटाळा वाटत असेल. कवळाण्याच्या मोकळ्या वातावरणांत वाढलेल्या बालकाला राजैश्वर्यापासून कितीहि सुख मिळत असलें तरी तें प्रथम तरी असह्य वाटत असणार. शिवाय कवळाणे येथें मुळींच शिक्षण न झाल्यामुळें महाराजांना शिक्षणाचें बरेच कष्ट सहन करावे लागले. पण प्रथमपासूनच मेहनत करून व लक्ष लावून शिकावयाचें असें त्यांनीं ठरविल्यामुळें त्यांची प्रगति बऱ्याच झपाट्यानें होऊं लागली. सर्व गोष्टी प्रयत्नानें, दीर्घ प्रयत्नानें साध्य करून घ्यावयाचा बाणा त्यांनीं अगदीं लहानपणापासून बाळगलेला दिसतो. त्यामुळें राजवाड्यांतील शाळेंतहि त्यांनीं अन्तःकरणपूर्वक प्रयत्नाला सुरवात केली.

सर रीचर्ड मीड मात्र या शिक्षणाच्या प्रयोगावर खूप नव्हते. राजवाड्यांत शाळा चालू ठेवल्यानें, झाला तर तेथील स्त्रियांमुळें

थोडासा त्रासच होणार. शाळेला पाहिजे तसलें शुद्ध वातावरण तिथें नसल्यानें, महाराजांना शिक्षणापासून कांहीं फायदा करून घेतां येणार नाहीं, असें त्यांना वाटलें. एक निराळी राजांची शाळा काढून त्यांत सरदार व कुलीन गृहस्थांच्या मुलांचा समावेश करण्यांत यावा व मुख्याध्यापक इंग्रज गृहस्थ असावा, अशी सूचना त्यांनीं मुंबई सरकारला केली.

पण या सूचनेप्रमाणें बदल होण्यापूर्वीं महाराजांच्या शिक्षणांत कांहीं काळ खंड पडला. त्या वेळचे प्रिन्स ऑफ वेल्स, भावी सातवे एडवर्ड राजे, हिंदुस्तानांत नव्हेंबरमध्यें यावयाचे होते. त्याकरितां इतर संस्थानिकांप्रमाणें बडोद्याच्या बालमहाराजांनीं देखील त्यांच्या स्वागतार्थ मुंबईस जाणें योग्यच होतें. त्याप्रमाणें महाराणी जमनाबाईसाहेब व सर रीचर्ड मीड यांजबरोबर सयाजीराव महाराज मुंबईस गेले. तेथें गव्हर्नरांची व त्यांची मुलाखत झाली. पुढें व्हाईसरॉय मुंबईस आले व ता. ८ नव्हेंबर रोजीं प्रिन्स ऑफ वेल्स हेहि आले. दुसऱ्या दिवशीं त्यांची व महाराजांची लालबागेंत भेट झाली. त्या प्रसंगीं प्रिन्स ऑफ वेल्सनीं कांहीं वस्तु महाराजांना भेटीदाखल दिल्या व राज्यकारभारांत सुयश चिंतिलें. ता. १२ रोजीं बडोद्याच्या लष्कराची पाहाणी प्रिन्स ऑफ वेल्स यांनीं केली व सोन्याचांदीच्या तोफा पाहून संतोष व्यक्त केला.

पुढें पुण्याहून परत आल्यावर प्रिन्सनीं शिकारीकरितां व अगडांतील खेळ पाहण्याकरितां बडोद्यास जावयाचें ठरविलें. त्यामुळें त्यांच्या स्वागतार्थ महाराजांना घाईघाईनें बडोद्यास परत यावें लागलें. १९ तारखेला सकाळीं प्रिन्स बडोद्यास आले व महाराज, महाराणी जमनाबाई, सर टी. माधवराव, व नवे एजंट मेलव्हिल यांच्या समवेत रेसिडेन्सींत गेले. दुपारीं महाराणी जमनाबाई व महाराज यांची

प्रिन्सनें सरकारी रीत्या भेट घेतली व मग अगडांतील विविध खेळ पाहिले. ता. २० रोजीं सकाळीं शिकारींत प्रिन्सचा बराच वेळ गेला. संध्याकाळीं त्यांना खाना देण्यांत आला. त्या प्रसंगीं सर टी. माधवराव यांनीं महाराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स यांना शुभायुष चिंतिलें. नंतरच्या आपल्या भाषणांत प्रिन्स ऑफ वेल्स यांनीं ' महाराज आपल्या प्रजेच्या व राज्याच्या हितार्थ झटून यश संपादन करतील अशी आशा आहे ' असें सांगितलें. अशा तऱ्हेनें हा मोठा समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. प्रिन्स ता. २३ रोजीं बडोदें सोडून गेले. या बडया पाहुण्यांच्या मुलाखतीमुळें महाराजांना पुष्कळ नव्या व चांगल्या गोष्टी शिकावयाला सांपडल्या.

प्रिन्स ऑफ वेल्सच्या या मुलाखतीनंतर सर रीचर्ड मीड यांनीं योजिलेला बदल अंमलांत आला. सर रीचर्ड आतां जागेवर नव्हते, त्यामुळें त्यांची कामगिरी मि. मेलव्हिल यांना पुरी करावी लागली. राजास्कूलचे मुख्याध्यापक म्हणून मि. इलियट नांवाच्या एका सिव्हिल सर्वंटाची योजना करण्यांत आली. मि. इलियट हे वऱ्हाडांत डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या जागेवर होते. ते बडोद्यास ता. १० डिसेंबर १८७५ रोजीं आले. शाळेची राजवाडयांतील जागा बदलून ती मोतीबागेंत नेण्यांत आली. व येथें सकाळीं दहा वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत महाराजांचें इतर विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण होऊं लागलें. त्यांच्या शिक्षणांत आतां मराठीच्या जोडीला इंग्रजी, गुजराती व उर्दु हे नवीन भाषाविषय आले. इलियटनीं आपल्या विद्यार्थ्याची परीक्षा घेतली व तो विद्येंत बराच मागासलेला असल्याचें त्यांना कळलें. तरी पण त्यांनीं हौसेनें शिकवावयास आरंभ केला व सयाजीराव महाराज यांनीं देखील आनंदानें व उत्साहानें आपल्या नव्या गुरूच्या हाताखालीं शिकावयाला सुरवात केली.

नव्या गुरूच्या हाताखालीं सुरू होणाऱ्या या नव्या शिक्षणक्रमाला पुनः एकदा खंड पडला. १८७६ च्या शेवटच्या कांहीं दिवसांत महाराजांनीं हिंदुस्तानच्या लांबलचक ३५८० मैलांच्या सफरीला आरंभ केला. यांत मुख्य उद्देश दिल्लीदरबाराला हजर राहण्याचा होता. या प्रसंगीं राणी व्हिक्टोरिया यांची हिंदुस्तानच्या महाराज्ञी म्हणून घोषणा व्हावयाची होती. महाराज जमनाबाईसाहेब, ताराराजे, मेलव्हिल व ईलियट यांच्याबरोबर दिल्लीस गेले. लॉर्ड लिटन नवे व्हाईसरॉय, हे नाताळच्या दिवशीं दिल्लीस आले. त्यांच्या स्वागतार्थ इतर संस्थानिकांप्रमाणें महाराजहि हजर होते. दुसऱ्या दिवशीं लार्ड लिटन यांनीं महाराजांना भगवा झेंडा व व्हिक्टोरिया राणीची मुद्रा असलेलें सुवर्णपदक अर्पण केलें. इतकेंच नाहीं तर २९ तारखेस महाराज्ञी व्हिक्टोरिया यांनीं कृपावंत होऊन महाराजांना फर्जंद-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिया हा किताब दिल्याचें जाहीर केलें.

दिल्हीदरबार संपल्यावर ता. ९ जानेवारी १८७७ रोजीं महाराज बडोद्यास परत यावयाला निघाले. वाटेंत त्यांनीं आग्रा, बनारस, लखनौ, अलाहाबाद वगैरे स्थळें अवलोकिलीं व एखाद्या धार्मिक हिंदुप्रमाणें नर्मदा, गंगा, यमुना वगैरेसारख्या पवित्र नद्यांत स्नान केलें. अशा तऱ्हेनें महाराजांच्या प्रवासी आयुष्यक्रमाला येथपासून सुरवात झाली असें म्हणावयाला हरकत नाहीं.

महाराज बडोद्यांत परत आल्यावर प्रजाजनांनीं, त्यांना मिळालेल्या किताबाबद्दल, त्यांचा थाटानें सत्कार केला. याच वर्षीं मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनीं बडोद्यास मे महिन्यांत भेट दिली.

या वर्षीं एक मात्र दुःखदायक गोष्ट घडली. ती म्हणजे श्रीमंत काशिराव ऊर्फ बाबासाहेब गायकवाड यांच्या मृत्यूची. ते ता. २६ जुलै रोजीं बडोदें मुक्कामीं वारले.

अशा तऱ्हेनें शिक्षणक्रमांत मधून मधून खंड पडूनहि महाराजांची शिक्षणांत प्रगति झपाट्यानें होऊं लागली. त्यावेळींहि ते अत्यंत उद्योगी व दृढनिश्चयी होते. व हे दोन गुण त्यांच्या ठिकाणीं अजूनहि प्रमुखपणें वसत आहेत. दीर्घोद्योग, सतत प्रयत्न, सतत सद्विचार यानें मनुष्यांत केवढा मोठा बदल होऊं शकतो याचें सयाजीराव महाराज हें उत्तम उदाहरण आहे. डोंगरांतून निघणाऱ्या नदीच्या प्रवाहाआड कितीहि दुस्तर खडक आले तरी नदी आपला मार्ग समुद्राला नेऊन मिळवितेच. मनुष्याच्या प्रयत्नांचें झालें तरी असेंच आहे. त्यांचा उगम बाह्यतः कठिण अशा मस्तकांत होऊन नंतर जगाच्या धक्काधक्कीच्या मामल्यांतून त्यांना आपला मार्ग काढावा लागतो. असें झालें कीं शेवटीं प्रयत्न आणि यश किंवा सिद्धी यांची गांठ पडते.

श्रीमंत महाराजांनीं शिक्षणाच्या बाबतींत मनाशीं ‘ अन्तःकरणपूर्वक प्रयत्न करावयाचा ’ अशी खूणगांठ बांधली असावी असें वाटतें. कारण १८७७ सालीं त्यांना शिकविल्या जाणाऱ्या विषयांत वाढ करण्यांत आली. भाषाविषयाच्या जोडीला हिंदुस्थान व इंग्लंडचा इतिहासत्यांना शिकावा लागला. त्याचप्रमाणें पुढें भूगोल, पोलिटिकल इकॉनॉमीसारखे विषयहि त्यांच्या अभ्यासक्रमांत घुसले. अशा स्थितींत इतर एखाद्या कच्च्या शिष्याची त्रेधा उडाली असती. आणि त्याप्रमाणें महाराजांच्या बरोबर शिकत असलेल्या संपतराव, दादासाहेब वगैरे विद्यार्थ्यांची खरंच त्रेधा उडाली. पण याहि शिक्षणक्रमाला महाराजांनीं धैर्यानें तोंड दिलें व आपली प्रगति चालू ठेवली. राजवाड्यांत ते स्वतःच खूप वाचीत किंवा मदतीला म्हणून केशवराव पंडित, भाऊ मास्तर वगैरे मंडळींना बोलावीत. यामुळें कितीहि मोठा अभ्यास असला तरी तो ते संपविल्याखेरीज राहात नसत. त्यांच्या बरोबर अभ्यास करण्याकरितां दुसरीं नवीन मुलें ठेवण्यांत आलीं. पण याहि

मुलांना महाराजांच्या बरोबर टिकाव धरतां आला नाहीं. त्यामुळें शेवटीं बरेचसे विषय त्यांना एकट्यालाच शिकवावे लागूं लागले.

ज्याप्रमाणें महाराजांचें अभ्यासाकडे लक्ष होतें, त्याचप्रमाणें व्यायाम व इतर देशीविदेशी खेळांकडेहि होतें. तलवार व दांडपट्टा फिरविणें, कवायत करणें, पोहणें वगैरेसारखे ते मर्दानी व्यायाम घेत. दर पंधरा दिवसांनीं सर्व मंडळी शिकारीलाहि जात. या सर्व व्यायाम-प्रकारांमुळें महाराजांची प्रकृति चांगली राहूं लागली व त्यांचें शरीर अधिकाधिक सरस व सकस बनूं लागलें.

महाराजांच्या आयुष्यांतील या शिक्षणाच्या काळाविषयीं लिहित असतांना ज्या व्यक्तींनीं त्यांच्या शीलाला व आयुष्याला वळण लाविलें त्यांच्याविषयीं चार शब्द येथें लिहिणें अप्रस्तुत होणार नाहींत. या व्यक्ती म्हणजे महाराणी जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व मि. इलियट होत. कुशल बागवानानें एखाद्या रोपाचें कलम करून नंतर तें जमिनींत लावावें आणि मग त्याच्याभोंवती आळें करून व त्याला नित्य नियमानें खतपाणी घालून, त्याला कीड लागत नाहींना तें पाहावें; त्याची वाढ चांगली होते आहे किंवा नाहीं हें पाहावें; त्याप्रमाणें जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव, व इलियट ही मंडळी दत्तक घेतलेल्या या मुलाकडे बघूं लागली. मल्हारराव महाराजांची अकीर्तिकर कारकीर्द नुकतीच संपली होती. पुनः त्याचीच उजळणी होऊं नये असें जमनाबाईसाहेबांना वाटत असणें अगदीं स्वाभाविक आहे. म्हणून त्या विशेष दक्षतेनें महाराजांच्या हालचालीकडे राजवाड्यांत बघत. त्या स्वतः उच्च मराठे कुलांत जन्मल्या होत्या. त्यामुळें त्यांचा स्वतःचा स्वभाव अत्यंत उमदा व उदात्त होता. या त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब महाराजांच्या स्वभावांतहि पडलेलें दिसतें. लहानपणीं मुलांना स्त्रियांकडून जेवढे चांगले संस्कार होऊं शकतात. तेवढे पुरुषांकडून

होऊं शकत नाहींत. स्त्रिया जात्याच स्वभावानें मायाळू व प्रेमळ असतात. त्यांच्या प्रेमळपणामुळें त्या कोणतेंहि काम आपल्या बालशिष्याकडून करवून घेऊं शकतात. जमनाबाईसाहेबांनीं एकप्रकारें जरा कडकच दृष्टि महाराजांवर ठेवली होती. पण त्यांच्या स्वतःच्या वागण्यांतील सौजन्यामुळें हा कडकपणा महाराजांच्या लक्षांत कधींच आला नाहीं.

महाराणी जमनाबाईसाहेबांप्रमाणें महाराजांच्या आयुष्याला उत्तम वळण लावणारी दुसरी व्यक्ति म्हणजे सर टी. माधवराव. सर टी. माधवराव म्हणजे महाराजांचे राजकीय गुरुच होत. महाराजांचीं राजकारण व राज्यकारणाविषयींचीं मतें विशिष्ट प्रकारचीं बनण्याचें बरेचसें श्रेय सर माधवराव यांनाच द्यावें लागेल. सर माधवराव यांचा जन्म १८२८ मध्यें तंजावर येथें झाला. ते चांगले विद्वान असून मद्रास युनिव्हरसिटींत ते कांहीं वर्षें प्रोफेसर म्हणून काम करीत होते. पुढें त्रावणकोण संस्थानचे ते चौदा वर्षें दिवाण होते. मल्हाररावांच्या राज्यकारभाराविषयीं चौकशी सुरू असतांना, निमसरकारी चौकशी करण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें होतें. हें काम त्यांनीं चांगलें केल्यामुळें हिंदुस्थान सरकारची त्यांच्यावर दृष्टि होतीच. अशा सर्व गोष्टींमुळें, मल्हाररावांना जाहीररीत्या पदच्यूत केल्यावर, सरकारनें सर टी. माधवराव यांची बडोद्याच्या दिवाणाच्या जागीं नेमणूक केली. आणि सर माधवरावहि तांतडीनें आपल्या कामावर रुजू झाले. महाराणी जमनाबाईसाहेब ज्या दिवशीं पुण्याहून परत बडोद्यास आल्या, त्याच सुमारास सर माधवराव हेहि बडोद्यास आले.

सर टी. माधवराव यांचें शील उत्तम व चारित्र्य उज्ज्वल होतें. विद्येचे व अनुभवाचे त्यांच्यावर फार चांगले संस्कार झाले होते. एका संस्थानाची त्यांनीं चौदा वर्षें दिवाणगिरी केली होती, व एका युनि-

व्हरसिटींत कांहीं वर्षे शिक्षक म्हणून होते. अशा तऱ्हेनें उत्तम राज्यकारभारी व उत्तम शिक्षकाची जोड त्यांच्या ठिकाणीं जमली होती. त्यामुळें महाराजांना त्यांचा या दुहेरी नात्याचा फार उपयोग झाला. सर्वांत विशेष आनंदाची व नमूद करून ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही कीं, सयाजीराव महाराजांना शिकविण्यांत सर टी. माधवराव यांना विशेष उत्साह व अभिमान वाटे. आणि असें होणें साहजिक आहे. एका मोठ्या संस्थानाचा अधिपती त्यांना शिष्य म्हणून लाभला होता; आणि आपण निरलसपणें त्याला योग्य मार्गावर आणून न ठेवल्यास परिस्थिति भयंकर ओढवेल अशी त्यांना मनांतून भीति वाटत होती. कर्तृत्ववान मनुष्याला अशा परिस्थितींत नेहमींच आनंद वाटतो. ज्या परिस्थितींत आपले गुण कसाला लागतील ती त्याला आवडते. उत्तम पोहणाऱ्याला ज्याप्रमाणें जेवढें खोल, अथांग पाणी असेल तेवढा अधिकच आनंद वाटतो; त्याप्रमाणें कर्तृत्ववान मनुष्याला बिकट परिस्थिती पाहून अधिकच समाधान वाटतें. सर माधवराव यांचें राष्ट्रीय अन्तःकरण अधिक प्रफुल्ल होण्याचें कारण एका देशी संस्थानाची प्रगति करण्याचें सद्भाग्य त्यांना लाभलें होतें. या व अशाच प्रकारच्या कारणपरंपरेमुळें त्यांना आपलें काम अतिशय आवडलें. व याचा परिणाम असा झाला कीं, श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या मनावर त्यांचा जितका ठसा बसला तितका पुढें कोणाचाच कधींहि बसला नाहीं. इतर लोकांच्या विद्वत्तेनें व बहुश्रुतपणानें महाराज कांहीं काळ त्यांच्याकडे जरी आकर्षिले गेले तरी त्या आकर्षणाला सर टी. माधवराव यांनीं महाराजांच्या अन्तःकरणावर निर्माण केलेल्या ठशाची सर कधींहि येणार नाहीं.

सर टी. माधवरावांप्रमाणेंच मि. एफ्. ए. एच्. इलियट यानांहि सयाजीराव महाराज यांच्या शीलसंवर्धनाच्या यशाचा कांहीं वाटा

द्यावयाला हवा. हे इंग्रज गृहस्थ स्वभावानें शांत व मायाळू होते. आपल्या समोरील जबाबदारीची त्यांना यतार्थ कल्पना होती. प्रथम जेव्हां ते बडोद्यास आले तेव्हां आपला विद्यार्थि अगदीं प्राथमिक अवस्थेंत असलेला त्यांना आढळला. पण त्या विद्यार्थ्याच्या अंगीं उद्योग करण्याची आस्था फार आहे, हेंहि त्यांनीं ओळखिलें. आणि महाराजांच्या उद्योगप्रियतेवर खूष होऊनच त्यांनीं गुरुपद स्वीकारलें. आणि पुढें त्यांना लौकरच असें कळून आलें कीं, आपले परिश्रम मुळींच वाया जाणार नाहींत. पुढें पुढें तर इलियट यांना आपल्या शिष्याविषयीं इतका अभिमान वाटूं लागला कीं "त्यांच्या ठिकाणीं दोष ठेवायला मला कधींहि जागा सांपडली नाहीं. इतका सरस व प्रेमळ विद्यार्थी क्वचित्‌च पाह्यला सांपडेल." अशा प्रकारचे धन्योद्गार त्यांनीं आपल्या शिष्याविषयीं १८८० मध्यें काढले.

अशा तऱ्हेनें या तीन गुरूंच्या देखरेखीखालीं सयाजीराव महाराज यांचा शिक्षणक्रम सुरू होता. हल्लीं श्री. सयाजीराव यांना जें मोठेपण प्राप्त झालें आहे त्याचा वाटा या तीन गुरूंकडे जातो असें आम्हांला म्हणावयाचें नाहीं. महाराजांच्या ठिकाणीं उपजतच चांगले गुण बरेच होते आणि म्हणूनच ते मोठ्या पदवीला पोंचूं शकले. केवळ आपल्या गुरूमुळें ते चांगले झाले असें म्हणावें तर इतर शिष्यांवर याच गुरूंचा फारच थोडा प्रभाव पडलेला दिसतो. गुरु हा नेहमीं त्याला जें सांगावयाचें असतें तें तो हुशार तसेंच जड विद्यार्थ्याला सारखेंच सांगतो. पण शिष्याच्या ठिकाणीं असलेल्या नैसर्गिक गुणांवर गुरूच्या शिकवणीचे यश किंवा अपयश अवलंबून असतें. येथें चांगल्या बीजाचाच प्रश्न असतो हें जरी खरें असलें तरी गुरुचा प्रभाव म्हणून कांहीं असतोच असतो. गुरुच्या वाणीचा, गुरुच्या आचरणाचा शिष्याच्या कोंवळ्या मनावर जेवढा परिणाम होईल तितका दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं

शिष्याच्या ठिकाणीं निसर्गदत्त बुद्धि तर हवीच पण त्या बुद्धीची जोपासना व वाढ योग्य दिशेनें करावयाला सद्गुरुची नेहमींच जरूरी असते. आणि याच दृष्टीनें पुन: एकवार आम्हीं असें म्हणतों कीं, महाराणी जमनाबाईसाहेब, सर टी. माधवराव व इलियट यांचा उपयोग महाराजांच्या शीलसंवर्धनाकडे व बुद्धीच्या वाढीकडे फार फार झाला.

इ. स. १८८० च्या सुमारास महाराजांच्या आयुष्यांत एक महत्त्वाचा बदल घडून आला. तो म्हणजे त्यांच्या लग्नासंबंधींचा होय. त्यावेळीं महाराजांचें वय सतरा वर्षांचें असेल नसेल. इतक्या लहान वयांत लग्न करण्याची कल्पना आपणाला आतां हास्यास्पद वाटते. पण त्यावेळीं तसें मानलें जात नसे.

महाराजांच्या या लग्नाविषयीं आपण पुढें बोलूं या. तूर्त त्याचा उल्लेखच केलेला बरा. पण या तयांत त्यांचें शिक्षण चाललें असतांना स्वत: त्यांना त्याविषयीं व एकंदर आपल्या परिस्थितीविषयीं काय वाटत असे हें पाहाणें मनोरंजक व अगत्याचें होईल. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांची कवळाणें येथून उचलबांगडी करून बडोद्याच्या गादीवर स्थापना करण्यांत आली. साधे गोपाळराव होते त्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज बनले. कवळाणें येथील स्वतंत्र, स्वच्छंदी, मोकळें वातावरण बडोद्यांत कुठलें लाभावयाला? मोकळ्या मनानें माळरानावर कवळाण्यास भटकावयाला सांपडत असे. पण बडोद्यात तें सुख कुठलें? कवळाण्यास लहानपणच्या गुजगोष्टी सांगावयाला संवगडी होते. बडोद्यांत कुठले ते दिसायला? आणि येऊं तरी कोण देणार त्यांना? बडोद्यांत ऐश्वर्य होतें, मानसन्मान होता, मोठेपण होतें. पण या सर्वांना कवळाणें येथील विशिष्ट स्वातंत्र्याची सर कशी येणार? महाराजांना आपलें आयुष्य एकाकी वाटत असल्यास नवल नाहीं. त्यांचे बडोद्यांत कोणी मित्र नव्हते. आपण महाराज आहोंत हें कधीं त्यांना विसरतां येत नसे, व

कोणी त्यांना विसरूंहि देत नसत. त्यांच्या आजुबाजूला फिरणारी मंडळी कमी शिकलेली, कमी पगार असलेली व बंदिजनाप्रमाणें असत. ही मंडळी नेहमीं " महाराज, महाराज " करण्यांत गुंतलेली असत.

आणि ही परिस्थिति अजूनहि कांहीं बदलली आहे असें नाहीं. स्वत: महाराजांना आपलें 'महाराजपण' विसरायला हवें असतें. पण भोंवतालची मंडळी त्यांना या उपाधीपासून मोकळेंच होऊं देत नाहींत. याचा परिणाम असा होतो कीं, महाराजांना येथें असतांना पाहिजे तितका मनाचा मोकळेपणा लाभत नाहीं. खाजगी आयुष्य जणूं कांहीं त्यांना नाहींच असें त्यांच्या भोंवतालच्या व्यापावरून वाटतें.

महाराजांच्या लग्नानंतर त्यांचा अभ्यासक्रम पुन: पूर्वीसारखाच सुरू झाला. पण या अभ्यासक्रमाला एकाएकीं फारच निराळें स्वरूप प्राप्त झालें. महाराजांना आतां अठरावें वर्ष लागलें होतें आणि त्यांची बाल्यावस्था लवकरच संपणार होती. राज्याचा भार त्यांच्यावर टाकून त्यांनीं तो व्यवस्थितपणें पार पाडावा अशी इच्छा हिंदुस्थान सरकारची होती. लॉर्ड रिपन, त्यावेळचे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय, यांच्या मतें हें काम जितक्या लवकर होईल तितकें बरें. त्यामुळें इतर कांहीं मंडळींकडून विरोध होऊनहि त्यांनीं महाराजांना अधिकार देण्याची तारीख २८ डिसेंबर १८८१ ही ठरविली.

ही तारीख नक्की ठरल्यानंतर स्वाभाविकपणेंच महाराजांना होत असलेला भाषा-इतिहासादिकांचा अभ्यास शक्य तितक्या तांतडीनें उरकण्याचें ठरलें. सर टी. माधवराव यांच्या मतें महाराजांना त्यांच्यावर लवकरच येऊन पडणाऱ्या जबाबदारींतून कुशलपणें मार्ग जेणेंकरून काढतां येईल अशा प्रकारच्या शिक्षणाची फार फार जरूरी होती. इतर कांहीं विषय महाराज नाहीं शिकले तरी चालतील पण राज्यकारभार सुयंत्रितपणें चालविण्यांत मदत करणाऱ्या शिक्षणाची त्यांना जरूरी

आहे, असें सर माधवराव यांना वाटलें. आपण प्रजेकरितां आहोंत, प्रजा आपल्याकरितां नाहीं. प्रजेचें कल्याण हेंच खरोखर आपलें कल्याण. प्रजा सुखी तर राजा सुखी. प्रजेकरितां राजानें वाटेल त्या स्वार्थावर तिलांजली द्यावयाला सिद्ध असावयाला पाहिजे. राजानें राज्याचा संन्यास घ्यावयाचा नाहीं तर आपल्या स्वार्थी आपमतलबी विचारांचा. या व अशा आशयाचा शिक्षणाची सोय लावण्यांत सर माधवराव गुंतले. त्यांनीं एक योजना तयार केली आणि त्या योजनेप्रमाणें एक नऊ महिन्याचा राज्यकारभारविषयक शिक्षणक्रम तयार केला.

या गोष्टीमुळें महाराजांवर मोठीच जबाबदारी येऊन पडली. आजपर्यंत चालत असलेल्या शिक्षणाला एकप्रकारें रामराम ठोकण्याची पाळी आली. भाषा, ललितकला, इतिहास—भूगोल वगैरे विषयांच्या शिक्षणाचा लौकिकदृष्ट्या शेवट झाला. महाराजांना स्वतःला ही गोष्ट फारशी संमत नव्हती. आणखी तीन वर्षें शिकायला सांपडलें असतें तर फार चांगलें झालें असतें, असें त्यांना अजूनहि वाटतें. किंबहुना त्यांचें शिक्षण अद्यापहि चालूच आहे, असें म्हणावयाला हरकत नाहीं. नवीन नवीन विषय ते नेहमीं शिकतच असतात. पण सांगण्याचा भावार्थ इतकाच कीं, तेव्हां जो केवळ शिक्षणाचा क्रम चालला होता तसाच आणखी कांहीं वर्षें टिकता तर त्यापासून महाराजांना खूब फायदा झाला असता. मागाहून मोठ्या वयांत कांहीं शिकतां येत नाहीं असें नाहीं. किंबहुना आपण आमरण विद्यार्थी दशेंतच असतो. पण मोठ्या वयांत अडचण उत्पन्न होते ती एकाग्रतेच्या व वेळेच्या अभावाची आणि आणखी कांहीं वर्षें शिकायला सांपडलें नाहीं याबद्दल महाराजांना जें वाईट वाटतें तें याच दृष्टीनें.

पण तें कसेंहि असलें तरी आलेल्या परिस्थितींत त्यांच्या चालू असलेल्या शिक्षणाचा शेवट झाला आणि नऊ महिनेपर्यंत त्यांना राज्य-

कारभारविषयक शिक्षण घ्यावें लागलें. हा शिक्षणक्रम किती विविध स्वरूपाचा होता हें खालीं दिलेल्या त्याच्या मसुद्यावरून कळून येईल.

सर टी. माधवराव यांनीं राज्यशास्त्राविषयीं व राजांनीं कसें वागावें याविषयीं तेवीस व्याख्यानें द्यावयाचीं; काझी शहाबुद्दीन यांनीं जमीन महेसूलीविषयीं सत्तावीस व्याख्यानें द्यावयाचीं; सर न्यायाधीश करसेटजी जमशेदजी यांनीं आठ व्याख्यानांत न्यायाचीं सामान्य तत्त्वें समजवून सांगावयाचीं; हायकोर्ट न्यायाधीश रा. गाडगीळ यांनीं हिंदुव्यवहारधर्मशास्त्राविषयीं सात व्याख्यानांत माहिती सांगावयाची; रा. किर्तने यांनीं पोलिसखात्यासंबंधीं ज्ञान सहा व्याख्यानांत करून द्यावयाचें; लष्करासंबंधीं व जमिनीच्या तंट्यासंबंधींची माहिती पेस्तनजी जहांगीर यांनीं नऊ व्याख्यानांत करून द्यावयाची.

अशा तऱ्हेनें ही व्याख्यानमाला जुळविण्यांत आली होती. या सर्व व्याख्यानांत सर टी. माधवराव यांचीं व्याख्यानें अत्यंत सरस झालीं असें इलियटसारखा विद्वानहि म्हणतो. हीं व्याख्यानें माहितीनें भरलेलीं, मनोरंजक व खऱ्या जिव्हाळ्यानें दिलीं जात असल्यानें तीं चांगलीं झालीं असल्यास त्यांत मुळींच नवल नाहीं. या व्याख्यानांचा सारांश Minor Hints नांवाच्या पुस्तकांत ग्रथित करण्यांत आला आहे. सर टी. माधवराव म्हणतात, " कोणत्याहि राजानें इतके श्रम करूं नयेत कीं ज्यांमुळें त्याच्या प्रकृतीला त्रास होईल. उत्तम दिवाणाची बडोद्यासारख्या संस्थानाला तर अत्यंत जरूरी आहे. बडोदें संस्थानाकडे जितकें सरकारचें व लोकांचें लक्ष आहे तितकें कोणत्याहि संस्थानाकडे नाहीं. सार्वभौम सत्तेला नेहमीं मान देऊन वागलें पाहिजे. संस्थान व हिंदुस्तान सरकार यांत झालेल्या अटी दक्षतेनें पाळल्या जाव्यात. परसंस्थान व परसत्तेच्या वकिलांना आपल्या संस्थानांत येऊं देऊं नये; आणि देशी संस्थानांचे तंटे ब्रिटिश सरकारच्याकडे निवाड्याकरितां

सोंपवावे. हिंदुस्थान सरकारचा सल्ला, विशेषत: व्हाइसरॉय यांचा सल्ला, नेहमीं प्रसंग विशेषीं घ्यावा. "

बाकीच्या व्याख्यात्यांनीं आपलीं व्याख्यानें दिलीं. पण त्यांत विषय प्रतिपादनापेक्षां स्वत:ची बुद्धिमत्ता दाखविण्याचा प्रयत्न विशेष होई. बालमहाराजांच्या मनावर आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न या लोकां-कडून झाला. तर सर टी. माधवराव यांनीं खऱ्या अन्त:करणाच्या जिव्हाळ्यानें व कळकळीनें आपला विषय समजावून सांगितला. या दोन प्रकारच्या व्याख्यानांनीं महाराजांची खूप करमणूक झाली असेल असें आम्हांला वाटतें. निदान आतां तरी त्यांची आठवण होऊन महाराजांना आंतल्या आंत हंसूं येत असेल.

पण त्यावेळीं मात्र त्यांना शक्य तितकें लक्ष लावून आपले विषय शिकावे लागले. ते विषय त्यांना त्यावेळीं चांगले समजले असतील असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. त्यांच्या लहान वयाची व विषयांच्या मोठेपणाची तुलना केल्यास हा तर्क किती अस्थानीं आहे हें सहज समजून येणार आहे. आपल्यावर लवकरच कांहींतरी मोठी जबाबदारी येऊन पडणार, एवढेंच त्यावेळीं त्यांना व्याख्यानें ऐकून वाटलें असणार. आपल्याकडून त्यांनीं हीं व्याख्यानें पचविण्याचा खूब प्रयत्न केला. ऐकलेल्या व्याख्यानांच्या टिप्पण्या काढाव्यात, वेळ मिळेल तेव्हां त्यांचें मनन करावें, आणि अशा तऱ्हेनें विषय आत्मसात करावा असा त्यांचा प्रयत्न चालूच होता. पण कांहीं झालें तरी अपरिपक्व मेंदूची उणीव प्रयत्नानें कशी आणि किती भरून निघणार ?

व्याख्यानांचा क्रम संपला. आणि आजूबाजूच्या जबाबदार मंडळींना असें वाटूं लागलें कीं, राज्यधुरा आपल्या अंगावर वाहावयाला आतां महा-राज समर्थ झाले आहेत. आतां चिंता नाहीं. आतां त्यांनींच आपला राज्यशकट हांकावा हें योग्य.

व तेथें त्यांना असें सांगण्यांत आलें कीं, आणखीं दोन वर्षें कित्येक बाबतींत आपणाला पूर्ण स्वातंत्र्य आहे असें आपण मानूं नये. या म्हणण्याचा त्यावेळीं त्यांना फारसा बोध झाला नाहीं. पण त्यांच्या इच्छेबाहेर न जाण्याचें त्यांनीं कबूल केलें; दोन वर्षांनंतर पुनः पूर्वीप्रमाणेंच ठेवण्याविषयीं त्यांना सांगण्यांत आलें. ही बाबत म्हणजे बडोदें येथील लष्करासंबंधींची होय. आपलें लश्कर चांगलें ठेवा असें एकीकडून सांगत असतांना, दुसरीकडून तसा प्रयत्न करूं न देण्याचें कोडें अजूनहि महाराजांना उलगडलें नाहीं. पण हें कोडें स्पष्टपणें न उलगडतांहि उलगडलें गेल्यासारखेंच नाहीं काय ? हिंदुस्थानांतील देशी संस्थानें म्हणजे जुन्या वेळची शक्ति निर्माण करण्याचीं स्थानें आहेत. त्यांच्यावर दाब ठेवणें ब्रिटिश सरकारला आपल्या हिताच्या दृष्टीनें अवश्यक वाटणें अत्यंत स्वाभाविक आहे.

पण त्यावेळीं महाराजांच्या मनांत असें कांहीं विचार आले असणें शक्य नाहीं. त्यांचें मन आपल्यावर नवीनच येऊन पडलेल्या जबाबदारींत गुंतलें होतें. राज्यशास्त्राविषयीं त्यांनीं जीं तत्त्वें आपल्या गुरूजवळ पठन केलीं होतीं तीं अमलांत करीं उतरवितां येतील या विचारांत ते होते.

सुदैवानें एक गोष्ट अनुकूल होती. श्रीमंत सयाजीराव महाराज यांना राज्याची धुरा जी अंगावर घ्यावी लागली ती बरीचशी चांगल्या स्थितींत. मागें दुसऱ्या प्रकरणांत मल्हाररावशाहीचें जें वर्णन आलें आहे, तशा स्थितींत जर महाराजाच्या अंगावर राज्यकारभाराची जबाबदारी येऊन पडती तर मोठी कठिण स्थिति निर्माण झाली असती. १८७५ सालीं बडोद्याची स्थिती आंतबट्ट्याची होती. मल्हाररावांनीं आपल्या सरदार, सावकार व लश्करांतील लोकांना पैसे देण्याऐवजीं सरकारी वसूलाचा बराचसा भाग आपल्या खुशालचेंडू मित्रांना

देण्याचा परिपाठ ठेवला होता. सरकारी दप्तराची स्थिति शोचनीय होती. राजवाड्यांत काय ऐवज आहे, किती जडजवाहीर आहे, याची साधी यादीहि ठेवण्यांत आली नव्हती. सुमारें सहा कोटी रुपयांचें जवाहीर राजवाड्यांत असल्याची खात्रीलायक बातमी बाहेर असून त्याची यादीहि नसावी ही किती शोचनीय गोष्ट होय! प्रजेवर भरमसाट कर लादण्यांत आले होते. आणि इतके कर घेऊनहि लोकांच्या हिताच्या दृष्टीनें फारच थोडें करण्यांत येत होतें.

या स्थितींत सर टी. माधवराव यांनीं दिवाणपद स्वीकारल्यावर, सुधारणा करावयाला सुरवात केली. प्रथम सर माधवराव यांनीं एक मध्यवर्ती सरकाराची स्थापना करून त्याच्या हाताखालीं सतरा मुख्य खातीं निर्माण केलीं. या सर्वांच्यावर मुख्य दिवाण असे. दिवाणी व फौजदारी कायद्यांत फेरफार करण्यांत आले. खंडेराव महाराजांच्या वेळेस दिवाणी व फौजदारी कायद्यांचें प्रबंध रचण्यांत आले होते, पण ते अंमलांत आणणारीं चांगलीं माणसें न मिळाल्यानें न्यायाची पुष्कळ वेळां विटंबनाच होत असे. तेव्हां या बाबतींत प्रथम सुधारणा घडवून आणणें इष्ट होतें आणि त्याप्रमाणें सर माधवराव यांनीं केलें. जमीन महेसूलाच्या बाबतींतहि सुधारणा करून रयतवारी पद्धति सुरू करण्यांत आली. प्रत्येक शेतकऱ्यानें आपला कर परस्पर सरकाराला जाऊन भरवा अशी व्यवस्था करण्यांत आली. बडोदें शहरांतहि पुष्कळच सुधारणा करण्यांत आल्या. शहरांत पाण्याचा पुरवठा करण्याकरितां व संस्थानभर वैद्यकीय मदत देण्याकरितां योजना तयार करण्यांत आल्या.

पण या सर्वांकरितां पैसा हवा. तो कोठून आणावयाचा ? पौराणिक काळांत इच्छिलेल्या वस्तू देणाऱ्या कल्पलता व कल्पवृक्ष असत. ज्याला जें हवें असेल त्यानें त्या लतेजवळ किंवा वृक्षाजवळ जाऊन त्याची इच्छा करावी. त्याला तें ताबडतोब मिळे ! ही सोय आतां

कोठून पैदा करावयाची ? पण पैदा करतां आली नाहीं म्हणून स्वस्थ थोडेंच बसावयाचें. सध्याच्या काळांत कल्पलता व कल्पवृक्षाची बरोबरी जर कोणाला थोड्याफार अंशानें करतां येत असेल तर ती आपण बचत टाकून संग्रह केलेल्या द्रव्याला. येवढ्याकरितां काटकसरीनें वागून कांहीं बचत टाकतां आलें तर पाहावें या हेतूनें सर माधवराव यांनीं प्रयत्न सुरू केले. त्यांना पुष्कळ खर्च असे सांपडले कीं, जे सहज कमी करतां येतील. खुद्द राजवाड्यांतच पुष्कळ अस्थानीं व अयोग्य खर्च होई. राजाच्या राजवाड्यांत कद्रूपणा काय कामाचा ? राजवाडा म्हणजे तो राजवाडाच. तिथें औदार्य, दुर्लक्ष, विपुलता यांचें साम्राज्य असावयाला पाहिजे, अशी त्या वेळच्या राजांची समजूत असे. पण या नव्या मनूंत हें सर्व पालटलें. मल्हाररावांच्या आश्रितांच्या पगारांत कपात करण्यांत आली व इतर गाणारे, बजवय्ये, पहिलवान वगैरे लोकांत नवीन नेमणुका करण्याचें बंद झालें.

यानंतर बचत करायला दुसरी जागा म्हणजे दानाप्रीत्यर्थ होणारा अमर्याद खर्च ही होय. सरकारी उत्पन्नापैकीं सुमारें एक चतुर्थांश उत्पन्न या दानापायीं जाई ! इतक्या विलक्षण कल्पना या दानधर्मासंबंधीं मल्हारराव महाराज व पुढें महाराणी जमनाबाई यांच्या होत्या. मल्हारराव एरवीं कसेहि असले तरी अत्यंत धार्मिक होते. संस्कृत भाषा, संस्कृत शास्त्री व ब्राह्मण यांच्याविषयीं त्यांना परम आदर असे. त्यांच्याच अमदानींत बडोद्यांत तीनचार वेदशाळा स्थापन झाल्या होत्या. खंडेराव महाराजांप्रमाणेंच त्यांच्या अमदानींत पंडितांचा सत्कार होई. इतकेंच नाहीं तर सुमारें सात हजार हिंदु व तीन हजार मुसलमान यांना खिचडी वाटण्यांत येई. खिचडी ही त्यावेळची एक संस्थाच होती. बडोद्यांत केदारेश्वराच्या देवळाजवळ ही खिचडी मिळण्याची व्यवस्था होती. हल्लीं जिथें कीर्तिमंदिर बांधलें जात आहे. तिथें पूर्वी

खिचडी घ्यायला आलेल्या लोकांची मोरे झिमड जमलेली असे. खिचडी घेतल्यावर ताबडतोब ती देऊन दुसऱ्या जिनसा विकत घेतां याव्यात म्हणून व्यापाऱ्यांचीं दुकानें असत. आणि अशा तऱ्हेनें वर्षभर मिळत राहणाऱ्या खिचडीवर लोकांना प्रपंचाला लागणाऱ्या सर्व वस्तू सहजीं मिळत. हे खिचडीखाऊ बुभुक्षित लोक त्या वेळच्या राजांना भरल्या-पोटीं आशीर्वाद देत असतील यांत शंका नाहीं. लोकांच्या मनावर खिचडीचा नकळत इतका परिणाम झालेला दिसतो कीं, बुभुक्षित भणंगाला बडोद्यांत खिचडीखाऊ म्हणण्याचा प्रघात आहे. या खिचडी-पाई सरकारचें सालींना सुमारें तीस लक्ष रुपये खर्च होत. आणि यामुळें खरोखर लोकांची स्थिति कांहीं सुधारत होती असें मुळींच नाहीं. उलट या खिचडीनें ऐदी, निरुद्योगी, खुशालचेंडू लोकच फार निर्माण केले. खिचडी घेणारे पुष्कळ वेळा चांगले प्रतिष्ठित असत. आणि अशा लोकांना रोज खिचडी घ्यायला न जातां एकदम आठ आठ दिवसांची खिचडी मिळूं शकत असे. चांगलीच सोय होती म्हणावयाची! प्रतिष्ठित म्हणून घरीं बसावें व खिचडीचें सेवन करावें!

अर्थात हें सर्व होत होतें तें त्या त्या राजांच्या दृष्टीनें चांगल्या हेतूनेंच होत होतें. पारमार्थिक कल्याण आपण जोडीत आहोंत अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. आणि त्या कल्पनेप्रमाणें ते हा धर्म-मार्ग अवलंबित होते. आपल्या धर्मकल्पना वेगळ्या प्रकारच्या असतात व आहेत. यामुळें सर माधवराव यांना या बाबतींत एकदम कांहीं बदल करतां येईना. विशेष अडचणीची गोष्ट म्हणजे स्वत: जमनाबाईसाहेब याच अशा प्रकारच्या दानधर्माला सर्वस्वीं अनुकूल होत्या. त्यांच्या अमदानींत तर ब्राह्मणांना इच्छाभोजनें मिळत. त्यामुळें तात्पुरती सुधा-रणा म्हणून सर माधवराव यांनीं मुसलमानांना जो फुकट खाना मिळत

असे तो १८७८–७९ सालीं अजिबात नाहींसा करून राजवाड्यांतील खर्चांत दहा हजार रुपयांची बचत केली.

अशा तऱ्हेनें निरनिराळ्या खात्यांत काटकसर व सुधारणा करून सर टी. माधवराव यांनीं महाराजांच्या हातीं जेव्हां राज्यसूत्रें दिलीं तेव्हां बडोद्यांत राज्यकारभाराला पूर्ण नसली तरी बरीच स्थिरता प्राप्त झाली होती यांत शंका नाहीं. महाराजांनीं जेव्हां राज्यकारभार आपल्या हातीं घेतला तेव्हां जुनी कर्जफेड व्यवस्थित करूनहि संस्थानाच्या तिजोरींत दीड कोटी रूपये शिल्लक असलेले त्यांना आढळले. अर्थात् हा सर्व सर माधवराव यांचाच प्रताप. सर माधवराव यांच्याच वहिवाटींत बांधकामखात्याची चांगल्या पायावर पुनः उभारणी करण्यांत आली. देशी शाळाखात्याची स्थापना, बडोदा कॉलेजची स्थापना, वैद्यकीय खात्याची स्थापना वगैरे सुधारणाहि याच वेळीं झाल्या. आणि सर टी. माधवराव यांनीं बडोदें संस्थानांत दिवाण या नात्यानें केलेल्या कामगिरीकडे लक्ष देऊनच सरकारनें त्यांना राजा ही मानाची पदवी १८७७ मध्यें बहाल केली.

## प्रकरण पांचवें

# राज्यतंत्र कीं राज्ययंत्र

सर टी. माधवराव यांनीं बडोद्याच्या राज्यकारभारांत बरीच महत्त्वाची प्राथमिक तयारी करून महाराजांच्या हातांत राज्यसूत्रें कशीं दिलीं हें आपण पाहिलें. यानंतर राज्यकारभाराचा सारा भार महाराजांनाच वहावा लागला. त्या वेळेपासून महाराजांच्या मनांत वेगवेगळ्या सुधारणा करण्याचें फार होतें व अजूनहि आहे. त्यांनीं आपल्या पन्नास पंचावन वर्षांच्या कारकीर्दीत सुधारणा इतक्या मोठ्या व इतक्या सरस घडवून आणल्या आहेत कीं, याच्यापुढें त्यांच्यापेक्षां जास्त सुधारणा क्वचित्च कोणाला करतां येतील. तरीपण स्वत: महाराजांना आपण केल्या त्यांपेक्षां जास्त गोष्टी करूं शकलों असतों असें नेहमीं वाटतें.

त्यांना अशा प्रकारच्या स्थितींत राज्यकारभार हातीं घ्यावा लागला कीं, ज्यावेळीं प्रत्येक लहान सहान गोष्टींतहि त्यांना लक्ष द्यावें लागे. त्यांना किती क्षुद्र गोष्टींत मन घालावें लागे या विषयीं गमतीचीं पण घडलेलीं उदाहरणें प्रसिद्ध आहेत. १८८२ सालीं एके प्रसंगीं ते हत्तीवर बसून रेसिडेन्सींत रात्रीचे गेले असतांना आठ आणे किंमतीच्या मेणबत्त्या खर्च झाल्या. दुसऱ्या दिवशीं हे आठ आणे मंजूर करण्याविषयीं त्यांना विनंती करण्यांत आली ! १८८५ सालीं एका गावांतील शाळेकरितां चार रुपये भाड्याचें घर ठेवावयाचें होतें. त्याकरितां

श्रीमंतांच्या परवानगीची जरूरी भासली ! दाराची कडी निघाली म्हणून त्याकरितां किंवा एखादी सतरंजी फाटली म्हणून ती नवी विकत आणण्याकरितांहि नोकर मंडळी त्यांची परवागी घेत !

या अशा क्षुल्लक गोष्टींत आपल्या आयुष्याचा बराच काल फुकट गेल्याबद्दल महाराजांना वाईट वाटतें. हा काल त्यांना चांगल्या कामीं उपयोगांत सहज आणतां आला असता. पण आजूबाजूची अधिकारी मंडळी कोणत्याहि बाबतींत आपल्या अंगावर जबाबदारी घ्यायला तयार नव्हती. सर्व गोष्टी ते महाराजांच्या निर्णयावर सोंपवीत. ही स्थिति अत्यंत अनुचित होय यांत शंका नाहीं. आणि पुढें महाराजांनीं यांत बदल करण्याकरितां इतके प्रयत्न केले कीं आतां त्यांना असल्या क्षुल्लक गोष्टींकडे मुळींच लक्ष द्यावें लागत नाहीं. सध्याच्या राज्यकारभारांत निरनिराळीं खातीं निर्माण करण्यांत आलीं असून त्या त्या खात्यांत असलेल्या अधिकाऱ्यांना अमुक बाबतींत पूर्ण अधिकार देण्यांत आले आहेत. अमुक रकमेच्या खर्चापर्यंत त्या त्या अधिकाऱ्यानें आपली बुद्धि चालवून खुशाल खर्च करावा, असें सध्यां ठरविण्यांत आलें आहे. अर्थांत वर तपासणी खातें असल्यामुळें या अधिकाराचा दुरुपयोग सहसा होणें शक्य नाहीं. कामाची विभागणी करण्याकरितां अधिकाराची विभागणी करणें अवश्यक असतें, हें तत्त्व महाराजांना पूर्णपणें मान्य असून त्यांनीं आपल्या राज्यांत अशी अधिकाराची विभागणी सर्वत्र केलेली दिसते. प्रत्येक खात्याच्या वर असलेल्या अधिकाऱ्याला विशिष्ट अधिकार असतात. आणि त्याच्यावर असलेल्या दिवाणाला व कौन्सिलला त्याच्यापेक्षां जास्त अधिकार असतात. यामुळें प्रत्येक मनुष्याला स्वतःच्या अधिकारांत आपल्या खात्यांत निरनिराळ्या वेळोवेळीं सुधारणा करतां येतात. अमुक एका मर्यादेपर्यंत तरी आपण स्वतंत्रपणें बुद्धि लढवून एखादी नवी गोष्ट करूं शकूं अशी खात्री अधिकाऱ्याला असल्यानें त्याला आपल्या कामांत आनंद व उत्साह वाटतो.

प्रत्येक गोष्टींत महाराजांना व्यवस्थितपणा फार प्रिय आहे. कांहीं नवीन नियम तयार करण्यांत आल्यास त्यांची अनुक्रमणिका, वर्गवारी उद्देशांचें कथन, कलम, पोटकलमांची व्यवस्थित रचना, अ-ब-क-ड किंवा अशाच सोयीस्कर अक्षरांनीं केलेले नियमांचे भाग इत्यादि गोष्टींकडे त्यांचें इतकें लक्ष असतें कीं, त्या झाल्या नाहींत तर त्यांना मुळींच समाधान वाटत नाहीं. नियम, ठराव, योजना, ठाकठीकपणा या गोष्टींचा त्यांना फार नाद आहे. प्रत्येक योजना त्यांना विशिष्ट चौकटींत बसविल्याखेरीज बरेंच वाटत नाहीं.

अर्थात् अशा फार चौकटी तयार झाल्या कीं त्या सर्वांची मिळून एक लोखंडी चौकट तयार होते. आणि या चौकटींतून प्रसंग विशेषीं निसटणें मोठें कठिण काम असतें, चौकटी निर्माण करण्याचा फायदा असतो, नाहीं असें नाहीं. त्यामुळें कोणत्याहि गोष्टीचा दुरूपयोग होत नाहीं, व पुष्कळ नुकसान होत असलेलें वाचतें. पण एखादे वेळीं एखादी नवीन परिस्थिति निर्माण झाली आणि ती या चौकटींत बसत नसली म्हणजे मग एखाद्या योजनेची गळचेपी होण्याचा संभव असतो.

पण अशावेळीं त्या त्या अधिकाऱ्यानें आपली बुद्धि चालवून विवेक करावा असें महाराजांचें म्हणणें असतें. नियम हे आपल्याकरितां आहेत, आपण नियमांकरितां नाहीं असेंच नेहमीं समजावयाचें. नियमांचें पालन शक्य तितकें व्हावयालाच पाहिजे, पण एखाद्या परिस्थितींत त्यांत बदल करावासा वाटला तरी तो करावा असें महाराजांना वाटतें. आणि हें त्यांचें म्हणणें पूर्णपणें संयुक्तिक आहे असें कोणालाहि वाटेल. हिंदुधर्मशास्त्राकडे पाहिलें असतां याचें प्रत्यंतर आढळतें. मूळ अमुक एका परिस्थितींत धर्मनियमांची निर्मिती झाली. ते नियम श्रुति नांवाच्या एका लोखंडी चौकटींत बसविण्यांत आले. पण पुढें काळ व परिस्थिति

झपाट्यानें इतकी बदलूं लागली कीं, मूळचे नियम पाळणें कठिण होऊन बसलें. तेव्हां चांगल्या जाणत्या ऋषींनीं मूळ नियम करणाऱ्यांची इच्छा लक्षांत घेऊन पूर्वीच्या नियमांचा निराळ्या पद्धतीनें अनुवाद करून विविध स्मृती निर्माण केल्या. या स्मृती निर्माण झाल्या याचा अर्थ मूळचे नियम वाईट होते असा नाहीं; तर ते आतां गैर लागू झाले. पुढें आणखी परिस्थिति पालटली तेव्हां निरनिराळे निबंधकार निर्माण झाले, व त्यांनीं त्यावेळीं नियमांत अनुकूल फेरफार केले.

पण हें सर्व होऊनहि नियम नको असें कोणींच कधींहि म्हटलें नाहीं. नियम हे रस्त्याप्रमाणें इच्छित स्थळीं सुखकर रीतीनें व लवकर नेऊन पोंचविणारे असतात. नवीन रस्ते करावयाला किंवा जुनें दुरुस्त करावयाला जसा प्रत्यवाय नाहीं तसेंच नवे नियम करावयाला किंवा जुन्यांत दुरुस्ती करावयाला प्रत्यवाय नसतो व नसावा. स्वतः महाराज साहेब यांची या बाबतींतील विचारसरणी, अत्यंत तर्कशुद्ध व समंजसपणाची आहे. त्यांची तक्रार उलट निराळीच आहे. बुद्धि चालवून, पुढाकार घेऊन, हिमतीनें एखादी नवीन गोष्ट करावयाला आपले लोक सहसा धजत नाहींत असें ते म्हणतात. इंग्रज लोकांच्या ठिकाणीं ही बुद्धि आढळते. पण आपल्या लोकांची वृत्ति गतानुगतिकासारखी असते. ही स्थिति बदलावयाला हवी असें ते वारंवार म्हणत असतात. आणि त्यांच्या आयुष्याकडे पाहिलें असतांना त्यांनीं स्वतः अशा प्रकारें पुढाकार घेऊन किती तरी गोष्टी करून दाखविल्या आहेत. अर्थात् कोणी असें म्हणेल कीं, त्यांची परिस्थिति निराळी होती व आहे. हें म्हणणें थोडेसें खरें आहे, पण त्यामुळें आपण दोषांतून मुक्त होतों असें नाहीं.

महाराजांनीं आपल्या राज्याची परिस्थिति लक्षांत घेऊन विशिष्ट प्रकारचें राज्यतंत्र निर्माण केलें. तें तयार करीत असतांना त्यांना किती

तरी श्रम पडले. कारण अशा प्रकारचें नियमबद्ध राज्यतंत्र संस्थानांत पूर्वी तयार नव्हतें. सर टी. माधवराव यांचा कारभार चांगला झाला. पण त्यांच्या अमदानींत व्यवहाराला नियमबद्धता आली नव्हती; ती नियमबद्धता महाराजांनीं आणली. अमुक परिस्थितींत अमुक सरकारी नोकरानें कसें वागावें, याचें शास्त्र बडोद्यांत अगदीं ठरून गेलें आहे. त्यामुळें कुठलाहि व्यवहार व्यवस्थित होतो यांत शंका नाहीं. पण त्याच्याचबरोबर तो व्यवहार रुक्ष व पुष्कळ वेळां कंटाळवाणाहि होतो. त्यांत ठराविकपणा फार उत्पन्न झाल्यामुळें तो जीवंत आहेसें वाटत नाहीं. महाराजांच्या राज्यतंत्रांत एकप्रकारें कांहींशी अपरिहार्य अशी ही एक उणीवच आहे. त्यांचें राज्यतंत्र एखाद्या यंत्राप्रमाणें ठराविक गतीनें, ठराविक पद्धतीनें, ठराविक काम करणारें बनलें आहे. सुदैवानें ते हयात असल्यामुळें त्यांच्या राज्यतंत्राचें हें यांत्रिक स्वरूप कोणाला फारसें अपायकारक होत नाहीं. ते स्वतः लागलीच त्यांत अनुकूल व योग्य फरक करतात. पण अशी स्थिति नेहमींच टिकेल असें म्हणवत नाहीं. चांगले समंजस अधिकारी नियमांची अंमलबजावणी करावयाला असल्यावर मग मात्र फारसा त्रास होणार नाहीं असें आज वाटतें.

स्वतः महाराजांना देखील या यंत्रापासून कांहीं कमी त्रास होत असेल असें वाटत नाहीं. त्यांच्या जीवनालाहि एक प्रकारचें यांत्रिक स्वरूप प्राप्त झालें आहे. त्यांत मानवी अपूर्णतेचा अंशहि नाहीं. पण त्याच्याचबरोबर मानवी सुखदुःखें त्यांत नाहींत. आणि अशा परिस्थितीमुळें आयुष्यांत आनंद, केवल आनंद, असा महाराजांना क्वचितच प्राप्त होत असेल असें आम्हांला वाटतें. आपण निरलसपणें प्रजाहिताचें काम करीत आहों या जाणिवेचें त्यांना समाधान वाटत असेल. पण समाधान आणि आनंद या दोन अगदीं निराळ्या वस्तु

आहेत. समाधान म्हणजे तें समाधानच ! कांहीं उपाय नाहीं असें समजून मनुष्य समाधान मानतो. आनंदाचें तसें नाहीं. कांहीं जिंकून मिळविल्याचा तो आनंद असतो. इच्छिलें होतें त्यापेक्षां अपरंपार मिळालें, वाटलें होतें त्यापेक्षां अधिक सुलभतेनें मिळालें, असें एखाद्याला स्वतःविषयीं वाटूं लागलें कीं त्याला आनंद होतो. येथें एका जुन्या म्हणीची आम्हांला आठवण होते. आंधळ्यानें मागितला एक डोळा देवानें दिले दोन. त्यामुळें त्या आंधळ्याला खचित् आनंद झाला असेल. एकच डोळा मिळता तर त्यानें समाधान मानलें असतें. पण दोन मिळाल्यामुळें तो आनंदानें नाचूं लागला. समाधान आणि आनंद यांतील फरक म्हणतात तो हाच. महाराजांच्या कार्यक्षम राज्ययंत्रामुळें महाराजांना समाधानाचें सुख मिळत असेल, पण आनंदाचें ऐश्वर्य खचित् मिळत नसेल. अशा परिस्थितींतहि ते राज्यकट उत्साहानें हांकीत आहेत हें पाहून त्यांच्याविषयीं कोणाला कौतुक व आदर वाटणार नाहीं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. ४८३
शाखा (स्थळ)

## प्रकरण सहावें

# गृहसौख्य

येथपर्यंत आपण महाराजांच्या चरित्राची सार्वजनिक बाजू अवलोकिली. आतां कांहीं वेळ महाराजांच्या संसाराकडे वळून तेथें काय काय घडलें तें पाहूं या.

महाराजांचें पहिलें लग्न ता. ६ जानेवारी १८८० रोजीं झालें. पण त्याच्या पूर्वी वधुसंशोधनाचें कार्य बरेच दिवस चालू होतें. या कामासाठीं गुप्त वेषानें तसेंच उघडपणें बरेच विश्वासू लोक पाठविण्यांत आले. त्याचा परिणाम असा झाला कीं, महाराणी जमनाबाईसाहेबांकडे परिचय पत्रिका, जन्मलग्नकुंडल्या, फोटो वगैरे खूपच येऊं लागले. ज्योतिषांनीं व इतर शास्त्र्यांनीं या जन्मलग्नकुंडल्या पाहून त्यांतील कुठली कुंडली महाराजांना सर्वांत चांगली आहे हें पाहण्यांत आपला वेळ घालवावयाला सुरवात केली.

सर टी. माधवराव स्वत: पुण्यांतील कांहीं उच्च मराठ्यांच्या मुली पाहावयाला गेले. पण तेथील मुलींपैकीं एकहि त्यांना पसंत पडेना. आतां काय करावें, असा जमनाबाईसाहेबांना प्रश्न पडला. त्यांनीं शेवटीं सर टी. माधवराव यांना मुंबई इलाख्याच्या बाहेरच वधुसंशोधन करावयाला सांगितलें. आणि दैवयोगाहि त्याच दिशेनें अनुकूल होता. कावेरी नदीच्या किनाऱ्यावर एक कुमारिका महाराजांकरितां तपश्चर्या करीत बसली होती. तंजावर येथें सर टी. माधवराव यांना महाराजांना

सर्वस्वीं अनुरूप अशी वधु आढळली. ही मुलगी म्हणजे राजकन्या लक्ष्मीबाई ह्या होत. तंजावर येथील मोहित्यांच्या राजघराण्यापैकीं लक्ष्मीबाई होत्या. त्यांचें वय त्यावेळीं चौदा वर्षांचें होतें. तंजावरचें घराणें इतिहासप्रसिद्ध असल्यामुळें सर टी. माधवराव यांची पसंदगी जमनाबाईसाहेबांना आवडली. मुंबई सरकारनेंहि या लग्नाला ताबडतोब संमति दिली.

दुसरें, ताराराजे यांचें लग्न व्हावयाचें होतें. त्यांच्याकरितां सावंतवाडीचे राजेसाहेब रघुनाथराव वर नेमस्त करण्यांत आले. हीं दोन्हीं लग्नें बडोद्यांत एकाच वेळीं करण्याचें ठरलें. मोहित्यांकडील मंडळी व सरदेसाई यांजकडील मंडळी बडोद्यांत आली. पण लग्नतिथीविषयीं ज्योतिषांचीं भांडणें मिटेनात. जी तिथी सयाजीराव महाराज यांना अनुकूल आहे असें त्यांच्या ज्योतिषांना वाटे, तीच तिथी लक्ष्मीबाईना प्रतिकूल आहे असें त्यांचे ज्योतिषी म्हणत ! शिवाय दोन्ही गोष्टी जुळून आल्या तरी ताराराजे यांच्या लग्नाकरितां तिथी अनुकूल मिळेना. शेवटीं दोन्हीं लग्नें बरोबर करण्याचा पूर्वीचा विचार एकीकडे सारून ताराराजे यांचें लग्न ता. २१ डिसेंबर १८७९ रोजीं उरकरण्यांत आलें. त्यानंतर महाराजांच्या लग्नाची तारीख ६ जानेवारी ही नक्की ठरली. लग्नाची तिथी नक्की ठरल्यावर मग उत्साहाला काय पारावार ? सारें शहर ध्वजापताकांनीं शृंगारण्यांत आलें. जिकडे तिकडे प्रचंड कमानी उभारण्यांत आल्या. हत्ती, घोडे, उंट मिरवणुकींत होते. रस्त्याच्या दुतर्फा लश्कर व पोलिस उभे होते. देशी व विदेशी वाद्यांचा जिकडे तिकडे गजर होत होता. महाराजसाहेबांची स्वारी दुपारीं तीन वाजतां जुन्या राजवाड्यांतून निघून प्रथम राजराजेश्वरीं लक्ष्मीबाईंच्या काकांचा आशीर्वाद घ्यावयाला गेली. तेथें गव्हर्नरजनरल यांचे एजंट त्यांना सामील झाले. तेथून सर्व मंडळी नजरबाग राजवाड्यांत लग्नाकरितां आली.

नजरबाग राजवाड्याची शोभा या प्रसंगीची काय वर्णावी ? देवतांच्या पूजा, ग्रहांची शांती, सर्वसाधारण देवप्रार्थना सारख्या सुरू होत्या. लग्नाची वेळ जवळ आली, तसें वधुवरांना अंतरपटाआड उभें करण्यांत आलें. मंगलाष्टकें म्हणायला सुरवात झाली, वधुवरांच्या मस्तकावर मंगलाक्षता पडूं लागल्या, आणि शेवटीं पाणीग्रहण विधि झाला. मोहित्यांनीं आपली पुतणी सयाजीराव महाराजांना विधिपूर्वक अर्पण केली. आणि अशा तऱ्हेनें हा परम मंगल समारंभ पार पडला.

या लग्नानंतर दहाच दिवसांनीं हल्लींच्या लक्ष्मीविलास राजवाड्याची कोनशिला बसविण्याचा समारंभ झाला. सर रीचर्ड टेंपल यांनीं ही कोनशिला बसविली. लक्ष्मीविलास हें नांव राणीसाहेबांच्या नांवावरून महाराजांना सुचलें. लग्नानंतर लक्ष्मीबाईचें नांव महाराणी चिमणाबाई ठेवण्यांत आलें.

महाराणी चिमणाबाई ह्या स्वभावानें अत्यंत शांत, प्रेमळ व पतिनिष्ठ होत्या. त्यांचा जन्म उच्च कुलांत झाला असल्यामुळें त्या जन्मतःच शालीन होत्या. आपल्या पतीच्या सुखाकरितां त्या अहर्निश झटत. त्या जितक्या मनानें सुंदर तितक्याच रूपानेंहि होत्या. त्यांचें तैलचित्र येथील राजवाड्यांत पहावयाला सांपडतें. त्यावरून त्यांच्या रूपाची बरीच कल्पना करतां येते. चिमणाबाईसाहेबांच्या प्रेमळ पतिपरायण स्वभावामुळें महाराजांचें त्यांच्यावर खूप प्रेम होतें. चिमणाबाईसाहेबांना प्रथम एक कन्या झाली. ती लहानपणींच वारली. त्यानंतर फत्तेसिंहराव जन्मास आले. पण हे आईच्या मूळावर जन्मास आले असावेत असें दिसतें. कारण त्यांच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे ता. ७ मे १८८५ रोजीं महाराणी चिमणाबाईसाहेब कालवश झाल्या. त्यांच्या मृत्युमुळें महाराजांना फार शोक झाला. बरेच दिवस त्यांची प्रकृति बरी नव्हती. रात्रींची त्यांना झोंपहि येईना. तेव्हांपासून

महाराजांना जो निद्रारोग लागला आहे तो अजूनहि पूर्णपणें बरा झालेला नाहीं.

महाराणी चिमणाबाईसाहेब यांच्या प्रेमळ स्वभावाचा महाराजांच्या मनावर इतका परिणाम झाला होता कीं, चिमणाबाई न्यायमंदिराची ता. २८ मे १८८५ रोजीं कोनशिला बसवीत असतांना ते म्हणाले, " कैलासवासी महाराणी साहेबांच्या ठिकाणीं वसत असलेल्या सद्गुणांचें स्मारक मला उभारावेंसें वाटत आहे. मला त्यांच्याविषयीं अत्यंत आदर असे. त्या नम्र, दानशील, प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्या एकनिष्ठ माता होत्या व प्रेमळ पत्नी होत्या." या शब्दांवरून महाराजसाहेबांना महाराणीसाहेबांविषयीं काय वाटत होतें हें स्पष्ट होतें.

महाराजसाहेबांचा दुसरा विवाह सध्यांच्या महाराणीसाहेबांबरोबर २८ डिसेंबर १८८५ रोजीं झाला. ह्या देवास येथील सरदार बाजीराव अमृतराव घाटगे यांच्या कन्या होत. यांचें माहेरचें नांव गजराबाई होतें. सासरचें नांव दुसऱ्या चिमणाबाई ठेवण्यांत आलें.

सध्यांच्या महाराणी चिमणाबाईसाहेब याहि पतिनिष्ठ असून शिवाय पतीच्या निरनिराळ्या सुधारणांच्या कामीं त्यांना मदत करीत असतात. स्त्रियांच्या उन्नती प्रीत्यर्थ त्यांनीं फारच परिश्रम घेतले आहेत. स्त्रीशिक्षणाच्या कामांत तर त्यांनीं विशेषच लक्ष पुरविलें आहे. बडोदें येथें त्यांच्या नांवांनीं दोन इंग्रजी हायस्कुलें व एक स्त्रियांचें कॉलेज अशा तीन शिक्षणसंस्था सुरू असून त्या भरभराटीच्या स्थितींत आहेत. आपल्या सुधारक पतींचे विचार त्यांनीं आत्मसात केले असून पडद्याच्या चालीसारखी अनिष्ठ चाल त्यांनीं १९१४ सालीं जाहीर रीत्या सोडून दिली. महाराजांच्या बरोबर त्यांनीं पुष्कळ वेळां युरोप, अमेरिका, जपान वगैरे देशांत प्रवास केल्यामुळें त्यांचे विचार प्रगमनशील व उदार बनले आहेत. आपल्या पतीप्रमाणें त्यांनाहि निरनिराळ्या विष-

यांची आवड आहे. त्यांच्या चेहेऱ्यावरून त्या रुबाबदार व करारी दिसतात.

महाराजसाहेबांच्या इतर परिवाराकडे वळूं या. पहिल्या महाराणी चिमणाबाई यांना एक मुलगी होऊन वारल्याचें वर सांगितलेंच. दुसरें अपत्य म्हणजे फत्तेसिंहराव होत. यांच्या जन्मानंतर त्यांच्या मातुश्री वारल्या. फत्तेसिंहराव दिसायला तरतरित, घोड्यावर बसण्यांत कुशल, शरीरानें किरकोळ असे होते. त्यांचा विवाह निंबाळकर घराण्यांतील पद्मावती नांवाच्या मुलीशीं झाला. यांना इंदुमती व लक्ष्मीदेवी नांवाच्या दोन कन्या व हल्लींचे युवराज प्रतापसिंह अशीं तीन अपत्यें झालीं. युवराज प्रतापसिंह यांच्या जन्मानंतर कांहीं काळानें फत्तेसिंहराव कालवश झाले. त्यावेळीं महाराजांना अपरिमित दुःख झालें. फत्तेसिंहराव एकाएकीं १९०८ सालीं वारल्यामुळें तर त्यांना फारच चटका लागला. बरेच दिवस त्यांना या पुत्रशोकापुढें कांहीं सुचेना. पद्मावतीदेवी यांच्यावर तर हा मोठाच प्रसंग गुदरला. पण त्यांनीं आपल्या पतिमागें आपल्या मुलाबाळांचा सांभाळ फारच चांगल्याप्रकारें केला. आपल्या पतिमागें त्या कांहीं वर्षें जीवंत होत्या. पण आपल्या मुलाबाळांचीं कार्यें पाहण्याचें त्यांच्या नशिबीं नव्हतें. त्यांच्या पश्चात् त्यांच्या दोन्ही मुलींचीं व युवराज प्रतापसिंह यांचीं लग्नें झालीं. इंदुमतीदेवींचा विवाह सध्यांचे कोल्हापूरचे छत्रपति राजाराम महाराज यांच्याशीं झाला व लक्ष्मीदेवींचा विवाह सावंतवाडीच्या सध्यांच्या महाराजांशीं झाला. युवराज प्रतापसिंह यांचा विवाहहि चार पांच वर्षांमागें झाला असून सांप्रत त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें आहेत. बडोद्याचा सयाजीराव महाराज यांचा वंश अशा तऱ्हेनें वाढत असलेला पाहून कोणालाहि आनंदच वाटेल. युवराज प्रतापसिंह यांचें कॉलेजमध्यें प्रिव्हियसपर्यंत शिक्षण झालें असून राज्यकारभाराचें शिक्षणहि त्यांना

भरपूर आणि पुष्कळ दिवस मिळालेलें आहे. सध्यां ते राज्यांतील जबाबदारींचीं कामें पहात असतात. अशा तऱ्हेनें महाराजांच्या मागें राज्यशकट वहावयाला समर्थ असा पुरुष असलेला पाहून समाधान वाटतें. सध्यां युवराज प्रतापसिंह यांचें वय सत्तावीस वर्षांचें असून अजूनहि त्यांना निरनिराळ्या खात्यांची माहिती मधून मधून देण्यांत येतच असते. श्रीमंत सयाजीराव महाराज यांचें लक्ष त्यांच्याकडे विशेष आहे. आणि असें असणें स्वाभाविक आहे. आपण तयार केलेल्या राज्याचा सारा भार आपल्या नातवानें वहावयाला समर्थ व्हावें असें त्यांना वाटत असणें अगदीं योग्य आहे.

सध्यांच्या महाराणी चिमणाबाईसाहेब यांना १८८८ सालीं राजपुत्र जयसिंहराव प्राप्त झाले. त्यानंतर १८९० सालीं राजपुत्र शिवाजीराव यांचा जन्म झाला. पुढें इंदिराराजे यांचा जन्म झाला व शेवटीं १८९३ सालीं राजपुत्र धैर्यशीलराव हे जन्मास आले. जयसिंहराव यांचें शिक्षण हॅरो येथें झालें. तेथून पुढें ते हारवर्ड युनिव्हरसिटींत आपलें शिक्षण पुरें करावयाला गेले. तेथें असतांना त्यानीं बरींच व्यसनें लावून घेतल्यामुळें त्यांची प्रकृति बरीच खालावली. महाराजांनीं त्यांना सुधारण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला पण तो फुकट गेला. अमेरिकेंतून आल्यावर त्यांना राज्यकारभारांत महत्त्वाची जागा देण्यांत आली. पण त्यांच्यावर ठेवण्यांत आलेल्या दाबाला ते मनापासून कंटाळले होते. त्यांचीं व्यसनें कांहीं कमी झालीं नव्हतीं. १९१९ मध्यें ते आजारी झाले, आणि त्यांना उपचाराकरितां युरोपमध्यें पाठवावयाचें ठरलें. पण तेथें त्यांच्या प्रकृतीला मुळींच आराम वाटला नाहीं, आणि ते २७ ऑगस्ट १९२३ रोजीं हॉलंड येथें वारले. त्यांच्या मृत्युमुळें सर्वांना अतिशय दुःख झालें. पण या दुःखापेक्षां रुटरच्या तारेनें उडविलेल्या गोंधळानें सर्वजण चकित होऊन गेले. जयसिंहराव वारले

असतांना रुटरनें नुकतेच बडोद्याचे गायकवाड वारले असें चोहींकडे कळविल्यानें वर्तमानपत्री जगांत खळबळ उडाली. बडोद्याचे गायकवाड म्हणजे सयाजीराव महाराज असें त्यांपैकीं प्रत्येकाला वाटलें. आणि त्यामुळें सर्व प्रमुख वर्तमानपत्रांनीं त्यांच्याविषयीं शोकप्रदर्शक मृत्युलेख लिहिले! त्यावेळीं सयाजीराव महाराज सेंट मॉरिझ येथें होते. वर्तमानपत्रांनीं त्यांच्याविषयीं धन्योद्गार काढले होते. महाराज जीवंत असतांना त्यांच्याविषयीं मृत्युलेख आल्यानें मोठी गंमतच उडाली. लोक आपल्याविषयीं खरोखर काय म्हणतात याचा त्यांना बरोबर अंदाज लागला. आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां—या कव्युक्तीप्रमाणें सयाजीराव महाराज यांना आपल्या मरणाची काल्पनिक वर्णनें ऐकण्याची पाळी आली. बडोद्याचे गायकवाड या शब्दद्वयानें इतका घोंटाळा केला. खुद्द बडोद्यांतहि मोठाच हाहा:कार उडाला. त्या वेळचे दिवाण मनुभाई मेहेता यांनीं सरकारी तिजोरीला सील वगैरे करून पुढें काय होतें हें पाहण्याचें ठरविलें. कारण महाराजांकडून त्यांना चार सहा दिवस पूर्वींच खुशालीची तार आली होती. यामुळें महाराजांच्या मृत्यूची वार्ता त्यांना खरी वाटेना. पण रुटरच्या तारेनें त्यांनाहि घोटाळ्यांत टाकलें. अर्थात मागाहून या प्रकरणाचा निकाल व्यवस्थित लागला. स्वत: महाराजांना जयसिंहराव यांच्या मृत्युनें जबरदस्त धक्का बसला. जयसिंहरावांच्या मागें त्यांच्या पत्नी शकुंतला राजे आहेत. स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ त्या नेहमीं झटत असतात.

राजपुत्र शिवाजीराव यांचें शिक्षणहि विलायतेंतच झालें. लहानपणापासून त्यांची प्रकृति चांगली होती. पण विलायतच्या राहाणीनें त्यांचेंहि शील बिघडलें; व प्रकृति ढांसळली. हिंदुस्तानांत आल्यावर १९२० च्या डिसेंबर महिन्यांत त्यांना न्युमोनियाच्या विकारानें कालवश व्हावें लागलें. त्यांच्या मागें त्यांच्या पत्नी कमलादेवी, पुत्र उदय-

सिंहराजे व खंडेरावराजे व कन्या निर्मलादेवी इतकी मंडळी आहेत. तूर्त त्यांचीं तिन्हीं मुलें शिकत आहेत. उदयसिंहराजे नुकतेच प्रिव्हियस पास झाले असून, खंडेराव मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याच्या तयारींत आहेत. निर्मलाराजे याहि पुणें येथें आपल्या मातोश्रीबरोबर असून मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार आहेत.

राजपुत्र धैर्यशीलराव यांची प्रकृति लहानपणीं अत्यंत नाजूक होती. दोन मुलांच्या बाबतींत झालेली चूक तिसऱ्या मुलाच्या बाबतींत होऊं नये म्हणून महाराजांनीं त्यांना इंग्लिश किंवा अमेरिकन युनिव्हरसिटींत न पाठवितां ईस्टबोर्न कॉलेजांत पाठविलें. तेथील शिक्षणक्रम पुरा करून आल्यावर महाराजांनीं त्यांना राज्यकारभारांतील महत्त्वाच्या खात्यांत शिक्षण घेण्यांकरितां ठेविलें. राजपुत्र धैर्यशीलराव यांनीं इंदोर येथें लश्करी शिक्षणहि घेतलें आहे. कांहीं दिवस ते राज्यकारभाराचें काम पाहात होते. पण अलीकडे त्यांची प्रकृति ठीक राहात नसल्यामुळें ते बडोद्यासच विश्रांति घेत असतात. त्यांच्या पत्नी विमलाराजे ह्या चांगल्या सुविद्य असून त्यांना तीन चार मुलें आहेत. तीं सर्व त्यांच्याच बरोबर असतात.

इंदिराराजे यांचें शिक्षण खाजगी रीतीनें झालें. ग्वाल्हेरचे माधवराव महाराज शिंद्यांशीं त्यांचा विवाह करण्याचें घाटत होतें. स्वतः महाराजांना वधुवरांच्या वयांतील अंतर पाहून या विवाहाला संमति द्यावीशी वाटत नव्हती. पण दोन घराण्यांत चांगला संबंध जुळविण्याकरितां त्यांनीं कबुली दिली. वास्तविक हें करणें एका दृष्टीनें गैर होतें. माधवरावमहाराज शिंदे यांची पहिली बायको जीवंत असतांना त्यांना इंदिराराजे लग्नांत देणें बरोबर नव्हतें. इंदिराराजे यांनीं इकडे लग्नाची वाटाघाट चालली असतांना लंडन येथें कुचबिहारच्या राजाशीं ब्राह्मो पद्धतीनें लग्न लावलें. त्यावेळीं या लग्नाची सर्वत्र फार चर्चा झाली.

स्वत: महाराजांनाहि त्यावेळीं हें लग्न फारसें बरें वाटलें नाहीं. पण ते इंदिराराजे यांच्या आड आले नाहींत. इंदिराराजे यांनीं आपल्यावर जबाबदारी घेऊन अनिष्ट रुढींचें निर्मूलन केलें याबद्दल आम्हांला बरें वाटतें. कुचविहारचे महाराज कांहीं वर्षांपूर्वी वारल्यामुळें महाराणी इंदिराराजे या आपल्या मुलाच्या बाल्यावस्थेंत राज्यकारभार बघत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या महाराजांच्या संसारकथेवरून ती इतर चार संसार—कथांप्रमाणेंच सुखदु:ख मिश्रित कशी आहे हें सहज दिसून येईल. आपलीं नातवंडें चांगलीं शिकून सवरून मार्गाला लागलीं आहेत हें पाहून त्यांना मनांत समाधान वाटत असेल. पण या समाधानाचें रुपांतर आनंदांत होण्याचें भाग्य त्यांना नाहीं. पहिल्या पत्नी वारल्या त्यांचा शोक, आणि सर्वांत हद्द म्हणजे तीन तरुणबांड अशा पुत्रांच्या मृत्युमुळें होणाऱ्या शोकाची. या एकामागें एक अशा पुत्रनिधनामुळें महाराजांच्या भावनांना जो एक धक्का बसला आहे तो कायमचाच. पुत्रजन्मासारखा आनंद नाहीं आणि पुत्रनिधनासारखा शोक नाहीं, असें म्हणतात. श्रीमंत महाराज व श्रीमंत सौ. महाराणीसाहेब या दोघां-नाहि पुत्रशोकामुळें आयुष्यांत मुळींच बरें वाटत नसेल. कांहींहि झालें तरी मनुष्य रोजचा व्यवहार करावयाचें सोडत नाहीं. हें जरी खरें असलें तरी त्या व्यवहारांत त्याला गोडी वाटत नाहीं. व्यवहार करावयाचा म्हणून तो करतो. अगदीं उदासीनपणें करतो.

महाराजांच्या जीवनाविषयीं असेंच म्हणतां येईल. त्यांच्या कामांत खंड पडलेला कधीं कोणी पाहिलेला नाहीं. नेमल्या वेळीं कांहींहि झालें तरी ते तें काम केल्याखेरीज राहात नाहींत. पण त्यांनीं अगदीं घड्याळांतील काट्याप्रमाणें व्यवस्थित काम केलें म्हणून ते आपला शोक विसरले आहेत असें नाहीं. गीतेंत सांगितलेल्या उदासीनवृत्तीनें ते आपलें कर्तव्य करीत असतात. आणि आज इतकीं वर्षें अशा प्रकारचें काम

करीत राहिल्यानें त्यांची वृत्ति स्थितप्रज्ञासारखी बनली आहे. शोकानें ते विव्हळ होत नाहींत, किंवा आनंदानें हुरळून जात नाहींत. 'सुख-दुःख समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ' वगैरे गीतावचनांत सांगितल्या-प्रमाणें ते बरोबर वागत असलेले आढळतात.

महाराजांच्या ठिकाणीं सुखदुःखाच्या भावना नाहींत असें आम्हांला मुळींच म्हणावयाचें नाहीं. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानें भावना-धीन कसें होऊं नये हें ते बरोबर शिकले आहेत. महाराजांच्या आयुष्यांत निर्भेळ आनंद त्यांना कधीं वाटला असेल असें आम्हांला वाटत नाहीं. कर्तव्याच्या खडतर मार्गानें आजपर्यंत ते चालत आले आहेत. स्वतःच्या सुखदुःखाची पर्वा करावयाला त्यांना वेळ कुठें आहे ? 'मला खाजगी आयुष्य नाहींच कसें तें' असें ते म्हणतात. या म्हणण्यांत दुःखाची छटा स्पष्ट दिसते. आपणाला हवें असलेलें प्रेम, निर्मळ निस्वार्थ प्रेम, महाराज झाल्यापासून आपणाला कधीं मिळालें नाहीं, प्रत्येकानें महा-राज महाराज म्हणून आपल्या पासून दूर रहावें असेंहि ते म्हणतात. गृहसौख्य म्हणून ज्याला म्हणतात तें महाराजांना फारच थोडें मिळालें असेल. राज्यशकट वाहण्यांतच त्यांच्या आयुष्यांचा सारा काळ गेला. आपल्या मुलाबाळांची व नातवंडांची ते काळजी वहातात. पण या नातवंडांना महाराजांचें आपल्यावर प्रेम आहे असें वाटत नाहीं. याचें कारण म्हणजे त्यांची वागणूकच अशी उदासीन आहे. साऱ्या गोष्टी ते कर्तव्य म्हणून करतात. आणि म्हणूनच त्यांच्या आयुष्यांत जरा रखरखीतपणाच आढळतो. त्यांच्या जीवनांत कर्तव्याचा कठोरपणा ओतप्रोत भरला आहे, पण प्रेमाचा जिव्हाळा त्यांत नाहीं.

अर्थात् ते ज्या स्थानावर बसले आहेत त्याच्या दृष्टीनें हा मोठा गुणच होय. राजा हा व्यक्तिशः स्वतःच्या सुखदुःखातीत असावा. तो आपल्या सुखांत किंवा दुःखांत जर चूर होऊं लागला. तर राज्यकार-

भाराला खीळ बसेल. त्याची दृष्टि आपल्या प्रजेकडे असावी. त्यानें प्रजेच्या सुखदु:खाची पर्वा करावी. राजाची वृत्ती संन्याशाच्या वृत्ती-सारखी सुखदु:खातीत असावी. श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या आयुष्याकडे पाहिलें असतांना हीच गोष्ट प्रत्ययास येते. त्यांनीं स्वत:चा संसार केला; नाहीं असें नाहीं. पण तो संसार करीत असतांना ते त्यांत गुरफटून गेले नाहींत. आपल्या राज्यसंसाराची त्यांना कधींहि विस्मृति झाली नाहीं, व होत नाहीं. एकवेळ त्यांना स्वत:च्या संसा-राचा विसर पडेल. पण राज्याचा संसार ते कधींहि विसरणार नाहींत. कारण कर्तव्याची जाणीव त्यांच्या ठिकाणीं इतकी प्रखर आहे.

# प्रकरण सातवें

# बापट कमिशन

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धांत गाज- लेल्या प्रकरणांत बापट कमिशनची गणना प्रामुख्यानें करावयाला हवी. १८९४–९५ सालीं बडोदें संस्थानांत व बाहेरही सर्वांच्या तोंडीं बापट कमिशनच्या गोष्टी असत. या कमिशनची हकि- कत श्री. न. चिं. केळकरकृत लो. टिळक यांचें चरित्र, भाग पहिला यात आली असून ती फारच उद्बोधक आहे. ती जशीच्या तशीच मुळांत वाचण्याजोगी आहे. पण येथें तिच्यांतील महत्त्वाचा भाग दिल्याखेरीच आमच्यानें रहावत नाहीं.

बापट म्हणजे वासुदेव सदाशिव बापट. बापट हे रत्नागिरी जिल्ह्यांत एका गरीब घराण्यांत जन्मले. ते मोठे तरतरित व बुद्धिमान्; पण कॉलेजचा खर्च झेंपण्याचें त्राण त्यांच्या अंगीं नव्हतें. कॉलेजांत अस- तांच त्यांना बडोद्यास नोकरी मिळाली. यावेळीं बडोद्यास रेव्हेन्यु सर्व्हे सेटलमेंट खात्याचे मुख्याधिकारी मि. इलियट होते. त्यांची मर्जी बापटांवर बसून त्यांनीं त्यांना प्रथमच चाळीस रुपयांची नोकरी दिली. यापुढील मार्ग बापटांनीं झपाट्यानें आक्रमिला. १८८६ सालीं त्यांचा प्रवेश इलियट साहेबांच्या खात्यांत होऊन, तीन वर्षांनीं ते साहेबांचे खास मदतनीस झाले. व १८९४ पूर्वींच त्यांचा पगार पावणेसातशें पर्यंत वाढला होता. त्यांच्यावर खटला होऊन मध्येंच इतिश्री झाली

नसती तर ते नायब दिवाणाच्या जागेपर्यंत चढण्याचा फार संभव होता. इलियट साहेबांची मर्जी बापटांवर इतकी वाढली कीं, बापटांनीं सांगावें आणि इलियट साहेबांनीं ऐकावें असा लोकांचा समज होऊन बसला. खरोखरच बापटांनीं बडोद्यांत आपली कारकीर्द गाजविली. त्यांचे ते घारे डोळे, पांढरा सफेत पोषाख, उमदा काठेवाडी घोडा हीं मनावर परिणाम करण्यासारखीं होतींच. पण त्यांची कारकीर्द गाजली असें दक्षिणी लोकांना वाटण्याला त्यांची कर्तबगारी, पण गुजराती लोकांना तसें वाटण्याला त्यांचा स्वभाव, हाच मुख्य कारणीभूत होता. स्वभावानें ते तापट असत. कोणाची भीड न धरतां टाकून किंवा तोडून बोलण्यांत त्यांचा हातखंडा असे; व गुजराती लोक दक्षिणी लोकांना पाण्यांत पाहातात अशा भावनेनें गुजराती लोकांचें वाटेल तेथें उट्टें काढण्यांत ते कमी करीत नसत. पण साहेबांची मर्जी व बिनमुर्वतखोर स्वभाव या दोषांत तिसऱ्या एका गोष्टीची भर पडून बापटांच्या कारकीर्दीला त्रिदोष सन्निपात झाला. ती म्हटली म्हणजे त्यांचेकडे असलेलें सर्व्हेसेटलमेंट खात्याचें अप्रिय काम.

बापट कमिशनच्या कामांत लो. टिळकांनीं बापटांच्या बाजूनें काम केलें. याला कारण त्यांचा परस्परांतील स्नेह हें होय. पण या कामांत पडण्यांत टिळकांचा हेतु एकेरी नसून सजोड होता. स्नेह्याच्या संरक्षणा· बरोबरच श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कारकीर्दीवर ठपका ठेवण्याचा ब्रिटिश रेसिडेन्सीचा जो गुप्त प्रयत्न या वेळीं जोरांत चालू होता, त्याचा प्रतिकार करावा अशीहि टिळकांची इच्छा होती. बापट कमिशनमध्यें टिळक हे स्वत: जरी आरोपी नव्हते, तरी जणूं काय स्वत: आपणच अपराधी आहोंत अशा भावनेनें त्यांनीं बापटांतर्फे अथपासून इतिपर्यंत मुकदम्याचें सर्व काम चालविलें. नांवाला वकील व बॅरिस्टर दुसरे होते.

बापटांची कारकीर्द संपुष्टांत येण्याला व टिळकांनीं कमिशनच्या कामांत पडण्याला साधारण असें कारण म्हटलें म्हणजे 'बारखळी' उर्फ सेटलमेंट खात्याच्या द्वारें श्रीसयाजीराव यांच्या कारकीर्दीशीं येणारा संबंध हेंच होय; व त्याविषयीं थोडीशी माहिती देणें जरूर आहे. हें खातें १८८३ सालच्या ऑगस्टांत इलियटसाहेबांकडे आलें. पण सगळी मोजणी पुरी न झाल्यामुळें खात्याचें प्रत्यक्ष काम १८८६ पर्यंत सुरू झालें नाहीं. आणि महाराज साहेबांनीं मंजूर करावयाचे नियम तयार होण्यास आणखी तीन वर्षे लागल्यानें, बारखळी पोटखात्याचें काम १८८९ च्या मार्चमध्यें सुरू झालें. या खात्यांत जेन्किन्स, ऑझन, मॅकॉनकी वगैरे गोऱ्या सिव्हिलियन लोकांनीं पूर्वीं सुपरिटेंडेंट म्हणून काम केलें होतें. परंतु त्यांच्या वेळीं कोणत्याहि प्रकारचा गवगवा झाला नाहीं. पण इलियट साहेबांच्या कारकीर्दींत तो झाला. याचें कारण, त्यांच्या कामाला प्रत्यक्ष इनामचौकशीचें स्वरूप येऊन कोणाच्या इनामावर आणेवारीचा आकार बसणें, सनद नसल्यामुळें कोणाचें इनाम सरकारजमा होणें, वगैरे गोष्टी घडून आल्या. इनाम चौकशीचें कामच कोठेंहि लोकांच्या डोळ्यांवर येण्यासारखें असतें. आणि उदाहरणार्थ खुद्द ब्रिटिश अंमलांत, त्यापूर्वीं तीस चाळीस वर्षें इनाम कमिशनच्या कारभारामुळें जो खरा अन्याय किंवा अन्यायाचा गवगवा झाला, त्याहून इलियट साहेबांच्या कारभारांत अधिक घडून आला होता असें नाहीं; तथापि धन्याचा धनी कोणी नाहीं, या म्हणीप्रमाणें मुंबईसरकारच्या इनाम कमिशनविरुद्ध तक्रारी करून कड पोंचविण्याला दुसरी जागा नसल्यामुळें त्या तक्रारींबद्दल कोणाचा घातपात होऊं शकला नाहीं. पण त्याच तक्रारी बडोद्यासारख्या संस्थानांत झाल्यानें एकदम त्यांचें स्वरूप प्रचंड करून भासवितां आलें. पण हें करणारांचा हेतु इनामदारांची

दाद लावण्यापेक्षां महाराज सरकारच्या कारभारावर ठपकाच ठेवण्याचा अधिक होता. सयाजीराव महाराज आपल्या स्वतंत्र बाण्यामुळें, किंबहुना आपल्या उद्योगप्रियतेमुळें, ब्रिटिश सरकारला म्हणजे एजंट, गव्हर्नर जनरल यांना अप्रिय झाले होते. इलियट साहेबांवरहि व्यक्तीश: रेसिडेन्सीचा तसाच कांहीं राग होता. कारण ते महाराजांचे शिक्षक असल्यापासून त्यांना सयाजीरावांचा अभिमान वाटे; व जातीनें इंग्रज असतांहि महाराजांच्या स्वतंत्र स्वाभिमानी बाण्याचें ते कौतुक करीत. रेसिडेन्सीच्या मनांत जेव्हां जेव्हां महाराजांना चेपावयाचें येई तेव्हां तेव्हां इलियटसाहेब महाराजांना खाजगी रीतीनें सल्ला देत, व उघड त्यांची तरफदारीहि करण्यास मागें पुढें पाहात नसत. त्यांतच बापटसाहेबांच्या अप्रियतेची भर पडली. बापट हुशार, तरतरीत, व संस्थानचें काम इमानानें करणारा, म्हणून महाराज व इलियट यांची त्यांच्यावर मेहेर नजर. पण इतर कारणांकरितां लोकांची व रेसिडेन्सीची बापटांवर नाराजी. म्हणून बापटांचे देव्हारे माजवूं देणारे महाराज व इलियट यांच्यावरहि त्यांची नाराजी. पण महाराज, इलियट व बापट हे तिघेहि बडोद्यास असल्यानें तिघांचा जोंपर्यंत एकमेकांस जोर होता, तोंपर्यंत कोणासहि त्यांचें वांकडें करतां आलें नाहीं. पण १८९४ च्या सुमारास असा योग जमून आला कीं, महाराज व इलियटसाहेब दोघेहि विलायतेस गेले; व इकडे बापट एकटे सांपडले. त्याबरोबर, रेसिडेन्सी, इनामदार व बापटसाहेबांचे खाजगी शत्रु हे सर्व एक होऊन त्यांनीं हल्ला चढविला, व तो यशस्वी होऊन बापट कमिशनमध्यें त्याचें पर्यवसान झालें.

इनामाची चौकशी करणें, त्यांच्या सनदा पाहणें, त्यावर योग्य तो आकार बसविणें हें काम बडोदें संस्थानांत, मुंबई सरकारचें पाहून यापूर्वी सुमारें पाऊणशें वर्षेंपर्यंत मधून मधून सुरू होतेंच. पण सर्व

जमिनींची सरसकट मोजणी व सेटलमेंट करण्याचें काम सयाजीरावांच्या कारकीर्दीपर्यंत कोणी केलें नाहीं. याचें कारण हेंच कीं, खंडेराव, मल्हारराव वगैरे अधिपती राज्यकारभारांत पद्धतशीर लक्ष घालणारे नव्हते. राजा सर टी. माधवराव हे सुशिक्षित असतांहि त्यांना या कामाकडे लक्ष घालण्याला वेळ मिळाला नाहीं. १८८९ सालीं नवीन इनाम खात्याचें काम सुरू झाल्याबरोबर इनामदार लोक सहजच खडबडून जागे झाले. खुद्द इलियट साहेबांकडे त्यांच्या खात्याच्या कामाविरुद्ध १८८९ ते १८९२ पर्यंत सुमारें नऊ हजार अर्ज आले, व त्यांची व्यवस्थाहि लागली. याच अवधींत खुद्द महाराजसाहेब व त्यांचे दिवाण यांजकडेहि परस्पर अर्ज होते; पण त्यांची संख्या या चार सालांत दीड पावणेदोनशेंवर गेली नव्हती. असें असतांना बडोद्याचे त्यावेळचे रेसिडेंट कर्नल बिडलफ यांनीं अव्यापारेषु व्यापार करून अर्जदारांना तक्रारी करण्यास उत्तेजन देण्याची सुरवात केली. वास्तविक दरबारच्या अंतर्व्यवस्थेंत लक्ष घालण्याचा ब्रिटिश सरकारास कांहींच हक्क नव्हता; पण संस्थानी दरबारच्या गळ्याभोंवतीं रेसिडेन्सीची तात नेहमींच लागून राहिलेली असते, व ती केव्हां आंवळून गळचेपी करील याचा नेम नसतो. ‘ ब्रिटिश सरकारची देखरेख ’ या शब्दांचा अर्थ इंग्रजसरकारच्या सोयीप्रमाणें हवा तितका संकुचित व हवा तितका विस्तृत होऊं शकतो. पूर्वी कोल्हापूर दरबारांत वतनें व जमिनी सरकारजमा होण्याचे इतके अनुचित प्रकार चालले असतां ब्रिटिश सरकारनें एखादें कमिशन नेमण्यास सुचविल्याचें ऐकिवांत नाहीं. पण सयाजीराव महाराज, इलियटसाहेब व रावसाहेब बापट या त्रिवर्गांच्या रागावर कमिशन नेमण्यापर्यंत बडोद्यांत पाळी आली. महाराज मात्र, ते महाराज म्हणूनच या आगींतून बचावले. इलियट साहेबांना थोडीशी झळ लागली, पण तेहि बचावले. गोऱ्या सिव्हिलियनला प्रत्यक्ष कोण काय करणार ?

राहतां राहिले बापट. तेव्हां ‘ अजापुत्रं बलिं दद्यात् ’ या न्यायानें त्यांना यज्ञपशु बनविण्यांत आलें. १८९२ ते १८९३ या दोन सालीं मिळून सेटलमेंट खात्यावर दोन तीन निरनिराळ्या दिशांनीं हल्ले चढविण्यांत आले होते. पहिल्या हल्लयांत रेसिडेन्सी पक्षाचा पहिल्या झटापटींतच निकाल लागला; व फीर्यादींना आपले शब्द परत घ्यावे लागले. हे फिर्यादी म्हणजे त्यावेळचे गुर्जर दिवाण मणीभाई जसभाई हे होत. दुसरा हल्ला १८९३ च्या प्रारंभाला महाराज विलायतेस गेले अशी संधि साधून करण्यांत आला. या वेळीं अशी तक्रार करण्यांत आली कीं, इनामखात्यांतील बापट वगैरे अधिकारी सर्वस्वीं स्वतंत्र व बेहोष रीतीनें वागतात. पण ‘ हें कसें तें सिद्ध करा ’ असा इलियट साहेबांनीं आग्रह धरतांच हे आरोपाचे डोलारे कोसळले. फिरून दिवाण साहेबांना शब्द परत घ्यावे लागले; येवढेंच नव्हे तर खुद्द महाराजांनीं या खात्यांतील लोकांना बक्षिसें व देणग्या दिल्या ( ६ एप्रिल १८९३ ), आणि बापटांना तर त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पेनशन घेतल्यानंतर स्वतंत्र असामी देण्याचें आश्वासन महाराजांनीं जाहीर केलें. तिसरा हल्ला बारखळी खात्यावर म्हणजे मुख्यत: बापटांवर करण्यांत आला. या वेळीं इलियटसाहेब विलायतेंत रजेवर गेले होते; व त्यांचे जागेवर आलेले मॅकॉनकी साहेब हे शुंभ, लहरी, व खुनशी असल्यामुळें कर्नल बिडलफ यांचें नामी साधलें. १८९३ च्या नोव्हेंबरांत इलियट साहेब विलायतेहून परत आल्यावर फिरून त्यांनीं बापटांवरील आरोपांचें निराकरण केलें; पण १८९४ च्या एप्रिलांत ते फिरून विलायतेस गेले व महाराजहि तिकडेच गेले. असें पाहून दिवाण मणिभाई, रेसिडेंट बिडलफ, व सेटलमेंट कमिशनर मॅकॉनकी या तिघांचें कूट जमून त्यांनीं बापटांविरुद्ध सर्रास अर्ज घेण्यास सुरवात केली. आणि बापटांवर खटला भरण्याचा निश्चय झाला.

या प्रकरणांत दिवाण व रेसिडेंट हे चालक असून मॅकॉनकी साहेब हे त्यांचे हस्तक बनले होते. मॅकॉनकी साहेबांचा स्वभाव खालसांतील लोकांना अपरिचित नाहीं. ते सोलापूर, रत्नागिरी, नगर व नाशिक येथें कलेक्टर असतांना त्यांनीं आपल्या लहरी स्वभावाचे गुण पाघळलेले लोकांच्या स्मरणांत अजून आहेत. त्यांच्याइतका लहरी, खुनशी सिव्हिलियन अद्याप झाला नसेल. कर्नल ब्रिडलफ यांच्या कटांत ते सामील होते इतकेंच नव्हे, तर आपण सेटलमेंट कमिशनर असतां बारखळी खात्यावर बापटांची स्वतंत्र नेमणूक झाली हें त्यांस मोठें वैषम्य वाटलें होतें. आणि बापटांवर लांच खाल्ल्याचे आरोप ठेवून त्यांची चौकशी करण्याचें निश्चित झाल्यावर खुद्द मॅकॉनकी साहेबांनाच स्पेशल मॅजिस्ट्रेटचा अधिकार, दरबार कौन्सिलकडून देण्यांत आला. बापटांविरुद्ध पुरावा मिळविण्याकरितां बरावाईट कोणताहि प्रकार शिल्लक ठेवण्यांत आला नाहीं.

हे सर्व प्रकार चालू असतां बापट कामावरच होते. आपल्याविरुद्ध काहूर उसळत आहे याविषयीं त्यांच्या कानावर नित्य नव्या बातम्या येत; परंतु त्यांना उघड हुकूम कोणताच दिला नव्हता. महाराज, इलियट दोघेहि विलायतेंत; खुद्द दिवाणसाहेब आपल्यावर रुष्ट; सर्व शत्रूंनीं उचल खाल्लेली; चांगले चांगले मित्र म्हणविणारे देखील भेदरून जाऊन, बापटांचें कांहीं कां होईना पण दरबारच्या रोषाची आग आपल्या घराला लागूं नये म्हणून चार हात दूर राहूं लागले. यामुळें रावसाहेब बापट हे गांगारून गेले असल्यास नवल नाहीं. अशावेळीं आपले मित्र टिळक यांची त्यांना आठवण होणें स्वभाविक होतें; व टिळकांनींहि स्नेहाला स्मरून त्यांना हरएक प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें. जून १५ चे सुमारास टिळकांनीं उभयतांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांना बडोद्यास पाठविलें; व यापुढें बापटांना बडो-

द्यांत राहूं देणें हें घातक वाटल्यावरून त्यांना हरप्रयत्नानें वळवून नेण्याचा जोशानीं प्रयत्न केला. ता. १८ जून रोजीं मुंबईस जाणारी गुजरात मेलट्रेन बडोदें स्टेशनवर येण्याचे सुमारास बापट व जोशी दोघेहि स्टेशनावर येऊन दाखल झाले. बरोबर सामान फक्त जोशी यांचेंच असून, बापटसाहेब जणूं काय त्यांस पोंचविण्याकरितांच आले होते. बापटामागें लागून आलेले गुप्त पोलीस कांहीं अंतरावर उभे राहून टेहेळणी ठेवीत होते ! इतक्यांत गाडीची शीळ झाली. व गाडी चालू लागतांच बापट साहेबहि फुटबोर्डावर पाय ठेवून जोशी यांचे डब्यांत उडी मारून बसले ! जोशी यांनीं सेकंडक्लासचीं दोन तिकिटें आधींच काढून ठेविलीं होतीं. बापट डब्यांत शिरलेले पहातांच गुप्त-पोलिसांनीं धावपळ सुरू केली. पण गाडी स्टेशनाबाहेर केव्हांच निघून गेली. पोलिसांनीं सुरत-नवसरी पर्यंत तारा केल्या. पण रेल्वेच्या हद्दींत फौजदारी कायद्याचे सर्व अधिकार इंग्रज सरकारचे स्वाधीन असल्यामुळें व खात्यांतील मॅजिस्ट्रेटाचें वॉरंट नसल्यामुळें बापटांना कोणींहि प्रतिबंध करूं शकले नाहींत. जोशांबरोबर बापट पुण्यास आले ते पुढें महिना दीड महिना फरारी सारखेच होते. पुढें पोलिसांच्या सहाय्यानें बडोदा पोलिसनें जंगजंग पछाडले, पण जोशांनीं बापटांचा यत्किंचितही पत्ता लागूं दिला नाहीं.

पण केवळ बडोद्याहून निघून आल्यानें हें संकट टळणें शक्य नव्हतें. ते फरारी झाल्यामुळें त्यांच्यावरील हें संकट सहजच बळावलें. त्यांच्या शत्रूंना त्यांच्यावर आरोप ठेवण्यास उत्तेजन मिळालें. ता. ३०-१-१८९४ पासून बापटांना सस्पेंड करण्याचा हुजूर हुकूम सुटला. ता. १३ ऑगस्ट रोजीं बापट कमिशन नेमलें गेलें. कमिशन नेमून चौकशी व्हावयाची ठरल्यावर बापटांना बडोद्यांतून बाहेर राहणें इष्ट नव्हतें. अर्थात् ते आपण होऊन बडोद्यास परत जाऊन कमिशन-

पुढें हजर झाले. फिर्यादीतर्फे काम चालविण्याला प्रथम बॅरिस्टर फेरोजशाहा मेथा व नंतर मि. ब्रॅसन हे असून त्यांना मुंबईचे प्रसिद्ध भाईशंकर हे मदत करीत होते. बडोद्याचे सरकारी वकीलहि मदतीस होतेच. याशिवाय इनाम खात्यांतील किडे, असंतुष्ट इनामदार, पैसेखाऊ, चहाडखोर, घरभेदे, कृतघ्न बनलेले नीच लोक वगैरेंची मदत होती ती निराळीच. याच्या जोडीला अप्रत्यक्ष मदत म्हटली म्हणजे महाराज व इलियट हे गैरहजर असल्यामुळें मैदान मोकळें सुटलें होतें ही होय. दिवाण मणिभाई हे एका अर्थानें फिर्यादी असून, शिवाय दरबारचे कोणते कागद कमिशनपुढें हजर करण्याकरितां परवानगी द्यावी व कोणते मागें ठेवावे, कोणते सांपडत नाहीं म्हणावें व कोणते गुप्त म्हणून दाखवीत नाहीं म्हणून म्हणावें, या सर्वांचा पूर्ण अधिकार दिवाणसाहेबांना आलेला होता. व तो त्यांनीं मनसोक्त बजावलाहि.

उलट बापट यांची स्थिति अगदीं निराळी होती. दरबारशीं झगडण्याइतकें द्रव्यबळ त्यांच्या संग्रहीं नव्हतें. यामुळें त्यांना बॅरिस्टर देतां आला नाहीं. प्रथम कांहीं दिवस मुंबईचे हायकोर्ट वकील महादेव चिमणाजी आपटे व कांहीं दिवस दाजी आबाजी खरे यांनीं बापटांतर्फे काम चालविलें. खुद्द बडोद्याचे वकील रामभाऊ गोखले यांनींहि त्यांचें उघडपणें वकीलपत्र घेतलें होतें. तथापि खरें बोलावयाचें म्हणजे वकिलांचें बहुतेक काम स्वतः टिळकांनाच करावें लागलें. कमिशनपुढें झालेला पुराव्यांतील मुख्य भाग फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांचा होता, व बहुतेक साक्षीदारांच्या पुराव्यांत हिशेबी वह्यांचा संबंध येई. टिळक व बापट यांनीं मिळून हें हिशेब तपासाचें व त्यावरून उलटतपासणी करण्याचें काम इतकें उत्तम केलें कीं, कित्येक साक्षीदार खोटे ठरले, एवढेंच नव्हे तर गिरधरलाल नानाभाईसारख्या मुख्य साक्षीदाराच्या वह्या म्हणजे हिशेब खोटे आहेत, व फिर्यादीच्या हातीं या वह्या आल्या-

नंतरहि त्यांत खोडाखोडी, शोध घालणें वगैरे गुन्हेगारींचे प्रकार घडून आले आहेत असें पुराव्यानिशीं त्यांनीं फिर्यादीच्या गळ्यांत बांधलें. कमिशनचें काम चालू असतांच बॅरिस्टर फेरोजशहा मेथा हे तें काम टाकून गेले; त्याचें एक कारण, उघडकीस आलेले हे पुराव्याचे बनावट प्रकार होत असें सांगतात.

बापटांचा इनसाफ करण्याकरितां नेमलेलें कमिशन १८५० च्या ३७ व्या ॲक्टाप्रमाणें नेमण्यांत आलें होतें. त्याला डिपार्टमेंटल हेंच स्वरूप खरोखर होतें. म्हणजे तें न्याय इन्साफाचें कोर्ट नव्हतें. बापटांवरील लांचलुचपतीचे आरोप, हें एक दरबारी प्रकरण होतें. तो फौजदारी खटला नव्हता. तथापि कमिशननें आपल्याकडे न्यायकोर्टाचा अधिकार आहे अशा समजुतीनें वर्तन केलें. बापटांवर एकंदर छत्तीस आरोप सुरवातीस होते. पण त्यांतील अखेर बारा शिल्लक ठेवून त्यांजवर निकाल देण्यांत आला. व त्यांतील अकरांमध्यें बापटांना दोषी ठरविलें. एवढेंच नव्हे तर दोषारोपाकरितां बापटांस सहा महिने साधी कैद व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा देण्याबद्दल शिफारसहि केली. ही त्यांनीं सर्वस्वीं अधिकाराबाहेरची केली, इतकेंच नव्हे, तर कायदेकानूंचें ज्ञान किंवा न्यायमनसुबीची खरी पद्धति आणि पुराव्याचा कायदा यांचीहि कमिशनला फारशी ओळख नाहीं असें त्यांनीं चालविलेलें काम व दिलेला निकाल यावरून दिसून येण्यासारखें आहे. पण सुदैवानें कमिशनच्या हातीं रिपोर्ट करण्यापलीकडे अधिक कांहीं अधिकार नव्हता. अखेर हुकूम देणें ही खुद्द महाराजांच्या अखत्यारांतील गोष्ट होती. यामुळें बापटांना न्याय मिळण्याची आशा होती व अखेर ती कांहींशी खरीहि ठरली. ता. १९ जानेवारी १८९५ रोजीं महाराज सरकार विलायतेहून परत आले; व लवकरच त्यांनीं बापट कमिशनचे प्रकरण हातीं घेतलें. खटल्यांत दाखल झालेले सर्व कागद, तसेंच

बापटांतर्फे मागणी करण्यांत आलेले, पण दिवाणांच्या हुकुमानें गुप्त म्हणून मागें ठेवण्यांत आलेलेहि सर्व कागद महाराजांनीं रा. ब. पंडित व दलाल या दोघां कायदेपंडिताकडे अभिप्रायाकरितां दिले. या दोघांचा अभिप्राय असा पडला कीं, कांहीं थोडे खेरीज करून इतर सर्व खटल्यांत बापट निर्दोषी आहेत. पण थोडीशीहि शंका राहूं नये म्हणून पुनः बडोदा हायकोर्टातील एक पारशी जज्ज व खुद्द दिवाणसाहेब यांचा अभिप्राय घेऊन चौघांच्या अभिप्रायांनीं निम्मेपेक्षां ज्यास्त खटल्यांत व तिघांच्या अभिप्रायानें उरलेल्या खटल्यांत बापट हे निर्दोषी ठरल्यामुळें महाराजांनीं बापटसाहेबांस स्वतः निर्दोषी ठरविलें. मात्र नोकरीवर परत रुजू करून घेतलें नाहीं. याचा अर्थ उघडच आहे. तो असा कीं, बापटांवरील मुख्य आरोपासंबंधानें जरी महाराजांचें मन निःशंक होतें, तरी जमिनीवर शेण पडलें तें थोडीबहुत तरी माती घेऊन वर उठतें या म्हणीप्रमाणें कांहीं किरकोळ बाबतींत महाराजांच्या मनांत किंतु राहिला. शिवाय ब्रिटिश सरकारच्या क्रोधाचें जें एवढें भूत उभें राहिलें तें निदान घांसभर तरी बळी घेतल्याशिवाय संतुष्ट व्हावयाचें नाहीं हें लक्षांत घेऊन महाराजांनीं बापटांना प्रत्यक्ष नोकरीवरून दूर करून आपल्या शत्रूंशीं समेट केला. तथापि बापट यांना १२५ रु. पेन्शन महाराजांनीं करून दिलें, व आमरणान्त त्यांच्यावर त्यांचें प्रेम कायम होतें. सन १९१५ सालीं बापटसाहेब, त्यांचा थोरला मुलगा व त्यांची पत्नी हीं सर्व एकदम निवर्तल्यामुळें, बापटसाहेबांचा धाकटा मुलगा उघडा पडलेला पाहून त्याच्या अभ्यासाकरितां महाराजांनीं दरमहा तीस रुपयांची स्कॉलरशिप चार वर्षे देण्याचा हुकूम केला. रा. प्रभाकरपंत बापट हे एम्. ए. बी. टी. होऊन ग्वाल्हेर येथील कॉलेजांत हल्लीं प्रोफेसर आहेत. बापट हे कमिशनच्या निकालानंतर पुण्यास येऊन

कायमचे राहिले व त्यांचा अखेरचा काळ टिळकांच्या सान्निध्यांत गेला. बापट व टिळक यांच्या स्वभावांत जमीन–अस्मानाची तफावत असतां, दाजीसाहेब खऱ्यांप्रमाणेंच बापटांशीहि टिळकांचा स्नेह आ-मरण अखंड राहिला; व बापट वारल्यावर त्यांच्या मुलाची सर्व प्रकारें व्यवस्था लावून देऊन महाराजसाहेबांकडे त्याच्याकरितां खटपट करून तोच स्नेह त्यांनीं मरणोत्तरहि चालविला.

खुद्द सयाजीराव महाराज व टिळक यांची ओळख कमिशनच्या पूर्वीची होती. पण ती कमिशनमुळें दृढ झाली हें स्वाभाविकच होय. कमिशनचें काम करतांना टिळक स्वतःच्या स्नेह्याच्या बचावाकरितां झटत होते हें जरी सकृद्दर्शनीं खरें असलें, तरी अंतरंगांत आपण महाराजांनाहि मदत करीत आहों अशी जाणीव जशी टिळकांना होती तशी ती महाराजांना नसणें अशक्य आहे.

बापट व इलियट या उभयतांच्या संबंधानें चार ओळी लिहून हें प्रकरण पुरें करितों. पुष्कळ लोकांना अशी शंका असावी कीं, इलियटसाहेबांना बापटांची हुषारी पटली असली तरी त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं त्यांची खात्री पटलेली नव्हती. तशी असती तर विलायतेहून मुद्दाम येऊन त्यांनीं बापटांतर्फे कमिशनपुढें साक्ष दिली असती. पण या शंकेचें उत्तर समाधानकारक असून खुद्द इलियट साहेबांच्या पत्रावरून त्यांचा अभिप्राय असा दिसतो कीं, ' ज्या अर्थी केवळ बापटांच्या हुकुमावरून निकालांत निघालेल्या इनामचौकशीचा संबंध या लांचलुचपतीच्या खटल्यांत आणला गेला होता, व या बहुतेक प्रकरणांत ज्यांच्याकडून लांच घेतल्याचा आरोप होता त्यांना कोणतीहि फलप्राप्ति झाल्याचा पुरावा फिर्यादीस करतां आला नाहीं, त्या अर्थी मी पुरावा देण्याकरितां न आलों तेंच बरें; कारण परस्परच निर्णय

लागतो. उलट मी आल्यानें बापटांवर अधिक आग पाखडली गेली असती. ' ता. ६ डिसेंबर १८९४ च्या पत्रांत ते लिहितात:—

" Do you see why I kept away? I should have been swept off my legs and the attack on you would have been far fiercer than it has and you would have been without any assistance at the end. I write freely because I am writing privately and above all because I still believe that the charges do not shake my Confidence in you."

# प्रकरण आठवें

## इ. स. १९११

महाराजांच्या कारकीर्दींत गाजलेल्या बापट कमिशनच्या प्रकरणानंतर सुमारें पंधरा वर्षांनीं दिल्ली दरबारचें दुसरें उपद्व्यापी प्रकरण निर्माण झालें. बापट प्रकरणांतील मुख्य नायकाची भूमिका सदाशिवराव बापट यांजकडे असून स्वतः महाराजांचा त्या प्रकरणाशीं दूरचा संबंध होता. पण दिल्ली दरबार प्रकरणांत मुख्य नायकाचीच भूमिका त्यांच्यावर लादण्यांत आली. हें प्रकरण १९११ सालीं हिंदुस्तानांत व हिंदुस्तानाच्या बाहेर इतकें गाजलें कीं, त्यामुळें महाराजांवर एका पक्षाकडून स्तुतीचा व दुसऱ्या पक्षाकडून अकारण निंदेचा नुसता वर्षाव झाला. तसें म्हटलें तर असें होण्याचें कांहींच कारण नव्हतें, हें खालीं दिलेल्या हकिकतीवरून कळेल.

बादशहा पंचम जॉर्ज व महाराज्ञी मेरी हीं दोघें बादशहा व महाराज्ञी या नात्यानें हिंदुस्तानांत आलीं होतीं. व दिल्ली येथें त्या प्रीत्यर्थ मोठा दरबार ता. १२ डिसेंबर १९११ रोजीं भरविण्यांत आला होता. त्या दरबाराप्रीत्यर्थ हिंदुस्तानांतील बहुतेक संस्थानिक आपापल्या वैभवासहित तेथें आले होते. दरबाराच्या प्रसंगीं बादशहांचें भाषण वाचून दाखविणें झाल्यावर व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज हे सिंहासनाजवळ आले व त्यांनीं आपल्या पद्धतीप्रमाणें मुजरा केला. त्यानंतर मुख्य सेनापति आणि गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद यांचे मुजरे झाले. त्यानंतर हैद्राबादचे अधिपति

यांनीं बादशहांना मुजरा केला. नंतर महाराजांची पाळी आली. त्या-दिवशीं सकाळपासून त्यांचें मन कांहीं खाजगी गोष्टींमुळें व्यग्र होतें. हैद्राबादच्या निझामानीं कोणत्या प्रकारें मुजरा केला हें पाहण्याच्या मनस्थितींत ते नव्हते. त्यामुळें त्यांच्यावर पाळी आल्यावर ते सिंहासना-जवळ गेले आणि त्यांनीं एकदां आपलें मस्तक नम्र केलें. आणि कोणीकडून बाहेर जायचें हें माहीत नसल्यामुळें ते फिरले आणि त्यांची पाठ बादशहा व महाराज्ञी यांच्याकडे झाली.

झालें महाराजांना कल्पनाहि नाहीं कीं, आपण कोणाचा अशा तऱ्हेनें वागण्यांत अपमान करीत आहों. बडोद्याच्या रेसिडेंटानें त्यांना त्यांनीं केला तशाच प्रकारचा मुजरा करायला शिकविलें होतें. तसेंच कुठल्या वाटेनें जावयाचें हेंहि कोणी त्यांना सांगितलें नाहीं. मनांत अनादराची अंधुकहि कल्पना न ठेवतां ते आपला आदर व्यक्त करा-वयाला सिंहासनाजवळ गेले होते. पण त्यांच्या शत्रूंना त्यांच्या वाग-ण्यांत बादशहा व महाराज्ञी यांचा अपमान करण्याची वृत्ति दिसून आली ! त्यांतच आणखी एका गोष्टीची भर पडली. महाराज दरबारला गेले त्यावेळीं त्यांनीं आपला जी. सी. एस्. आय्. चा चांद गळ्यांत घातला नव्हता. तो त्यांनीं मुद्दाम घातला नव्हता असें नाहीं. त्यांनीं चांद न घातल्याबद्दलची चूक रेसिडेंटानेंहि त्यांच्या नजरेस आणली नव्हती. असें असून त्यांच्यावर स्वामिनिष्ठेचा अभाव असल्याचा आरोप करण्यांत आला ! त्यावेळीं महाराजांच्या लक्षांत ही गोष्ट आलीहि नाहीं. ते गव्हर्मेंट हाऊसमध्यें लॉर्ड सिडनहॅम यांना भेटावयाला गेले त्यावेळीं ते घरीं नाहींत असें त्यांना सांगण्यांत आलें. असें कां, हें त्यांना त्यावेळीं कळलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं गोपाळ कृष्ण गोखले त्यांच्या भेटीला आले व त्यांनीं महाराजांच्या दरबारांतील वर्तनाबद्दल खूब खळबळ उडाली असल्याचें त्यांना सांगितलें. तसेंच महाराजां-

कडून माफीची अपेक्षा सरकार करीत असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें. यावरून पुढें महाराजांनीं व्हाईसरॉय यांस खालील पत्र लिहिलें:—

" प्रिय लॉर्ड हार्डिंज,

मी सार्वभौम बादशहांना ज्या पद्धतीनें मुजरा केला त्या पद्धती-विरुद्ध बरीच अप्रिय टीका सुरू आहे असें ऐकतों. खरोखर काय घडलें हें कळविण्याकरितां मी आपणाला ताबडतोब लिहित आहे. ज्यामुळें सार्वभौम बादशहा नाराज होतील असें कांहींहि करण्याचा माझा हेतु नव्हता. त्यांच्याबद्दल व त्यांच्या सिंहासनाबद्दल मला वाटत असलेली स्वामिनिष्ठा ही ज्या वागणुकीमुळें शंकास्पद ठरेल असें कांहींहि करण्याचा माझा हेतु नव्हता असें मी आपणाला आश्वासन देतों. बडोदें संस्थान ब्रिटिश सरकारचे अत्यंत आभारी आहे. आणि त्या सरकारशीं मी व माझें संस्थान हीं नेहमीं कृतज्ञ व एकनिष्ठ राह-तील. सिंहासनाजवळ येण्यांत तेथून परत जाण्यांत माझ्या हातून शिष्टाचाराचा भंग झाला असें सांगण्यांत येतें. हें जर खरें असेल तर तें बादशहा व महाराज्ञी यांच्या सान्निध्यानें मीं घाबरल्यामुळें झालें असेल. माझ्या पूर्वीं फक्त एकट्या निझामानीं मुजरा केला होता; आणि दरबारच्या घाईंत त्यांनीं कसा मुजरा केला हें पाहावयाला मीं विसरलों होतों. मुजरा झाल्यावर मी कांहीं पावलें मागें परतलों आणि कोणत्या वाटेनें जावयाचें तें विचारूं लागलों. रस्ता विचारण्याकरितां मी फिरलों इतक्यांत माझ्या मनांत गोंधळ उडाला; आणि मी गोल-गोल फिरत राहिलों. या माझ्या चुकीबद्दल मी फार दिलगीर आहें असें आपणांला कळवितों. "

व्हाईसरॉय यांस महाराजांचें पत्र ता. १४ डिसेंबर रोजीं मिळालें. व ता. १६ डिसेंबर रोजीं तें सर्वत्र जाहीर करण्यांत आलें. लंडन येथें दोन दिवस उशीरां याची हकिकत जाऊन पोंचली आणि तेथील टाईम्स

पत्रानें तर महाराजांच्यावर आग पाखडली. १९०५ सालापासून महाराजांच्या राज्यकारभारांतील चुका दाखवून ते ब्रिटिश सरकारशीं एकनिष्ठ कसे नाहींत हें दाखविण्याचा उपद्याप टाईम्सकारांनीं केला. बडोद्यांत बरेच जहाल लोक येऊन राहातात, त्यांना सरकारी नोकऱ्या मिळतात, महाराजांच्या खासगी खात्यांतहि त्यांचा प्रवेश होतो. वगैरे हकिकतीहि याच पत्रांत प्रसिद्ध झाल्या. आणि ही सर्व टीका कां तर राष्ट्रीय वृत्तीचीं जहालपत्रें कधीं सयाजीराव महाराजांवर टीका करीत नाहींत म्हणून !

पॅरिस येथील तेंम्प्सनें दिल्ही येथील बातमी प्रसिद्ध करून, वर असें लिहिलें कीं गायकवाड, ब्रिटिशांविषयीं वाटत असलेला द्वेष मुळींच लपवून ठेवीत नाहींत ! लंडन टाईम्समधील लेखाला महाराजांनीं व्यवस्थित उत्तर दिलें. क्रांतिकारकांचा व बडोदें संस्थानचा टाईम्सनें जोडून दाखविलेला संबंध किती खोडसाळपणाचा हेंहि महाराजांनीं बरोबर दाखविलें. आणि विशेष मौज पुढें अशी झाली कीं, ज्या क्रांतिकारक गृहस्थाशीं महाराजांचा संबंध लावण्यांत आला होता त्यानेंच पुढें येऊन सांगितलें कीं, गेल्या चार वर्षांत आपला व गायकवाडांचा पत्रव्यवहार देखील नाहीं; उलट आपण त्यांची आपल्या पत्रांत चांगलीच निर्भर्त्सना केली आहे.

या धुमसत असलेल्या अग्नींत ता. १ जानेवारी १९१२ रोजीं तेल ओतण्यांत आलें; तें अशा रीतीनें कीं, लंडन येथें दिल्ही दरबारची फिल्म दाखविण्यांत आली. त्यांत महाराज मुजरा करीत असल्याचा देखावाहि होता. यामुळें साहाजिकच इंग्लंडांतील नेमस्तपक्षाचे लोक व कुटील वर्तमानपत्रकार महाराजांवर खूपच रागावले. पुढें आक्टोबरमध्यें हिंदुस्थानच्या व्हाईसरॉय साहेबांचे बंधु व्हाइकौंट हार्डिंज यांनीं आपल्या एका व्याख्यानांत दिल्ही दरबारचा उल्लेख करून त्यांत महाराजांना

उद्धट व बेमुर्वतखोर म्हटलें. त्याला पॉलमॉल गॅझेटमध्यें "माहितगार" असें नांव घेतलेल्या गृहस्थानें सणसणीत उत्तर दिलें; व महाराजांची वागणूक मुळींच बेइमान दर्शविणारी नव्हती असें सिद्ध केलें. पुढें या उत्तराला त्याच पत्रांत "ज्यास्त जाणणारा" या टोपण नांवानें दुसऱ्या एकानें प्रत्युत्तर देऊन त्यांत व्हाइकौंट साहेबांचीं मतें पुनः एकवार जोरदार भाषेंत व शिवराळ शब्दांत मांडण्यांत आलीं.

अशा तऱ्हेनें या दिल्ही दरबार प्रकरणानें जिकडे तिकडे बरीच खळबळ उडवून दिली. वास्तविक महाराजांनीं दिलगिरीप्रदर्शक पत्र पाठविल्यानंतर हें प्रकरण मिटावयाला हवें होतें. पण तें मिटूं नये असें कांहीं महाराजांच्या इंग्रज शत्रूंना वाटत होतें. आणि म्हणून त्यांनीं खाजवून खरूज काढावी त्याप्रमाणें जुन्या गोष्टी उकरून काढून महाराजांची बदनामी सुरू केली. महाराजांविषयीं अशा प्रकारचीं त्यांचीं मतें व्हावयाला महाराजांच्या दृष्टीनें थोडीशीं प्रतिकूल कारणें झालीं, त्याचाहि इतिहास मोठा मनोरंजक आहे.

महाराज आपल्या स्वतःच्या व महाराणी साहेबांच्या प्रकृतीच्या स्वास्थ्याकरितां विलायतेंत मधून मधून जात. त्यांच्याबरोबर त्यांचीं मुलें व अधिकारी मंडळी देखील जात. हें जाणें कर्झन साहेबांना न आवडून त्यांनीं देशी संस्थानिकांना उद्देशून एक फर्मान काढलें. कोणत्याहि संस्थानिकानें हिंदुस्तान सरकारची परवानगी घेतल्यावांचून विलायतेस जातां कामा नये; तसेंच अशी परवानगी मिळाल्यावरहि आपण तेथें काय काय करणार, कोठें कोठें जाणार या विषयीं त्यानें अगोदर माहिती पुरवावी वगैरे मजकूर त्या फर्मानांत होता. टाईम्स पत्रांत या फर्मानाचा उल्लेख करून असें शेवटीं म्हटलें होतें कीं, बडोधाचे गायकवाडांसारखे जे संस्थानिक आपल्या संस्थानाबाहेर हिंडत असतात त्यांच्यावर या फर्मानाचा चांगला परिणाम होईल असें वाटतें. महाराज

त्यावेळीं विलायतेंत होते. महाराणीसाहेबांची प्रकृती त्यावेळीं नादुरुस्त होती. कर्झन साहेबांचें फर्मान असूनहि महाराज कांहीं दिवस आलेच नाहींत. त्यामुळें हिंदुस्तान सरकार व अँग्लो इंडियन पत्रें यांच्या जीवाचा नुसता तिळपापड झाला. हिंदी संस्थानिकांच्या हक्कांची पायमल्ली होऊं नये म्हणून महाराजांनीं त्यावेळीं खूप प्रयत्न करून पाहिला; पण हिंदी संस्थानिकांची एकंदर स्थितीच अशी विलक्षण आहे कीं त्यांना कांहींहि उघडपणें करतां येत नाहीं.

अँग्लो इंडियन पत्रांचा महाराजांवर रोष असण्याचें कारण असें कीं, देशी वर्तमानपत्रांत महाराजांची अनेक वेळां त्यांच्या विविध सुधारणांबद्दल स्तुति होई. अमृत बझार पत्रिकेंत महाराज ज्या हिंमतीनें आपली बाजू पुढें मांडीत त्याबद्दल प्रशंसोद्गार येत. या सर्वांचा परिणाम म्हणजे महाराजांच्या विषयीं त्यांच्या मनांत अप्रीति उत्पन्न होण्यांत झाला. त्यांत भर म्हणून १९०७, १९०८ मध्यें कांहीं प्रसंग घडले. त्या वेळीं बंगालची फाळणी नुकतीच होऊन हिंदुस्तानभर असंतोषाची लाट पसरली होती. तिला शमविण्याकरितां हिंदुस्तान सरकारनें रुद्रावतार धारण करून ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांना पकडून देश निकाल करण्याचें व्रत सुरू ठेवलें होतें. त्यावेळीं श्रीमंत सयाजीराव महाराज यांस हिंदुस्तान सरकारनें क्रांतिकारकांना पकडण्यांत मदत करण्याविषयीं लिहिलें होतें. त्यावेळीं महाराजांनीं आपल्या राज्यांत कोणी क्रांतिकारक असल्याचें आपल्या ऐकण्यापाहण्यांत नाहीं असें लिहिलें. हें त्यांचें उत्तर कांहीं अँग्लो इंडियन वृत्तपत्रांनीं भलत्याच स्वरूपांत प्रसिद्ध केलें. महाराज हे मनांतून क्रांतिकारकांना मदत करीत असतात, असाहि आरोप या कुटील पत्रांनीं ठेवला.

या वेळीं महाराजांची स्थिति फारच नाजुक होती. त्यांना आपल्या राज्यांतील प्रजाजनांपैकीं उगीच कोणाला सरकारच्या क्रोधाग्नीला बळी

द्यावयाचें नव्हतें. तसेंच आपण साम्राज्याशीं एकनिष्ठ आहोंत असेंहि दाखवावयाचें होतें. अशा स्थितींत ब्रिटिश सरकाराकडून त्यांच्या राज्यांत असलेले मि. के. जी. देशपांडे हे राजद्रोहांत सामील असल्याची बातमी आली. रा. देशपांडे हे अमरेळी येथें सुभ्याच्या जागेवर होते. त्यांच्यावर काम चालून राजद्रोहाविषयीं कांहींच पुरावा सांपडेना. तरीपण महाराजांना रा. देशपांडे यांस बडतर्फ करावेंच लागलें. महाराजांनीं देशपांड्यांना दहाहजार रुपये भरपाई म्हणून दिले; व ते देतांना त्यांच्या मनांत आरोप शाबीत होणें महत्त्वाचें असतें, आरोप ठेवणें नसतें, हेंच असावें असें दिसतें.

कर्झनशाईचे दिवसच असे कीं, मनांत शुद्ध हेतु ठेवणाऱ्यावरहि सरकारची केव्हां वक्रदृष्टि होईल याचा नेम नव्हता. १९०८—०९ सालीं तर जिकडे तिकडे राजकीय वावटळ उठलेलें, त्यांत महाराजांचें व रेसिडेन्सीचें ठीक नव्हतें. अनेक राज्यकारभाराच्या गोष्टींत, महाराज नसले कीं, रेसीडेन्सीचे लोक ढवळाढवळ करीत. त्यावरून चिडून महाराजांनीं एकदां व्हाइसरॉय यांनाहि लिहिलें होतें. संस्थानिकांचा दर्जा कमी कमी केला जात असलेला पाहून महाराजांना वाईट वाटे. १९०३ सालच्या दरबारापासून महाराजांनीं निर्भीडपणें स्वतःला वाटेल तें सरकारला लिहून कळविण्याचा परिपाठ ठेवला होता. तसें लिहिण्यांत सार्वभौम सत्तेविषयीं त्यांचा कांहीं अनादर होता असें मुळींच नाहीं. पण ते तत्त्वाकरितां, संस्थानिकांच्या हक्काकरितां भांडत असत. त्यांचें हें करणें कमी बुद्धीच्या रेसिडेंटांना व अँग्लो इंडियन पत्रकारांना शंकास्पद व दोषास्पद वाटे.

दिल्ली दरबार प्रकरणाच्या वेळीं त्यांनीं जी एवढी कोल्हेकुई केली त्याच्या पाठीमागें कारणें आहेत तीं वर दर्शविल्याप्रमाणें. स्वतः महा-

राजांच्या ठिकाणीं त्यांच्यावर करण्यांत आलेल्या आरोपापैकीं एकहि संभवत नाहीं. केवळ चूक म्हणून करण्यांत आलेल्या एखाद्या गोष्टीचा एवढा गवगवा होईल असें त्यांच्या ध्यानींमनींहि नव्हतें. पण ध्यानींमनीं नसलेल्या गोष्टीच कित्येक आगलावे वर्तमानपत्रकार नेहमीं करीत असतात. दिल्ली दरबार प्रकरण हें त्यापैकींच समजावयाचें.

## प्रकरण नववें

# सुधारणा

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या पन्नास—पंचावन वर्षांच्या कारकीर्दीचें गमक काय म्हणून कोणी आम्हांला विचारल्यास आम्हीं त्याला सुधारणा—सुधारणा—सुधारणा असें त्रिवार सांगूं. आयुष्यभर महाराजांनीं आपल्या राज्यांत नवीन नवीन सुधारणा इतक्या केल्या आहेत कीं, महाराजांचें चरित्र म्हणजे एकप्रकारें या विविध सुधारणांचा इतिहासच होय. महाराज येण्यापूर्वीची बडोद्याची स्थिति काय होती ती आपण मागेंच बघितली. खुद्द महाराजांच्या मनांत ती कायम ठेवण्याचें आलें असतें तर त्यांत त्यांचें कांहीं नुकसान झालें असतें असें नाहीं. हिंदुस्तानांतील इतर चार संस्थानिक चैनींत दिवस घालवितात त्याप्रमाणें महाराजहि करूं शकले असते. पण मग आपण त्यांचें चरित्रहि लिहिण्याला बसलों नसतों. महाराजांची राजेपणाची कल्पना अगदीं भिन्न आहे. प्रजाहित, प्रजेची प्रगति, प्रजेचें सुख या गोष्टींत राजेपणा सामावला आहे असें त्यांना वाटतें तें ठीकच वाटतें. आणि याचमुळें त्यांनीं अनेक लोकोपयोगी सुधारणा घडवून आणल्या आहेत. त्या कोणकोणत्या तें आपण आतां क्रमाक्रमानें पाहूं या.

सर टी. माधवराव यांनीं आपल्या कारकीर्दींत मुलकी खात्यांत बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या होत्या. जिथें जमिनीची लागत फार होती तिथें ती त्यांनीं कमी केली, जिथें वसूल खूप थकले होते तिथें

त्यांनीं सूट दिली. अशा तऱ्हेनें त्यांनीं कांहीं उपयुक्त गोष्टी केल्या. पण जमिनीची पाहणी, शास्त्रशुद्ध मापणी, शास्त्रशुद्ध विभागणी, तसेंच नियमांची दुरुस्ती व निर्मिती, घराणीया-वेचाणीया वगैरेसंबंधीं तपासणी, या गोष्टी त्यांनीं केल्या नव्हत्या. त्यामुळें महाराजांनीं राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतल्यावर हीं कामें ताबडतोब हातीं घेतलीं. १८८३ सालीं या कामाकरितां सर्व्हे-सेटलमेंट नांवाचें नवीन खातेंच निर्माण करण्यांत आलें. या खात्यानें संस्थानभर मोजणी, मापणी, जमिनीची लागत मुंबई इलाख्यांत चालू असलेल्या पद्धतीप्रमाणेंच ठेवण्यांत आली. म्हणजे अशी कीं, अमुक एका शेताची लागत ठरवितांना आदल्याच वर्षी त्या शेतांत किती उत्पन्न आलें होतें तें प्रथम पाहावयाचें. नंतर गेल्या कित्येक वर्षांत किती उत्पन्न आलें तें पाहावयाचें. नंतर पुढें अंदाजी काय उत्पन्न येईल हें ठरवावयाचें. जमिनीच्या लागतींत, जमिनीच्या दरांत वाढ झाल्याखेरीज, वाढ करावयाची नाहीं, हें लक्षांत ठेवून लागत ठरवावयाची. जमिनीच्या उत्पन्नांतून शेतकऱ्यांची मजुरी, औत वगैरे जिनसांबद्दल होणारा खर्च किंवा त्याप्रीत्यर्थ वायां जाणारे व्याज, वगैरे वजा करून नंतर जें उत्पन्न बाकी राहील त्यापैकीं निम्म्यापेक्षां अधिक रक्कम लागतीदाखल मुळींच घ्यावयाची नाहीं. समजा एखाद्या शेताचें उत्पन्न शंभर रुपये आहे, त्यांतून शेतकऱ्यांची मजूरी, औत व बी वगैरेकरितां होणारा खर्च वजा जातां तीस रुपये निव्वळ उत्पन्न राहिलें; तर त्या शेतकऱ्याला सरकारसारा म्हणून पंधरा रुपयांपेक्षां जास्त द्यावा लागूं नये. म्हणजे ठोकळ हिशेब असा कीं एकंदर उत्पन्नापैकीं $\frac{1}{6}$ शेतसारा किंवा निव्वळ उत्पन्नापैकीं $\frac{1}{2}$ शेतसारा घ्यावयाचा.

जमिनीच्या मापांतहि बदल करण्यांत आला. पूर्वी बडोदें संस्थानांत कांहीं ठिकाणीं कुंभ्याची पद्धति होती तर कांहीं ठिकाणीं बिघ्याचें माप होतें. मापांचा सारखेपणा राहावा या हेतूनें आतां संस्थानांत सर्व

जमिनी बिघ्याच्या मापानें मोजल्या जातात. त्यानंतरची सुधारणा म्हणजे सऱ्हेंनंबर किंवा मापणी-अंकाची. संस्थानभर असे सऱ्हेंनंबर ठरविण्यांत आले असून ते अमुक एका मापापेक्षां कमी नसतात. खुद्द जमिनीसंबंधानें वर्गवारी करण्यांत आली असून, ज्या जमिनींत रुपयास सोळा आणे पीक येतें त्या जमिनीचा सारा बिघ्यास तीन रुपये; ज्या जमिनींत रुपयास आठ आणे पीक येतें त्या जमिनीचा सारा बिघ्यास दीड रुपया, अशा तऱ्हेनें जमिनीचा कसहि ठरविण्यांत आला आहे.

एकदां ठरलेल्या शेतसाऱ्यांत निदान पंधरा वर्षें तरी बदल करण्यांत येत नाहीं. आणि बदल करतांनाहि जमिनीच्या उत्पन्नांत व स्थितींत फरक झाला असल्यावांचून बदल होत नाहीं. सर्व संस्थानभर रयतवारी शेतसाऱ्याची पद्धति सुरू आहे, हें मागें एके ठिकाणीं आपण पाहिलेंच. प्रत्येक शेतकऱ्याकडून रोकड सारा सरकार स्वत: घेतें. आणि जोंपर्यंत शेतकरी नियमीत सारा भरीत असेल तोंपर्यंत जमीन त्याच्या ताब्यांत असते.

सऱ्हे-सेटलमेंटच्या पूर्वी बडोदें संस्थानांत जमिनीसंबंधीनें निराळ्या पद्धति होत्या. भागबटाई नांवाच्या पद्धतींत शेतसारा रोकड न घेतां जे पदार्थ तयार झाले असतील त्या पदार्थांतच घेण्यांत येई. या पद्धतींत एक फायदा असा होता कीं, जेवढें व जसें उत्पन्न जमिनींत येई त्या प्रमाणांत व तसा शेतसारा म्हणून द्यावा लागे. एखादे वेळीं कांहीं द्यावें लागत नसे. पण त्याच्यांचं बरोबर तोटेहि या पद्धतींत पुष्कळ होते. शेत-कऱ्याला आपलें पीक अमुक एका ठिकाणीं न्यावें लागे; तेथें सरकारी अधिकाऱ्यांच्या मनाला येईल तेव्हां त्याची भागबटाई व्हावयाची; आणि सर्वांत मोठा त्रास म्हणजे तोंपर्यंत शेतकऱ्याला आपल्या पिकाचें कांहींच करतां येत नसे. सरकारला त्रास होई तो हें पीक सांठविण्याचा व संधि येईल तेव्हां व्यवस्थितपणें विकण्याचा.

दुसरी पद्धति हळबंदी नांवाची होती. ती कडी प्रांतांत व बडोदें प्रांताच्या एका महालांत सुरू होती. या पद्धतींत शेतसारा आकारण्यांत येई तो नांगरांच्या व बैलांच्या संख्येवर ! एखाद्या शेतांत दोन नांगर आणि चार बैल काम करीत असले तर त्यांच्याकडून विशिष्ट प्रकारचा आकार घेण्यांत येई. या पद्धतींत अर्थातच तर्कशुद्धपणा जवळजवळ नाहींच. एखादा शेतकरी एक नांगर व बैलाची एक जोडी घेऊन आपलें दहा एकरी शेत नांगरील, तर दुसरा बैलाच्या दोन जोड्या ठेवून तेवढेंच शेत नांगरील. पण या दोघांत दुसऱ्याला मात्र पहिल्यापेक्षां दुप्पट सारा द्यावा लागेल ! ही पद्धति उघड उघड अन्यायमूलक होती. आणि ती नष्ट करण्यांत आली हेंच ठीक झालें.

तिसऱ्या पद्धतींत शेतसारा टेहेळणी करण्याकरितां उभारलेल्या माचव्यावरून अंदाजी ठरविण्यांत येई. शेतकरी आपल्या शेतांत राखण राखण्याकरितां असे माचवे उभारतो. पण असल्या माचव्यांवरून शेतसारा ठरविणें म्हणजे विवेकशक्तीला सोडचिठ्ठी देण्याजोगें आहे.

या पद्धतींखेरीज मालगुझारी पद्धतीसारखी नाखादारी पद्धति पेटलाद व भादरण तालुक्यांत सुरू होती. या पद्धतीनें अमुक गांवाच्या शेतसाऱ्याबद्दल एखादी व्यक्ती जबाबदार असे. आणि म्हणून ती आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल त्याला वाटेल त्या मुदतीपुरती जमीन देऊं शके. भागदारी पद्धति अशाच स्वरूपाची होती व ती कामरेज तालुक्यांत सुरू होती.

या खेरीज मेहवसी नांवाची पद्धति होती. त्यांत ठाकरडे नांवाच्या गांवांतील मुख्यांकडे शेतसारा वसूल करण्याचें काम असे. हे ठाकरडे छोट्याशा संस्थानिकांसारखे असत, त्यांच्या गावांतील शेतसारा जमा करणें व गांवाची देखरेख ठेवणें वगैरे कामें त्यांच्याचकडे असत.

कोमवारी नांवाच्या पद्धतींत विशिष्ट कोम किंवा जातीला विशिष्ट कर द्यावा लागे. कोळ्यापेक्षां कुणब्याला तिप्पट सारा द्यावा लागे! एकेकाळीं कदाचित् ही पद्धति निर्दोष ठरली असेल. पण हल्लींच्या काळांत सर्व जाती समान भूमिकेवर येऊं पाहात असतांना ही पद्धति चालू ठेवणें अशक्यच होतें. त्यामुळें इतर शेतसारा घेण्याच्या पद्धतीप्रमाणें हीहि पद्धत नाहींशी करण्यांत आली. आणि त्याच्याबद्दल सर्वत्र रयतवारी पद्धति सुरू करण्यांत आली. या पद्धतीमुळें लोकांना सारखा न्याय मिळून सरकारचें कामहि बरेंच सोपें झालें. पूर्वीं निरनिराळ्या पद्धति सुरू होत्या तेव्हां राज्यकारभाराचें व विशेषत: वसूल गोळा करण्याचें काम किती कठिण असेल याची कल्पनाच केलेली बरी.

याच खात्यांत दुसरी महत्त्वाची सुधारणा महाराजांनीं केली, ती लँड रेव्हेन्यु कोड तयार करण्याची. सर टी. माधवरावांच्या वेळीं जमिनीच्या बाबतींत वेळोवेळीं हुकूम व फर्मान सोडण्यांत येत. पण त्यांना व्यवस्थित नियमांचें स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. त्यामुळें महाराजांनीं एक नियमशाखा काढून तिच्याकडे नियम करण्याचें काम सोंपविलें. आणि हे सर्व नियम तयार झाल्यावर १ एप्रिल १९१५ पासून लँड रेव्हेन्यु कोड सुरू झाला.

बारखळी जमिनीच्या बाबतींत अशीच महत्त्वाची सुधारणा महाराजांनीं घडवून आणिली. बारखळी म्हणजे बहार—खळी म्हणजे खळ्या बाहेरची. ज्या जमिनीला शेतसारा संपूर्ण किंवा कांहीं अंशानें द्यावा लागत नसे तिला बारखळी जमीन म्हणत. यांत देवस्थान, पीरस्थान, धर्मादाय, चाकरियात, जात—धर्मादाय, राणवटिया, वेंचाणिया, घारणीया वगैरे प्रकारच्या शेतसाऱ्याची सूट मिळालेल्या जमिनी असत. देवस्थान व पीरस्थान जमिनी हिंदु व मुसलमान यांच्या देवदेवतांना दिलेल्या असत. देवतांची सेवा करण्याबद्दल दिलेल्या जमिनींना चाक-

रियात धर्मादाय म्हणत; व ब्राह्मण, भाट चारण, गोसावी अतिथी यांना देण्यांत आलेल्या जमिनींना जात धर्मादाय म्हणत. या खेरीज इनामी जमिनी असत त्या वेगळ्याच. या जमिनी जुन्या महाराजांनीं मागचा पुढचा विचार न करितां आपल्या मित्रांना दिलेल्या होत्या. आणि अशा तऱ्हेनें संस्थानचा पुष्कळ भाग सरकारच्या मालकींतून सुटल्यासारखा होता. तेव्हां या जमिनींचें पुढें भविष्य काय तें ठरविण्याकरितां जमिनींचे हक्क ठरविणारें खातें निर्माण करण्यांत आलें. या खात्यानें बारखळी जमिनीची चौकशी करून खरोखरीचे मालक कोण, हल्लीं मालक कोण याचा तपास काढून जे लोक खरोखरीचे मालक नव्हते त्यांच्या मागें शेतसारा लावला. सरदार, शिलेदार, दरखदार, वतनदार, पारेख, गाणारे, नाचणाऱ्या, बारगीर वगैरे झाडून झटकून सर्व मंडळींच्या हक्कांचें संशोधन होऊन ज्यांचे हक्क योग्य वाटले त्यांच्या जमिनी तशाच ठेवल्या बाकी सर्व सरकारजमा करण्यांत आल्या. आणि अशा तऱ्हेनें जमिनीच्या बाबतींत जो गोंधळ माजला होता तो कमी करण्यांत आला.

जुन्या वेळेला निरनिराळ्या प्रकारचे कर ( वेरो ) लोकांना द्यावे लागत. वाणीय वेरो, गाम वेरो, सराफ वेरो, वगैरे प्रकारचे कर असत. त्याच्याबद्दल आतां आयपत वेरो म्हणजे ऐपतीचा कर सरसहा सर्वांपासून विशिष्ट नियमाप्रमाणें घेण्यांत येतो. १८९६ सालीं पाद्रा तालुक्यांत इतर करांच्या ऐवजीं सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांकडून अमुक एका उत्पन्नावर हा कर घेण्यांत येऊं लागला. पुढें ही पद्धत चांगली व सोयीस्कर वाटल्यावरून सर्व संस्थानभर ऐपतीचाच कर सुरू करण्यांत आला.

जंगलखातें, मादक पदार्थ विक्रीचें खातें, या दोन खात्यांतहि अनेक सुधारणा करण्यांत आल्या आहेत.

ग्रामपंचायतींच्या बाबतींत महाराजांनीं विशेष लक्ष पुरविलें आहे. हिंदुस्तानाचें वैशिष्ट्य खरोखर या ग्रामपंचायतींत आहे. पूर्वीच्या वेळेला प्रत्येक गांव आपापल्या परीनें स्वतंत्र व स्वयंसिद्ध असे. प्रत्येक गांवांत एखादा पाटील, एक चौकीदार, नंतर सुतार, शिंपी, लोहार, तांबट, असे इतर धंद्याचे लोक असत. गांवांत उत्पन्न होणारे प्रश्न या जातींचे पंच सोडवीत. हिंदुस्तानांत हिंदु, मुसलमान, मराठे, इंग्रज वगैरे आळीपाळीनें राजे झाले व सार्वभौम सत्ता त्यांनीं गाजविली. पण या पुरातन ग्रामसंस्थेंत कोणालाहि ढवळाढवळ करावीशी वाटली नाहीं; व कोणी केलीहि नाहीं. पण प्रत्यक्ष ढवळाढवळ केली नसली तरी अप्रत्यक्षपणें ढवळाढवळ झाली यांत शंका नाहीं. नवी रयतवारी पद्धति हिंदुस्तानांत सुरू झाल्यापासून या ग्रामसंस्थेच्या मुळाशींच कोणी कुऱ्हाड मारल्यासारखें झालें आहे.

पण सुदैवानें बडोदें संस्थानांत महाराजांनीं या जुन्या ग्रामपंचायतींचें पुनरुज्जीवन केलें आहे. १९०२ व पुढें १९२० सालीं ग्रामपंचायती संबंधानें नियम करण्यांत आले. प्रत्येक पंचायतींत आतां कमींतकमी नऊ व जास्तींत जास्त बारा सभासद असतात. यापैकीं दोन तृतियांश गांवकऱ्यांनीं निवडून द्यावयाचे. पंचायतीचा अध्यक्ष हल्लीं बहुतेक गांवकऱ्यांनींच निवडलेला असतो. गांवांत सुधारणा करतां याव्या म्हणून या पंचायतीला सरकारची संमति घेऊन एखादा नवा कर बसवितां येतो. पंचायतीची निवडणूक तीन तीन वर्षांनीं होते. लोकांची तंदुरुस्ती व गांवांतील आरोग्य राखणें, पाण्याचा पुरवठा करणें, दान-धर्माकडे लक्ष देणें, अमुक एका प्रकारचे दिवाणी व फौजदारी गुन्हे चालविणें इत्यादि कामें ग्रामपंचायतीकडून हल्लीं केलीं जातात. या ग्रामपंचायतींनीं अधिक चांगल्या प्रकारें काम करून आपली योग्यता दाखविल्यास त्यांना ज्यास्त अधिकार देण्याचाहि महाराजसाहेबांचा

मनसुबा आहे. हल्लीं बडोदें प्रांतांत ६०३, कडी प्रांतांत ८७२, नवसरी प्रांतांत ३९५ व अमरेळी प्रांतांत १८५ मिळून २०५'१ ग्रामपंचायती आहेत.

ग्रामपंचायतीप्रमाणेंच महाराजांनीं तालुका व जिल्हा पंचायतीं-संबंधानें नियम करून त्यांना विशिष्ट अधिकार दिले आहेत. महाराजांची इच्छा अशी कीं, लोकांनीं अशा तऱ्हेनें प्रजासत्ताक राज्य-पद्धतीचीं तत्त्वें आत्मसात करून स्वयंसिद्ध व स्वतः पूर्ण बनावें.

प्रजेला स्वतःच्या हक्काची जाणीव व्हावी व तिनें राज्यकारभारांत सरकारला मदत करावी म्हणून, ज्याप्रमाणें महाराजांनीं ग्रामपंचायती व तालुका पंचायती स्थापन केल्या, त्याचप्रमाणें मोठाल्या शहरांतून त्यांनीं म्युनिसिपालिटया स्थापन करून त्यांच्याकडे लोकांच्या आरोग्याच्या व सुखसोयीच्या गोष्टी सोंपविल्या आणखी याच हेतूनें प्रेरित होऊन महाराजांनीं धारासभा किंवा कायदेमंडळ १९०८ सालीं स्थापन केलें. धारासभेंत प्रथम सतरा सभासद होते ते आतां सव्वीस आहेत. त्यांत एक प्रेसिडेंट, सहा सरकारी सभासद, पांच निमसरकारीं सभासद, चार नियुक्त लोक सभासद आणि दहा निवडून आलेले सभासद अशी विभागणी आहे. धारासभा निघून बरींच वर्षें झालीं पण त्याच्यांतील सभासदांनीं मामुली काम करण्यापलीकडे स्वतः होऊन नवीन कांहींहि सुधारणा केल्या नाहींत.

न्यायदानाच्या पद्धतींत सुधारणा करण्याचें पहिलें श्रेय सर टी. माधवराव यांना द्यायला हवें. खंडेराव महाराजांच्या कारकीर्दींत वहिवाटदार हा मुलकी अधिकारी असूनहि दिवाणी खटले चालवी. त्याच्याबद्दल आतां प्रत्येक जिल्ह्यांत दिवाणी कोर्टें स्थापन करण्यांत आलीं. वहिवाटदार हा फौजदारी खटल्यांची थोडीशीं कामें करूं शकूं लागला.

राजकुटुंबांतील मंडळी, सरदार–दरकदार–मंडळी, वगैरे करितां एक सरदार कोर्ट उघडण्यांत आलें. या कोर्टांत मुख्य न्यायाधीश, शिलेदार बक्षी, शिबंदी बक्षी वगैरे अधिकारी असत. या कोर्टांतील कामाविरुद्ध अपील हायकोर्टाकडे होई. त्यांत तेरा सरदार असे होते कीं, ज्यांना सरदार कोर्ट कांहींच करूं शकत नसे. महाराजांच्या परवानगीवांचून या सरदारांवर सरदारकोर्ट काम चालवूं शकत नसे. हें सरदारकोर्ट १९०४ पर्यंत चालू होतें. पण हा सयामचा हत्ती बाळगण्याचें पुढें सरकारला प्रयोजन दिसेना. म्हणून या सालीं हें कोर्ट बंद करण्यांत आलें.

याखेरीज कांहीं सरदारांना शिक्षा व दंड करण्याचे अधिकार पूर्वी होते. स्वतःच्या इनामगांवांत त्यांना अपराध्याला शिक्षा करतां येई. मल्हाररावानंतर सर लुई पेली यानें सरदारांचे हे अधिकार काढून घेतले. पण सर टी. माधवराव यांनीं या बाबतींत विचार करून सरदारांना पुनः या बाबतींत सनदा अर्पण केल्या. या सनदा तीन प्रकारच्या आहेत. पहिल्या प्रतीच्या सनदेप्रमाणें गुन्हेगाराला पंधरा रुपयांपर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास पंधरा दिवस शिक्षा सरदार करू शकतो. दुसऱ्या प्रतीच्या सनदेप्रमाणें एखादा सरदार अपराध्याला दहा रुपयापर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास दहा दिवस तुरुंगाची शिक्षा देऊ शकतो. तिसऱ्या प्रतीच्या सनदेप्रमाणें एखादा सरदार एखाद्या अपराध्याला सात रुपयापर्यंत दंड किंवा दंड न दिल्यास पांच दिवस तुरुंगवासाची शिक्षा सांगू शकतो. ही पद्धति अजूनहि रूढ आहे.

सर टी. माधवराव यांनीं नवीन कायदे स्टेटकरितां कांहीं केले नाहींत. महाराजांनीं हें काम करावें असें त्यांच्या मनांतून होतें. जेव्हां केव्हां संस्थानांत चालू असलेला कायदा एखाद्या न्यायाधीशाला अपुरा वाटेल तेव्हां त्यानें वरिष्ठ कोर्टाचा सल्ला घ्यावा. व वरिष्ठ कोर्टानें या

बाबतींत ब्रिटिश हिंदुस्तानांत चालू असलेल्या कायद्याचा अवलंब करावा, असें सर टी. माधवराव यांचें सांगणें असें, विशेषत: इंडियन पीनल-कोडचा उपयोग बडोद्यांत विशेष होई. पण अजून बडोद्यांत चालू असलेल्या कायद्याला निश्चित स्वरूप आलें नव्हतें.

तें स्वरूप महाराजांनीं आणून दिलें. १८८१ मध्यें महाराजांनीं कायदे तयार करण्याकरितां एक कायद्याची कमिटी नेमली. ह्या कमिटीचें काम १८९० पर्यंत चालू होतें. आणि या अवधींत स्टँप, रजिस्ट्रेशन, पोलिस वगैरेसंबंधीं कायदे तयार झाले. पण या कमिटींत बसणाऱ्या न्यायाधीशांना आपलें न्यायदानाचें काम संभाळून कमिटीचें काम झपाट्यानें करतां येईना. म्हणून महाराजांनीं १८९२ सालीं रिटायर्ड जज्ज गाडगीळ यांस ब्रिटिश नमुन्याप्रमाणें सिव्हिल प्रोसिजर कोड बनविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें कोड तयार होऊन १८९६ पासून तो संस्थानांत अंमलांतहि येऊं लागला. मध्यंतरी महाराजांनीं मि. नेलर यांस बडोद्याचे ज्युडिशिअल कमिशनर नेमलें. त्यांनीं पीनल, क्रिमिनल प्रोसिजर व पोलिस कोड संस्थानाकरितां तयार केले. तसेंच कोडांची भाषा उमगण्याकरितां एक प्रस्तावना–खंड प्रसिद्ध केला. ब्रिटिश हिंदुस्थानांत चालू असलेल्या कायद्याबरहुकूम बडोद्यांत सुरू करण्यांत आलेले नवे कोड गेल्या तीस पसतीस वर्षांपासून बडोद्यांत प्रचलित आहेत.

मि. नेलर १८९५ सालीं सेवानिवृत्त झाले; आणि पुन: लॉ-कमिटी आपलें काम करूं लागली. तिचें काम पुढें वरिष्ठ कोर्टाकडे बदलण्यांत आलें; आणि या कोर्टानें ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट तयार केला व रजिस्ट्रेशन ॲक्टांत सुधारणा केल्या. त्यानंतर महाराजांनीं १९०२ सालीं महत्त्वाचे दोन कायदे पास केले. ते म्हणजे हिंदु–विधवा–पुनर्विवाह–निबंध व धर्मस्वातंत्र्य निबंध हे होत.

१९०४ सालीं याच्याहि पुढें जाऊन महाराजांनीं लहान मुलांचीं

लग्नें बंद करणारा कायदा तयार करविला. त्यावेळीं कांहीं लोकांनीं महाराजांचें अभिनंदन केलें, तर कांहींकांनीं त्यांच्यावर टीकेचा भडिमार केला. पण नेहमींप्रमाणेंच महाराजांनीं आपलें मन शांत ठेवून आपणाला वाटते ती सुधारणा केलीच. या कायद्याप्रमाणें मुलाचें लग्न सोळा वर्षांपूर्वी होऊं शकत नाहीं, व मुलीचें बारा वर्षांपूर्वी होऊं शकत नाहीं. या वयांच्या मर्यादेच्या बाहेर जाणाऱ्यास शिक्षा होते. ब्रिटिश हिंदुस्तानांत शारदा कायदा दोन वर्षांमागें पास झाला. पण त्याच्याहिपूर्वी अनेक वर्षें बडोद्यांत मुलांच्या लग्नाला मनाई होती. बडोदें जें करतें तें हिंदुस्तानांत केलें जातें असें म्हणतात त्याचें हें उत्कृष्ट प्रत्यंतर होय.

१९०४ सालीं कायदे तयार करण्याचें काम नवीनच उत्पन्न करण्यांत आलेल्या न्यायमंत्री कचेरीकडे सोंपविण्यांत आलें. न्यायमंत्री हा कायदे तर बनवितोच, पण त्याखेरीज तो निरनिराळ्या खात्यांना कायद्याची सल्ला देतो. १९०५ सालीं महाराजांनीं हिंदुकायदा कोडाच्या स्वरूपांत प्रसिद्ध करून जे अजूनपर्यंत ब्रिटिश हिंदुस्थानांत शक्य झालें नाहीं तें करून दाखविलें.

दुसरी एक सुधारणा न्यायाच्या बाबतींत महाराजांनीं अशीच केली. १९०७ सालापूर्वी संस्थानाविरुद्ध खटले ज्युडिशिअल कोर्टांत येऊं शकत नसत. पण हा भेद महाराजांसारख्या समतावादी पुरुषाला पाहवणें शक्यच नव्हतें. आणि त्याप्रमाणें त्यांनीं हा निर्बंध काढून टाकला. १८९०-९१ सालापर्यंत सर्व प्रकारचे लहान मोठे खटले एकाच तऱ्हेनें चालत. त्यामुळें अकारण लहान गोष्टींत कोर्टांचा वेळ जाई. समजा एकानें दुसऱ्याची कोंबडी चोरली. त्यामुळें दुसऱ्यानें कोर्टांत खटला भरला. खटला व्यवस्थित चालत असतांना दोनचार महिने निघून गेले. आणि शेवटीं खटल्याच्या निकालाला कांहीं दिवस राहिले

असतांना दोघांनीं येऊन कोर्टापुढें राजिनामे दिले ! कोर्टाला राजिनामा घेणें प्राप्तच आहे; पण कोर्टाचा वेळ नाहक फुकट गेला त्याचें काय ? अशा प्रकारच्या गंमती टाळण्याकरितां 'नाना दावानो निबंध' नांवाचा कायदा १८९० मध्यें पास करण्यांत आला. या निबंधाप्रमाणें खट-ल्याला एकदम सुरवात होते, साक्षीदारांच्या साक्षी संक्षेपानें घेतल्या तरी चालतात, आणि सर्वांत विशेष म्हणजे निकालाविरुद्ध कोणाला अपील करतां येत नाहीं. दिवाणी दाव्यासंबंधीं केलेली ही सुधारणा लहानसहान फौजदारी खटल्यांनाहि लावण्यांत आली.

१९०७-०८ सालीं महाराजांनीं दुसरी एक महत्त्वाची सुधारणा न्यायाच्या बाबतींत केली. १९०४ सालापूर्वीं बरेच दिवस महाराजांच्या मनांत न्यायखातें व अंमलबजावणी खातें यांत फारकत करावयाचें घाटत होतें. बरींच वर्षे वहिवटदार फौजदारी खटले चालवी व गांवां-तील मुन्सफ फक्त दिवाणी दाव्यांकडे लक्ष देई. यामुळें एकतर वहि-वटदाराला आपलीं इतर मुलकी कामें व्यवस्थित करतां येईना, व दुसरें जो न्याय देणार तोच अंमल बजावणार असें असल्यावर न्यायाची थोडीफार विटंबना झाल्याखेरीज कशी राहणार ? शेतसारा वगैरेंच्या बाबतींत जो वादी तोच न्यायाधीश बनल्यावर न्याय मिळण्याची कोणीं, कां, व कशी अपेक्षा करावी ? तेव्हां हा अन्याय थांबविण्याकरितां १९०६ सालीं वहिवटदाराच्या न्यायदानाच्या कामापैकीं ३/४ काम मुन्स-फानें करावें व उरलेलें १/४ वहिवाटदारानें करावें असे ठरलें. पण हेंहि १/४ पाप त्याला कां करूं द्यावें, असें वाटून १९०७–०८ सालीं दिवाणी दाव्यांप्रमाणें फौजदारी खटलेहि एकटा मुन्सफच चालवूं लागला, व ती पद्धति अजून चालू आहे.

लोकांच्या मदतीनें न्याय देण्याचें तत्त्व महाराजांना प्रिय असल्या-मुळें १९०१ मध्यें त्यांनीं बडोदें व नवसारी या दोन ठिकाणीं असे-

सरांच्या मदतीनें न्याय द्यावा असें ठरविलें. हा प्रयत्न यशस्वी झाल्यानें कडी व अमरेळी या दोन प्रांतासहि हा नियम लावण्यांत आला. पुढें याच दिशेनें प्रगति होत होत १९१० सालीं ज्युरीच्या मदतीनें न्याय देण्याचा हुकूम सोडण्यांत आला. लोकांची परीक्षा पाहावयाची व ते योग्य रीतीनें दिलेलीं कामें बजावीत आहेत असें कळल्यावर त्यांना अधिकार द्यायवाला विलंब करावयाचा नाहीं असें जणूं काय कायमचेंच महाराजांचें तत्त्व ठरून गेलें आहे.

बडोदें संस्थानांत वरिष्ठ कोर्ट ही सर्वांत उच्च अशी न्याय देणारी संस्था होय. पण वरिष्ठ कोर्टाच्या निकालांत बदल करण्याचा अधिकार महाराजांना आहे. आणि या न्यायदानाच्या बाबतींत महाराजांना त्यांच्या न्यायसभेची मदत होते. न्यायसभेंत वरिष्ठ कोर्टाच्या न्यायाधीशासह तीन सभासद असतात. वरिष्ठ कोर्टाच्या ज्या न्यायाधीशाविरुद्ध अपील करण्यांत आलें असेल तो या तीन सभासदांत नसतो. स्थावर रकमेच्या बाबतींत दावा पांचहजार रुपयांच्या वर असला किंवा, जंगम रकमेच्या बाबतींत दावा पंधरा हजार रुपयांच्या वर असला, तरच वरिष्ठ कोर्टाविरुद्ध अपील करण्यांत येतें.

गेल्या दोन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या व अमलांत आलेल्या कायद्यांत लग्नविच्छेचा कायदा अत्यंत महत्त्वाचा होय. अजून ब्रिटिश हिंदुस्तानांत या कायद्याची वार्ताहि नाहीं. पण बडोदें संस्थानांत महाराजांनीं पुढाकार घेऊन हा कायदा पास केला. या कायद्याप्रमाणें प्रत्येक स्त्रीला अमुक एका परिस्थितींत आपल्या नवऱ्यापासून लग्नविच्छेद करून घेतां येतो. हा कायदा तयार करीत असतांना खूप मेहनत घेण्यांत आली. लोकांचीं मतेंहि विचारण्यांत आलीं. आणि शेवटीं त्याचा अंमल गेल्यावर्षापासून सुरू झाला.

यानंतर महाराजांच्या शिक्षणविषयक सुधारणांचा उल्लेख करावयाचा.

बडोद्याच्या बाहेर जो महाराजांचा गौरवपूर्वक उल्लेख केला जातो. याला मुख्य कारण म्हणजे त्यांची शिक्षणविषयक कामगिरी. श्रीमंत सयाजीराव महाराज हे जेव्हां जन्मास आले तेव्हां ते श्रीमंतहि नव्हते व महाराज तर नव्हतेच नव्हते. पुढें सुदैवानें ते श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड बनले. लहानपणीं त्यांच्या ठिकाणीं लक्ष्मीप्रमाणें सरस्वतीची देखील अवकृपाच होती. लक्ष्मीची कृपा त्यांनीं सुदैवानें संपादिली; व सरस्वतीची कृपा मेहनत करून मिळविली. वयाच्या बारा वर्षांपर्यंत त्यांना लिहितां–वाचतां मुळींच येत नव्हतें. असें असून त्यांनीं अठरा वर्षेपर्यंत इतका कसोशीनें अभ्यास केला कीं, पुढें राज्य-कारभाराची जबाबदारीचीं कामेंहि ते पाहूं लागले. महाराजांनीं स्वतः प्रयत्नानें विद्या संपादन केली. आणि जें आपण प्रयत्नानें मिळवू शकलों तें आपल्या प्रजेला कां मिळवितां येणार नाहीं ? अशी त्यांची समजूत असल्यामुळें आपल्या प्रजेला त्यांनीं सुशिक्षित बनविण्याचा जणूं काय विडाच उचलला आहे.

महाराजांच्या शिक्षणविषयक कामगिरीचें खरें स्वरूप लक्षांत यायला आपणाला थोडा मागचा इतिहास पाहणें अगत्याचें आहे. १८७० सालीं बडोद्यांत विद्याखातें किंवा सरकारी शाळा म्हणून नव्हती. सुमारें दोनशें ' पंड्याजीनी निशाळो ' नांवाच्या शाळा असत. पण त्या शाळां-वर कोणाचीहि देखरेख नसे. या शाळांतून लिहिणें, वाचणें, गणित वगैरे विषय शिकविण्यांत येत. या सर्व शाळा मिळून सुमारें आठ हजार मुलें शिक्षण घेत. बडोदें येथील रेसिडेन्सींत एक अँग्लो–व्हर्नाक्युलर शाळा होती; व दुसरी शाळा सर कावसजी जहांगीर मद्रेसा नांवाची नवसरी येथें पारशी विद्यार्थ्यांकरितां होती. ही शाळा १८५६ पासून सुरू होती, व अजूनहि ती चालू आहे. १८७१ सालीं बडोद्यांत एक हायस्कूल स्थापन करण्यांत आलें. व दोन मराठी व दोन गुजराथी

अशा चार प्राथमिक शाळा उघडण्यांत आल्या. या सर्व शाळांतील शिक्षकांची संख्या सतरा होती, त्यांचा पगार वर्षांतून अठराशें होता. आणि आठशेंबावीस मुलें सरकारी शाळांतून जात असत. दोन वर्षांनंतर मल्हारराव महाराजांनीं धार्मिक शिक्षण देण्याच्या उद्देशानें चार वेदशाळा स्थापन केल्या. तसेंच याच वर्षीं पेटलाद येथें इंग्रजी शाळा सुरू करण्यांत आली. १८७५ सालीं एक गुजराती मुलींकरितां व एक दक्षिणी मुलींकरितां अशा दोन कन्याशाळा निघाल्या. तसेंच याच वर्षीं एक एक उर्दु शाळा मुसलमान विद्यार्थ्यांकरितां निघाली. त्या वर्षीं बडोदें शहरांत नऊ संस्कृत शाळा, तीन मराठी शाळा, तीन गुजराती शाळा, एक उर्दु शाळा व एक हायस्कूल अशा एकंदर सतरा सरकारी शिक्षण संस्था होत्या. याच वर्षीं पेटलाद व पट्टण येथेंहि शाळा स्थापन करण्यांत आल्या. १८७५ सालींच देशी शाळाखातें स्थापन करण्यांत आलें. ज्या वर्षीं महाराजांनीं अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेतलीं त्या वर्षीं १८० प्राथमिक शाळा असून त्यांत सुमारें साडेसात हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते.

या परिस्थितीशीं १९३३ सालची परिस्थिती ताडून पाहिली तर त्यांत आपणाला जमीन अस्मानाचा फरक आढळेल. १९३१ च्या वसती-मोजणी ( Census ) प्रमाणें बडोद्याची लोकसंख्या साडेचोवीस लाख इतकी आहे. या लोकसंख्येंत साडेबारा लाख पुरुष व सुमारें पावणेबारा लाख स्त्रिया आहेत. बडोद्याच्या साडेचोवीस लाख लोकसंख्येपैकीं प्राथमिक शिक्षण घेणारीं मुलें-मुलीं मिळून एकंदर विद्यार्थी अडीच लाख आहेत. या अडीच लाख विद्यार्थ्यांचें पालक शिकलेले आहेत असें मानल्यास साक्षर लोकांची संख्या सुमारें साडेदहा लाख भरेल. लोकसंख्येशीं ही संख्या ताडून पाहिल्यास साक्षरतेचें प्रमाण सुमारें तेवीस टक्के पडेल. अर्थात् ही अभिमानाची गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल ?

बडोद्यांत उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या सुमारें चौदा हजार असून त्यांत हजाराच्यावर स्त्रिया आहेत. शाळाखात्याप्रीत्यर्थ बडोदें संस्थान चौतीस लाख रुपये खर्च करतें; आणि प्रत्येक मुलामागें सरकारला सुमारें एकशेंचौपन्न रुपये खर्च येतो. पण सर्वांना शिकविण्याची आवड महाराजांच्या ठिकाणीं फार असल्यामुळें ते ह्या खर्चांकडे मुळींच वक्रदृष्टीनें बघत नाहींत.

उलट शाळाखातें हें महाराजांच्या आवडत्या खात्यांपैकीं एक आहे. शाळा खात्यांतील महाराजांची सर्वांत मोठी सुधारणा म्हणजे सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण ही होय. १८९२ सालीं महाराजांनीं अमरेळी येथें व आजूबाजूच्या कांहीं गांवांतून प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें. मुलांच्या बाबतींत प्राथमिक शिक्षणाची सक्तीची वयोमर्यादा आठ ते चौदा वर्षांची असून मुलींच्या बाबतींत ती आठ ते बारा वर्षांची होती. या वयोमर्यादेच्या आंतील मुलामुलींना सक्तीचे शिक्षण घ्यावेंच लागे. अमरेळी तालुक्यांत प्रयोग म्हणून सुरू केलेलें सक्तीचें प्राथमिक शिक्षण १९०६ सालापासून सर्व राज्यभर करण्यांत आलें. या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाविरुद्ध त्या वेळीं बराच आरडाओरडा करण्यांत आला. पण आज त्याचीं आपण मधुर फळें चाखत आहोंत. सध्यां संस्थानांत अडीच हजारांवर प्राथमिक शाळा असून त्यांत मुलींच्या शाळा तीनशेंच्या वर आहेत.

अशा तऱ्हेनें प्राथमिक शिक्षणाची हीं अपूर्व पाणपोई बांधल्याबद्दल महाराजांची प्रजा महाराजांना निरंतर दुवाच देत राहील. पण या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या कारखान्यांतील कांहीं यंत्रें कुरकुर करीत असलेली आम्हांला ऐकूं येत आहेत. ही मंडळी म्हणजे प्राथमिक शाळांतील शिक्षक होत. या बिचाऱ्या शिक्षकांचे पगार अजून प्राथमिक अवस्थेंत असलेलें पाहून कोणालाहि अचंबा वाटेल. ज्या शिक्ष-

कांवर अडीच लाख विद्यार्थ्यांचें शिक्षण अवलंबून त्या शिक्षकांना असंतुष्ट ठेवून कसें बरें चालेल ? वास्तविक शिक्षणाचा पाया ते रचून तयार करतात. असें असून त्यांना पोटाला पुरेसा पगार मिळूं नये ही कांहीं ठीक गोष्ट नाहीं. 'मास्तरकी म्हणजे म्हारकी' किंवा 'मराठी शाळेंतील मास्तर म्हणजे मूर्तिमंत दारिद्र्याचा अवतार.' अशा प्रकारचे उद्गार ज्या धंद्याबद्दल निघतात तो धंदा कोणाला हौसेनें करावासा वाटेल. पंधरा रुपयांवर बिचारा शाळामास्तर आपलें आयुष्य सुरू करतो व दर दोन वर्षांनीं एक अशा विलक्षण बढतीनें तीस वर्षांनीं त्याला तीस रुपये पगाराचा मेहेनताना मिळूं लागतो ! तीस वर्षांच्या खडतर तपश्चर्येला अशीं फळें यावयाचीं असल्यास कोण ती आनंदानें करील ? मनुष्याच्या अनुभवाला कांहींच किंमत नसते का ? विलायतेहून आल्याखेरीज तो शहाणा होऊं शकत नाहीं का ? पण बडोद्यांत पाश्चात्य ज्ञानाची अजूनहि भुरळ पडलेली दिसते. असें एक गंमतीचें उदाहरण आम्हीं ऐकलें आहे कीं, टेम्स नदींत दोन बुचकळ्या मारून आलेल्या शिक्षकाच्या पगारांत एकदम इतकी बढती झाली कीं, विश्वामित्रींत सतत तीस वर्षे भक्तिभावानें स्नान करणारा दुसरा एक शिक्षक जागच्याजागीं थंडावला ! ह्या गोष्टीच्या खरेपणाविषयीं आम्हांला नक्की माहिती नाहीं. पण तिच्यांतील तथ्यांश ग्रहण करण्याजोगा आहे.

प्राथमिक शिक्षणांतील दुसरी एक गोष्ट अशीच विचारांत घेण्याजोगी आहे. शिक्षण सक्तीचें झालें हें ठीकच झालें पण तें शिक्षण सर्व जण सुखानें व सोयीनें घेऊं शकतात कीं नाहीं हें नको का पाहावयाला ? हल्लीं बरींच गरीब पालकांचीं गरीब मुलें शाळेंत जातांना अळंटळं करतात. व आईबापहि त्यांना पाठवावयाला कुरकूर करतात. आणि त्यांची कुरकूरहि स्वाभाविक नाहीं का ? गरीबाच्या कुटुंबांतील प्रत्येक घटकावयवाला कमवावेंच लागतें. एकानें कमवावें व दहानीं बसून खावें अशी स्थिति

त्याच्या घरीं नसते. ती त्याला नको असते असें म्हणवत नाहीं. पण त्याला एवढें उत्पन्न मिळत नाहीं कीं, जेणें करून तो बाकीच्यांना बसवून खाऊं घालूं शकेल. प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें कमवावें व कमविल्याप्रमाणें खावें, असें त्याच्या घरांत चालतें. प्राथमिक शिक्षण सक्तीचें केल्यामुळें कायद्याप्रमाणें त्याला आपल्या मुलाला किंवा मुलीला शाळेंत पाठविणें भागच आहे. पण शाळेंत पाठवून मुलाच्या पोटाची व्यवस्था काय ? बरें न पाठवून तरी कसें चालणार ? न पाठविल्यास दंड भरावा लागणार. तेव्हां तो मनाशींच विचार करून ठरवितो कीं, 'कांहीं हरकत नाहीं. मुलाला नाहीं पाठविणार शाळेंत. दंड दंड करकरून किती करणार ? एका दिवसाला एक किंवा दोन आणे करतील. कांहीं चिंता नाहीं. माझा मुलगा आठ आणे रोजीं कमवितो. त्याच्यांतून दोन आणे सरकारला द्यावे लागले तरी मला सहा आण्याचा निव्वळ नफा राहतोच ! तेव्हां असाच परिपाठ ठेवावा. ज्या दिवशीं मजुरी मिळणार नाहीं, त्या दिवशीं मुलाला पाठवूं शाळेंत. शिकेल तेवढ्यांत चार अक्षरें. कांहीं वाईट नाहीं.' अशा तऱ्हेची विचारसरणी तत्त्वाच्या दृष्टीनें अनुचित असेल, पण वस्तुस्थितीला ती धरून आहे यांत शंका नाहीं. तेव्हां सरकारनें या बाबतींत धडा घ्यावयाचा तो हा कीं, गरीब लोकांच्या मुलांना ज्या शिक्षणापासून चार सहा आणे रोजीं मिळूं शकतील असें शिक्षण दिल्यास ते आनंदानें घेतील. गरीब पालकांच्या मुलांकरितां उद्योगशाळा काढावयाला हव्या. या उद्योग शाळांतून उद्योगाच्या शिक्षणाबरोबर प्राथमिक शाळांतून शिकविले जाणारे विषय शिकवावेत. असें केल्यानें मुलांना ज्ञानप्राप्ति व द्रव्यप्राप्ति एकदमच होईल; आणि मग ते मुळींच कुरकूर करणार नाहींत.

तरीपण प्राथमिक शिक्षणापासून प्रजेला पुष्कळ फायदा झाला यांत शंका नाहीं. प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाराजांचें लक्ष दुय्यम व

४८३१०१

उच्च शिक्षणांकडे गेलेलें आहे. बडोदें संस्थानांत दुय्यम शिक्षण देणाऱ्या सुमारें पाऊणशें संस्था असून त्यांत तेरा हजारांवर मुलें शिक्षण घेत आहेत. या संस्थांत बडोदें येथील महाराणी गर्ल्स हायस्कूलची गणना करावयाला हवी. या संस्थेला नुकतीच पंचवीस वर्षें पुरीं झालीं असून तिच्यांतील मुलींची संख्या सातशेंच्या वर आहे. उच्च शिक्षणाकरितां बडोदें येथें एक कॉलेज असून त्याचा सुवर्णमहोत्सव गेल्याच वर्षी साजरा करण्यांत आला. महाराजांनीं या कॉलेजची स्थापना केली होती, त्यामुळें त्यांनींच उभारलेल्या उच्च शिक्षणसंस्थेची पन्नास वर्षें झालेलीं पाहतांना त्यांना आनंद व अभिमान खचित वाटला असेल. बडोदें कॉलेजांत सुमारें नऊशें विद्यार्थी असून त्यांत वीस स्त्रिया आहेत. बडोदें कॉलेजच्या जवळच नवीन स्वतंत्र सायन्स कॉलेज निघत आहे. मुलींच्या उच्च शिक्षणाची अशीच बडोद्यांत व्यवस्था आहे. मुलींकरितां एक स्वतंत्र कॉलेज असून तें कर्वे युनिव्हर्सिटीला जोडण्यांत आलें आहे. या कॉलेजांत सुमारें चाळीस स्त्रिया शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळांकरितां शिक्षिका तयार करण्याचें काम फीमेल ट्रेनिंग कॉलेज उत्तम प्रकारें करीत आहे. या संस्थेंत सुमारें पावणेदोनशें स्त्रिया शिक्षण घेत असून, त्यांना शिक्षण सुरू असतांना शिष्यवृत्ति देण्यांत येते. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न अशा प्रकारें ही संस्था सोडवीत आहे.

प्राथमिक शिक्षण सक्तीचें केल्याबद्दल ज्याप्रमाणें महाराजांची कीर्ती हिंदुस्तानभर पसरली, त्याचप्रमाणें त्यांनीं स्थापन केलेल्या कला-भवनानेंहि त्यांची कीर्ति पसरविली, बडोदें संस्थानांत धंदे—शिक्षण देणाऱ्या एकंदर पांच संस्था आहेत. त्यांत तीन प्राथमिक औद्योगिक शाळा असून, त्या पेटलाद, पट्टण व अमरेळी येथें आहेत. जे. एन्. टाटा हुन्नर शाळा नांवाची संस्था नवसरी येथें असून बडोदें

येथें सुप्रसिद्ध कलाभवन आहे. कलाभवनाची स्थापना १८९० सालीं झाली आणि सध्यां त्यांत साडेपांचशेंच्या वर विद्यार्थी धंदेशिक्षण घेत आहेत. कलाभवनांत मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, केमिकल टेक्नॉलॉजी, टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चर, आर्ट, आर्किटेक्चर व कॉमर्स इतके विषय तज्ज्ञांकडून शिकविले जातात. कलाभवनमध्यें सुमारें अडीचशें विद्यार्थी बडोदें संस्थानचे असून बाकी तीनशेंच्या वर विद्यार्थी मुंबई इलाखा, मद्रास, बंगाल, पंजाब, यु. पी., सी. पी., आसाम, काश्मीर, त्रावणकोर वगैरे दूर दूरच्या प्रांतांतून शिक्षण घ्यावयाला बडोद्यास आलेले असतात. कलाभवनची फी थोडी व बडोद्याची रहाणी मध्यम प्रतीची, असें असल्यामुळें बाहेरच्या मुलांना येथें राहून शिक्षण घेणें सोयीचें जातें.

प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, उच्च शिक्षण, औद्योगिक शिक्षण या सर्व शिक्षणांबरोबरच महाराजांचें लक्ष संगीत शिक्षणाकडे देखील आहे. बडोदें येथें भारतीय संगीत पाठशाळा असून तिच्यांत गायन, व दिलरुबा, फिडल, सतार, तबला सनई वगैरे वाद्येंहि शिकविलीं जातात. या पाठशाळेंत सुमारें शंभर विद्यार्थी असून त्यांत दहा स्त्रिया आहेत. पाठशाळेचे वर्ग संध्याकाळीं ६ ते आठ दोन तास असतात.

पुढारलेल्या जातींच्या शिक्षणाप्रमाणेंच मागासलेल्या जातींच्या शिक्षणाकडे महाराजांचें लक्ष आहे. मागासलेल्या जातींची सुधारणा करावयाची असल्यास प्रथम त्यांना शिक्षण द्यावयाला पाहिजे, हें तत्त्व महाराजांना पूर्णपणें पटलें आहे. बडोदें संस्थानांत कांहीं जंगली जाती आहेत त्यांच्या शिक्षणाकरितां सोनगढ, व्यारा, महुवा, अनावल, वानकल, व तिलकवाडा अशा सहा ठिकाणीं वसतिगृह–शाळा आहेत. या सहा शाळा मिळून सुमारें चारशें ढाणका जातींचीं मुलें प्राथमिक शिक्षण घेत आहेत. ढाणका जातींच्या मुलींकरितांहि सोनगढ येथें एक वसति-

गृह–शाळा असून त्यांत सुमारें साठ विद्यार्थिनी आहेत. या सर्व शाळांचा परिणाम अत्यंत हितकर होत आहे. या जंगली–जातींचा हिंदुशीं संबंध येऊं लागल्यानें त्यांच्या वाईट चालीरीती त्यांनीं टाकावयाला सुरवात केली आहे. दारु पिणें, मांस खाणें, वगैरे प्रकारहि या लोकांनीं सोडून दिले आहेत. या शाळांतून प्राथमिक शिक्षणाबरोबरच शेतकी व बागायतीचें काम, भरतकाम व वीणकाम, हीं शिकविलीं जातात. वाघेर जातींच्या शिक्षणाकरितां द्वारका येथें एक वसतिगृह–शाळा आहे; व त्यांत सुमारें पंचवीस विद्यार्थी आहेत.

मुसलमानांच्या शिक्षणाची अशीच चांगली सोय करण्यांत आली आहे. मुलांच्या प्राथमिक उर्दु शाळा ७२ असून त्यांत सुमारें सहा हजार मुलें शिक्षण घेत असतात. मुलींच्या प्राथमिक उर्दु शाळा १३ असून त्यांत सुमारें दीड हजार मुसलमान मुली शिक्षण घेतात. एकंदर संस्थानांत मुलेंमुली मिळून सुमारें सतरा हजार मुसलमान विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्या लोकसंख्येच्या मानानें हें प्रमाण शेंकडा दहा पडतें.

अंत्यज किंवा अस्पृष्टांच्या शिक्षणाची अशीच सोय आहे. बडोदें संस्थानांत २०२ अंत्यजांच्या प्राथमिक शाळा असून त्यांत ५८२५ मुलें व ३५९७ मुली शिक्षण घेतात. या खेरीज मुलींच्या स्वतंत्र दोन शाळा असून त्यांत १४४ मुली शिक्षण घेतात. बडोदें संस्थानांत अंत्यजांची लोकसंख्या गेल्या वसती मोजणीप्रमाणें १,७६,८२१ इतकी आहे. त्यांत प्राथमिक शिक्षण घेणारीं मुलें १७,९९२ आहेत. म्हणजे लोकसंख्येच्या मानानें शिक्षण घेणाऱ्या मुलांचें प्रमाण शेंकडा दहा पडलें.

महाराजांची आणखी शिक्षणविषयक कामगिरी म्हणजे संस्थानभर त्यांनीं पसरलेलीं वाचनालयें किंवा लायब्ऱ्या ही होय. प्राथमिक

शिक्षणाबरोबरच वाचनालयाची देखील अवश्यकता आहे, असें समजून १९१०–११ सालीं संस्थानांत सर्वत्र वाचनालयें सुरू करण्यांत आलीं. संस्थानांतील ६९८ गांवांतून वाचनालयें आहेत. संस्थानच्या साडे-चोवीस लक्ष लोकसंख्येपैकीं सुमारें सोळा लक्ष लोकांना वाचनालयांचा उपयोग करतां येतो. या सर्व वाचनालयांत बडोदें येथील सेंट्रल लाय-ब्ररी ही सर्वांत मोठी, उपयुक्त व सरस आहे. या वाचनालयाची रचना अगदीं आधुनिक पद्धतीवर करण्यांत आली आहे. सुमारें एक लाख पुस्तकांचा संग्रह या लायब्ररींत असून तीं पुस्तकें वाचकांना अगदीं फुकट वाचावयाला मिळतात. याच लायब्ररींत स्त्रियांकरितां व मुलांकरितां असे दोन विभाग आहेत. सेंट्रल लायब्ररी इतर गांवीं पुस्तकें पेट्यांतून पाठविण्याची अत्यंत उपयुक्त गोष्ट करीत असते.

बडोद्यांत प्राच्य विद्यामंदीर नांवाची संस्था असून तिच्यांत जुन्या संस्कृत ग्रंथांचें संशोधन व प्रकाशन चालू असतें. याच प्राच्यविद्यामंदी-राला भाषांतर शाखा नांवाची शाखा जोडण्यांत आली आहे. या शाखेंतून, श्रीसयाजी साहित्य माला, बालज्ञानमाला, नांवाच्या दोन माला सुरू असून शिवाय ग्रंथकारांना उत्तेजन व पारितोषिकहि मिळतें. श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं, देशी भाषांच्या उत्तेजनार्थ दोन लाख रुपये वेगळे ठेवले असून त्याच्या व्याजांतून वरील सर्व कामें होतात. श्रीसयाजी साहित्यमालेंत आतांपर्यंत १८३ ग्रंथ प्रसिद्ध झाले असून बालज्ञानमालेंत ८८ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. महाराजांनीं मोठ्या उदात्त हेतूनें एवढी मोठी रक्कम काढून ठेविली आहे. पण त्या रकमेचा विनियोग हल्लीं होतो त्याच्यापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें व्हावयाला पाहिजे.

बडोदें येथील म्युझियम (पदार्थ संग्रहालय), पिक्चर गॅलरी (चित्र-संग्रहालय) व इकॉनॉमिक कोर्ट या संस्थांचा उल्लेखहि महाराजांच्या

शिक्षणविषयक सुधारणांचा विचार करीत असतांना करावयाला हवा. चित्रसंग्रहालयांत पाश्चात्य तसेंच पौर्वात्य चित्रकारांचीं चित्रें ठेवण्यांत आलीं असून तज्ज्ञांच्या मतें तीं फार उत्कृष्ट आहेत. पदार्थसंग्रहालयांतील संग्रहहि बराच मोठा, माहितीनें भरलेला व मौल्यवान आहे.

बालचमूंची चळवळहि बडोद्यांत चांगल्या प्रकारें चालू आहे. या चळवळीला सुरवात १ जानेवारी १९१९ पासून झाली. प्रथम एक शंभर मुलांचा संघ तयार करण्यांत आला; व तो चांगला तयार झालेला पाहून पुढें त्याच्यांत वाढ करण्यांत आली. बडोदें येथील बालचमूंचें मुख्य शिबिर कमिटी बागेंतील म्युझियमच्या विस्तृत तळमजल्यांत आहे. १९२१ मध्यें चार स्काउट स्वतःच्या खर्चानें विलायतेंत शिक्षण घ्यावयाला गेले होते. बडोद्यांतील हे बालवीर अंत्यजांच्या शाळेंतील मुलांना आरोग्याचें शिक्षण देत असतात.

बडोद्यांत मूकांधवधिर शाळा प्रथम १९०९ सालीं खाजगी प्रयत्नानें सुरू करण्यांत आली. त्यावेळीं शाळेंत एकच मूक-बधिर विद्यार्थी होता. १९१०–११ सालीं नऊ विद्यार्थी शाळेंत असून त्यापैकीं दोन मुली होत्या. त्याच वर्षीं मेहेसाणा येथें अशीच शाळा स्थापन करण्यांत आली. दोन्ही शाळांना सरकारी मदत मिळत असे. पण ता. १ जानेवारी १९१५ पासून या दोन्ही शाळा सरकारी बनविण्यांत आल्या. या दोन्ही शाळा मिळून सव्वाशेंच्यावर विद्यार्थी आहेत.

---

बडोद्यांतील बांधकाम खात्यानें शिक्षण खात्याप्रमाणेंच खूप गोष्टी घडवून आणल्या आहेत. बडोद्यांत प्रेक्षक म्हणून येणाऱ्या गृहस्थाचें प्रथम मन कोणीं वेधून घेत असेल तर तीं बडोद्यांतील सरकारी मकानें होत. सयाजी–सरोवर नांवाचें विस्तृत सरोवर बांधून बडोद्यांतील लोकांना पाणी पुरवठा केल्याबद्दल महाराजांना धन्यवाद द्यावे तेवढे

थोडेच आहेत. सयाजी सरोवराचें काम १८८५ मध्यें सुरू होऊन १८९० मध्यें पूर्ण झालें. सूर्या नदीला बांध घालून सयाजी सरोवरांत पाणी घेतलें जातें. या सरोवरांत तेवीस फूट ज्यास्तींत ज्यास्त पाणी राहतें. सर्वसाधारण सरोवराची खोली अकरा फूट आहे; आणि पाण्याचा विस्तार साडे पांच स्क्वेअर माईल आहे. या सरोवरांतून तीस इंची नळ्यावाटे निमेठ्यास पाणी नेण्यांत येतें व तेथें तें गाळून शुद्ध केलें जातें. पूर्वीं पाणी जमविण्याचें क्षेत्र ३६ स्क्वेअर माईल होतें तें वाढवून आतां ५० स्क्वेअर माईल करण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेनें आतां अडीच वर्षें पाऊस पडला नाहीं तरी बडोद्यास पाणी मिळण्याची उत्कृष्ट सोय झाली आहे. सयाजीसरोवराप्रीत्यर्थ सरकाराला ३४ लाख रुपये खर्च झाला; आणि पाणी पुरवठ्याचें बडोदें म्युनिसिपालिटीला सालीना उत्पन्न १,२५,००० रुपयांचें आहे; बडोद्याप्रमाणेंच पट्टल, सोजित्रा, सिनोर, संखेडा, मेहेसाणा, सिद्धपूर, नवसरी वगैरे ठिकाणीं पाण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. याखेरीज बडोदें संस्थानांत २४ मोठालीं तळीं असून त्यांत पाणी आणून सोडण्याची व्यवस्था अशीच चांगल्या प्रकारची आहे.

बडोद्यांत प्रेक्षणीय बांधकामाचीं स्थळें बरींच आहेत. लक्ष्मीविलास राजवाडा १८९० सालीं बांधून झाला. हा राजवाडा इंडो-सारासिनिक पद्धतीप्रमाणें बांधण्यांत आला आहे. याची लांबी ५१२ फूट व रुंदी २०० फूट आहे. बडोदा कॉलेज इंडो–सारसिनिक पद्धतीवरच बांधण्यांत आलें आहे. कॉलेज बांधण्याचा खर्च ८,००,००० रुपये आला. कॉलेजचा भव्य घुमट विजापूरच्या गोलघुमटाप्रामाणें बांधण्यांत आला आहे. हिंदुस्तानांत विजापूर सोडल्यास बडोदा कॉलेजच्यासारखा भव्य व सुंदर घुमट नाहीं असें तज्ज्ञ म्हणतात. मकरपुरा राजवाडा, नझरबाग राजवाडा, नवीन कलाभवन, सेक्रेटरियेट बिल्डिंग, स्टेट जनरल हॉस्पि –

टल, हायस्कूल, म्युझियम व पिक्चर गॅलरी, खंडेराव मार्केट हीं सर्व शिल्पकलेच्या दृष्टीनें उत्तम ठरलेलीं आहेत.

लोकांना औषधोपचार देण्यांकरितां देखील महाराजांनीं इतकी उत्तम सोय करून ठेविली आहे कीं, हजारों आर्तजन महाराजांना अन्तःकरणापासून याबद्दल धन्यवाद देतात. खंडेराव महाराजांच्या वेळे-सहि बडोद्यांत एक हॉस्पिटल होतें, पण तें मिलिटरी लोकांकरितां विशेष होतें. राजा सर टी. माधवराव यांनीं १८७६ सालीं मेडिकल डिपार्टमेंटची स्थापना केली. त्याच्यापूर्वीं गणपतराव महाराज यांनीं बडोद्यांत स्टेट हॉस्पिटल काढलें होतें. खंडेरावांच्या वेळेस बरेच वैद्य व हकीम प्रत्येक पलटणींत असत. मेजर टी. कॉर्डी यांस मेडिकल डिपार्टमेंट सुरू करावयाला सांगितल्याबरोबर त्यांनीं बऱ्याचशा जुन्या वैद्य व हकिमांना घरीं बसावयाला लावलें; व त्यांच्या ऐवजीं पदवीधर डॉक्टर नेमिले. ता. ८ ऑगस्ट १८७७ रोजीं वारशिया कवायत मैदानावर सयाजीराव मिलिटरी हॉस्पिटल याच वर्षीं उघडण्यांत आलें. नवसरी येथें ग्रामस्थांकरितां एक हॉस्पिटल उघडण्यांत येऊन तें एका पदवीधर डॉक्टराच्या ताब्यांत देण्यांत आलें. जमनाबाई सिव्हिल हॉस्पिटल शहरांत याच सालीं सुरू करण्यांत आलें. सयाजी-राव महाराज यांनीं अधिकार सूत्रें हातीं घेतल्यावर सर्व राज्यभर प्रमुख ठिकाणीं इस्पितळें स्थापन करून लोकांच्या औषधोपचारांची सोय केली. बडोदें येथें काउंटेस ऑफ डफरीन हॉस्पिटल, लॉर्ड डफरीन व काउंटेस डफरीन आल्या असतां उघडण्यांत आलें. हें हॉस्पिटल इंडो-सारसिनिक पद्धतीप्रमाणें बांधलें असून तें बांधावयाला ३,५०,००० रुपये खर्च आला. हें हॉस्पिटल हल्लीं स्टेट जनरल हॉस्पिटल या नांवानें मुख्यतः ओळखलें जातें. बडोदें संस्थानांतील हें सर्वांत मोठें हॉस्पिटल असून औषधोपचार व शस्त्रोपचार येथें फार उत्तम प्रका-

रचा केला जातो. मूळचे डफरीन हॉस्पिटल लहान पडल्यानें बरोडा जनरल किंवा स्टेट जनरल हॉस्पिटल त्याच्याच जवळ बांधण्यांत आलें. हॉस्पिटल मधील व्यवस्था अत्यंत टापटिपीची व सोयीस्कर आहे. हॉस्पिटल मधील लोक हे आपापल्या कामांत पूर्णपणें वाकबगार आहेत.

या खेरीज लोकांच्या आरोग्यरक्षणाकरितां सॅनिटरी डिपार्टमेंट आहे तें वेगळेंच. या खात्याची सुरवात १८९० सालीं झाली. शहरांत स्वच्छता राखणें लोकांचें आरोग्य संभाळणें, आजार व सांथीच्या दिवसांत लोकांच्या औषधपाण्याची व्यवस्था करणें, गांवांत आरोग्याविषयीं लोकांना व्याख्यानें देणें, शिशुसप्ताहासारखे सप्ताह भरवून मुलांची जोपासना कशी करावी हें शिकाविणें, मुलांना व माणसांना देवी टोंचविणें वगैरे सारखीं आरोग्य विषयक कामें या खात्याला करावीं लागतात. त्याचप्रमाणें जन्म-मृत्यूची नोंद ठेवणें व वेळोवेळीं लोकांना त्यासंबंधीं जागृति देणें हेंहि काम सॅनिटरी डिपार्टमेंटला करावें लागतें. देवी टोंचविण्याची व्यवस्था गणपतराव महाराजांच्या कारकीर्दीपासून म्हणजे १८४७ पासून बडोदें संस्थानांत आहे. १९१४ सालीं महाराजांनीं वॅक्सिनेशन अॅक्ट पास केला. त्या अॅक्टाप्रमाणें देवी टोंचविणें कोणत्याहि ठिकाणीं सक्तीचें करतां येतें. बडोदें शहरांत देवी टोंचविणें सक्तीचें केलें आहे.

बडोदें संस्थानभर रेल्वेचें जाळें पसरून लोकांची जाण्यायेण्याची व व्यापाराची महाराजांनीं उत्कृष्ट सोय केली आहे. ही रेल्वे पूर्वीं बी. बी. सी. आय. रेल्वेच्या देखरेखीखालीं होती. पण हल्लीं सुमारें पांचशें मलांची आपली रेल्वे स्टेट स्वतःच्या देखरेखीखालीं चालवितें.

येथपर्यंत आपण महाराजांनीं केलेल्या मुख्य मुख्य सुधारणांकडे थोडक्यांत बघितलें. या खेरीज महाराजांनीं जेल, हिशेबी खातें, सरकारी उत्पन्नाचें खातें या सर्वांतहि महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या.

आहेत. महाराजांच्या पन्नास–पंचावन्न वर्षांच्या कारकीर्दीकडे, या सुधारणा नजरेसमोर ठेवून बघितलें असतां, ती किती उज्वल आहे हें चटकन् पटतें. महाराजांनीं राज्यसूत्रें हातीं घेण्यापूर्वीं जिकडे तिकडे रामराज्य म्हणजे अव्यवस्था, गबाळपणा होता. गायकवाडी किंवा बाबाशाही हा शब्द बडोद्यांत अव्यवस्थेकरितां किंवा गबाळपणाकरितां अजूनहि वापरतात. ‘ सारा बाबाशाही कारभार ’ याचा अर्थ सारा गोंधळ, कशास कांहीं पत्ता नाहीं असा घ्यावयाचा. साताचें आमंत्रण आलें असल्यास नवाला गेलें तरी कांहीं फारशी उशिरां आल्याची जाणीव भासत नाहीं; अशा सर्व वागणुकीच्या प्रकारांना समुच्चयानें बाबाशाही म्हणण्याचा रिवाज आहे. जुन्या वेळच्या सरकारी कचेऱ्यांतून हें बाबा-शाहीचें स्वरूप उत्कृष्टपणें दिसे. कचेरीचा वेळ साडेअकरा असला तर कारकूनसाहेबच मुखीं विडा चघळत व पोटावरून हात फिरवीत बारा वाजतां यावयाचे! मग मुख्य अधिकारी खुशाल घरीं वामकुक्षी करून दुपारच्या चहाला कचेरींत येत असल्यास काय नवल! ही पद्धति महाराजांनीं सारी बदलली. पुष्कळ वेळां महाराज स्वतःच कोठी कचेरीच्या तिथें हातांत घड्याळ घेऊन साडे अकराला उभे राहात व येणाऱ्या अधिकाऱ्याला तो उशीरां आला असल्यास तें दाखवीत. याचा परिणाम आतां इतका झाला आहे कीं, बडोद्यांतील कचेऱ्या ब्रिटिश मुलखांतील कचेऱ्यांप्रमाणेंच अगदीं व्यवस्थित बनल्या आहेत. जुन्यावेळेला कारकुनांना व अधिकाऱ्यांना गादी तक्क्याशीं बसून कामें करावीं लागत. त्यामुळें एक छान सोय होती. कंटाळा आला असल्यास घरीं न जातां जागच्या जागींच विश्रांति घ्यायला सांपडते! एकदां महाराज एका कचेरींत गेले असतांना त्यांनीं बऱ्याच जणांना अशा स्थितींत बघितलें म्हणतात! तेव्हांपासून त्यांनीं सर्व कचेऱ्यांत टेबल खुर्च्यांची व्यवस्था केली. खुर्चीवर बसल्यानें झोंप येऊं शकत नाहीं

व आटोपशीरपणा कचेरींत दिसतो. अशा तऱ्हेनें जिथें पूर्वी अव्यवस्था, गबाळपणा होता, तिथें महाराजांनीं सुव्यवस्था, नियमीतपणा सुरू केला. नोकरांच्या वागणुकीसंबंधानें नियम तयार केले व त्या नियमांप्रमाणें सर्वांना वागायला भाग पाडलें. याचें मुख्य कारण स्वतः महाराजानांच शिस्त, नियमितपणा, व्यवस्थितपणा यांची फार फार आवड आहे. ते स्वतः अत्यंत उद्योगी आहेत; आणि आपल्या प्रजेनेंहि उद्योगी व्हावे म्हणून त्यांनीं बडोदें संस्थानांत इतक्या विविध सुधारणा घडवून आणल्या आहेत. बडोद्याच्या भावी इतिहासकाराला अभिमानानें आणि गौरवानें निर्देश करावासा वाटेल, अशाच श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या सुधारणा आहेत यांत शंका नाहीं.

---

## प्रकरण दहावें

# आवडीनिवडी व स्वभाव

बडोदा कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवाचा तो प्रसंग होता. संध्याकाळीं चारापासून समारंभाला सुरवात व्हावयाची होती. सभास्थानीं निमंत्रित पाहुणे व विद्यार्थीबंधु तटस्थ होऊन अर्धवट आपल्या घड्याळांकडे, अर्धवट कॉलेजच्या पोर्चकडे, पाहात होते. इतक्यांत जवळच्या टॉवरमधील चाराचे ठोके मंडळींच्या कानावर आदळले, आणि त्यांनीं पोर्चकडे पाहिलें तों महाराजांची मोटार हजर. त्यांच्या स्वागतार्थ कांहीं बडी मंडळी तिथें हजरच होती. महाराज सुहास्यवदनानें बाहेर आले, आणि त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हंसत हंसत हात वर करून त्यांनीं सर्वांचें अभिवादन स्वीकारलें. नेहमीप्रमाणेंच त्यांचा पोशाख अगदीं साधा होता. 'पांढऱ्या शुभ्र विजारीवर पांढरा शुभ्र आंगरखा, डोक्यावर गायकवाडी पगडी, पायांत काळे मोजे व काळे जोडे, आणि हातांत एक काठी.

पोशाखाच्या बाबतींत महाराजांना साधेपणाच जास्त प्रिय आहे. लहानपणीं कांहीं दिवस जुन्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं मखमल, साटीण वगैरेचे कपडे घातले असतील. पण अलीकडे बरींच वर्षें ते अगदीं साधाच व व्यवस्थित पोशाख करतात. साधेपणा त्यांना जितका प्रिय आहे, तितकीच अस्वच्छता त्यांना अप्रिय आहे. कपड्यावर एकहि

डाग किंवा एकहि सुरकुती पडलेली त्यांना चालत नाहीं. अगदीं स्वच्छ, पांढरे शुभ्र कपडे त्यांना आवडतात.

पोशाखाच्या एका बाबतींत त्यांचा स्वभाव चोखंदळ म्हणतां येईल. प्रत्येकानें आपापल्या जातीचा जो शिष्टसंमत पोशाख असेल तो करावा, याविषयीं त्यांचा आग्रह असतो. दरबार प्रसंगीं सर्वांनीं विशिष्ट प्रकारचा पोषाख केलाच पाहिजे, असें बडोद्यांत ठरलें आहे. संपूर्ण दरबारी किंवा मामुली दरबारी असे त्याचे दोन प्रकार ठरले असून त्याचप्रमाणें त्या त्या प्रसंगीं सर्वांचा पोशाख असावयाला पाहिजे. महाराजांना भेटावयाला जावयाचें असेल तेव्हां देखील अमुक पोशाख तुमचा असावयालाच पाहिजे. एकदां एक ऑफिसर महाराजांना स्टेशनावर भेटावयला गेले. ते बुटेड–सुटेड म्हणतात तसे होते. महाराजांना पाहून त्यांनीं आपली हॅट उंच केली. लगेच महाराजांनीं त्यांना हटकलें, " महाराजांची भेट कोणत्या पोशाखांत घ्यावी हें तुम्हाला कळावयाला पाहिजे होतें " असें महाराज म्हणाले. बिचारे अधिकारी अगदीं जिरून गेले. देशी पोशाखावर महाराजांचा विशेष कटाक्ष आहे. प्रत्येकानें देशी पोशाख करावा, जो आपला शिष्टसंमत पोषाख असेल तो करावा, असें महाराजांना वाटतें. युरोपियन पोशाख कचेरींत केला तरी चालतो, पण एरवीं सर्व ठिकाणीं आपल्या अधिकाऱ्यांनीं व नोकरांनीं देशीच पोशाख केलेला महाराजांना आवडतो.

पोशाखासंबंधानें ज्याप्रमाणें महाराजांच्या कल्पना दृढ आहेत त्याचप्रमाणें शिस्तीसंबंधानें प्रत्येकानें व्यवस्थित, आखबंद असावें, कोणीहि गबाळपणानें वागूं नये, असें महाराजांना वाटतें. प्रत्येकानें ठराविक काम, ठराविक मुदतींत, ठराविक वेळेला व ठराविक पद्धतीनें केलेंच पाहिजे, अशी त्यांची सक्त ताकीद आहे. वेळेची त्यांना फार मोठी किंमत वाटते. स्वतः त्यांचें आचरण अत्यंत शिस्तीचें आहे. घड्याळा-

प्रमाणें व्यवस्थित व बिनचूक वागण्याची त्यांना संवय लागली आहे. एखादें यंत्र जितक्या ठराविकपणानें आपलें काम करतें, तितक्याच ठराविकपणानें महाराजहि आपलें रोजचें ठरलेलें काम करीत असतात. आणि म्हणूनच आज त्यांच्या वयाला सत्तर वर्षें पुरीं झालीं आहेत तरी देखील ते आपला व्यवस्थितपणा व वक्तशीरपणा सोडीत नाहींत.

ज्याला इंग्रजींत System म्हणतात ती महाराजांना फार फार प्रिय आहे. स्वत: महाराज म्हणजे त्या System चें मूर्तिमंत उदाहरणच होय. प्रत्येक गोष्ट करतांना विशिष्ट पद्धतीनें ( System ) ती करावी, असें महाराजांना वाटतें. ज्या कामांत पद्धत नाहीं तें काम चांगलें होणें शक्य नाहीं; जर आपणाला आपलें काम चांगलें व लवकर व्हावेंसें वाटत असेल तर तें पद्धतीनें व व्यवस्थितपणें आपण केलें पाहिजे. महाराजांनीं जेवढ्या सुधारणा केल्या तेवढ्या सर्व त्यांनीं हें सिस्टिमचें तत्त्व डोळ्यासमोर ठेवून केल्या.

ह्या System किंवा पद्धतीच्या अनुषंगानें दुसरी एक गोष्ट महाराजांना आवडते ती म्हणजे वर्गवारीची किंवा ज्याला इंग्रजींत Classification म्हणतात ती होय. प्रत्येक गोष्टीचे भाग पाडावयाचे, प्रत्येक कामाची वर्गवारी ठरवावयाची. आस्फाल्टचे रस्ते करावयाचे त्यांच्या मनांत आल्यावर ते तज्ज्ञांना बोलावून किती प्रकारचे आस्फाल्टचे रस्ते असतात, त्या निरनिराळ्या प्रकारांचें वर्णन, त्यांना येणारा खर्च, त्यापैकीं प्रत्येक प्रकार किती दिवस चालूं शकतो, त्या प्रत्येक प्रकारांत तोटे किंवा फायदे काय असें विचारतील.

वर्गवारी कण्याची किंवा गट पाडण्याची जशी त्यांना आवड तशीच पृथक्करणाची. प्रत्येक प्रश्नाचें तें पृथक्करण करतील. त्यांतील साधक गोष्टी कोणत्या व बाधक कोणत्या त्या अगोदर मनांत वागवतील. समजा प्राथमिक शिक्षण त्यांना सक्तीचें करावयाचें आहे तर ते

सक्तीच्या शिक्षणापासून होणाऱ्या फायद्याशीं, त्याच्यापासून होणाऱ्या तोट्यांची तुलना करतील. सक्तीच्या शिक्षणाला किती लोक कसा विरोध करतील, हेंहि ते मनांत अंदाजून ठेवतील. आणि त्या प्रश्नाचा मनांतल्या मनांत विवेक केल्यावर ते मग अगदीं निडरपणें, बेधडकपणें, आपली योजना अमलांत आणतील.

उर्दुमिश्र हिंदी ही राज्यभाषा करावयाचें सध्यां त्यांच्या मनांत घोळत आहे. आज अनेक वर्षे हा विचार मनांत ते वागवीत आले आहेत. हिंदुस्तानांत सर्वसामान्य व राज्यमान्य अशी जर कोणती भाषा होऊं शकेल तर ती हिंदी होय ! याविषयीं त्यांची पूर्ण खात्री आहे. कितीतरी वर्षांपासून प्राथमिक शाळांतून बडोद्यांत हिंदी शिकविलें जातें. पण आतां भावी संयुक्त राज्यघटनेंत हिंदीलाच ज्यास्त महत्त्व येणार व यावें असें त्यांना वाटत असल्यामुळें बडोद्यांत राज्यव्यवहाराची भाषा हिंदी करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. ही गोष्ट कदाचित १९३५ सालापासून अंमलांत येईल. पण त्याच्यापूर्वी त्यांनीं याविषयीं घोषणा करून लोकमत अजमाविण्यास सुरवात केली आहे. लोक काय म्हणतील याचा अंदाज त्यांना पूर्वीपासून होता व आहे. म्हणून लोकांची टीका ऐकून ते गलित धैर्य झाले नाहींत. उलट सर्व टीका ऐकून त्यांनीं लोकांना आपलें म्हणणें पटवून दिलें.

पण हा देखील त्यांच्या स्वभावाचा विशेषच आहे. प्रत्येक गोष्ट ते शांतचित्तानें ऐकून घेतात. बडोद्यांत जेवढें उच्चारांच्या बाबतींत स्वातंत्र्य आहे तेवढें हिंदुस्तानांत अन्यत्र नसेल. लोकांनीं टीका करावी, योग्य वाटल्यास प्रखर टीका करावी, पण सदभिरुचीच्या मर्यादा मात्र सोडूं नयेत, असें त्यांना वाटतें. महाराजांच्या वागण्याबद्दल, ज्यांचा टीका करणें हाच केवळ स्वभाव, असे लोक नेहमीं टीका करितात. पण महाराज त्या टीकेनें कधींहि रागवत नाहींत. उलट

टीकाकाराची टीका योग्य वाटल्यास ते आपल्या वर्तनांत फरक करतात. प्रामाणिक मतभेद हे असावयाचेच. मतभेदांनीं आपण गांगरून जाऊं नये. उलट आपली बाजू पुनः नीट तपासून कार्यप्रवृत्त व्हावें, असें महाराज नेहमीं म्हणतात. आपली प्रजा मतभेद प्रदर्शित करूं लागलेली पाहून त्यांना आनंद व अभिमानच वाटतो. आपण दिलेल्या शिक्षणानें आपली प्रजा विचार करूं लागली, तिला आपल्या हक्कांची जाणीव झाली, वाईट चांगलें तिला कळूं लागलें हें पाहून महाराजांना मनापासून बरें वाटतें.

महाराजांच्या ठिकाणीं न्यायबुद्धि इतकी प्रखर आहे कीं, जे नियम इतरांना तेच ते स्वतःला देखील कसोशीनें लावतात. सर्वांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें पण न्यायबुद्धीनें वागवावयाचें असें त्यांनीं राज्यसूत्रें हातीं घेतल्यापासून ठरविलें आहे. आपल्या हांतून एखादा प्रमाद घडल्यास ते दिलगिरी प्रदर्शित केल्याखेरीज कधींहि राहावयाचे नाहींत. उलट दुसऱ्या कोणी कांहीं चूक केल्यास त्यालाहि तिथल्या तिथें चापल्याखेरीज राहावयाचे नाहींत.

न्यायबुद्धि आणि विशिष्ट नातें यांचा ते कधींहि घोंटाळा करीत नाहींत. एखादा त्यांचा मित्र असेल आणि त्याच्या हातून कांहीं चूक घडली असेल, तर त्या चुकीबद्दल त्याला रागें भरतील किंवा दंडहि करतील. पण त्याची मैत्री विसरणार नाहींत. त्यांच्या अधिकाऱ्यांशीं देखील त्यांची अशीच वागणूक असते. एखाद्या नोकराच्या हातून कांहीं आगळीक घडल्यास ते त्याला तेवढ्यापुरता दंड करतील. पण मागाहून मनांत कांहीं बाळगणार नाहींत. त्यांची वृत्ति न्यायाधीशाची आहे, सर्पाची नाहीं. साप मनांत दावा धरतो असें म्हणतात. न्यायाधीश हा मनांत कुठलीहि भावना बाळगत नाहीं. ज्या वेळीं जसा गुन्हा घडेल त्या वेळीं योग्य ती शिक्षाच तो करील. मागाहून गुन्हे-

गारांबद्दल त्यांच्या मनांत अप्रिती उरणार नाहीं. “ झालेल्या अपराधाबद्दल मी शिक्षा केली. आतां त्या मनुष्याशीं पूर्वीप्रमाणेंच वागावयाला हरकत नाहीं” असें, जसें एखादा न्यायाधीश म्हणेल त्याचप्रमाणें महाराजहि म्हणतात. त्यांच्या या स्वभावामुळें कांहीं लोक स्वत:चा गैरसमज करून घेऊन महाराजांवर लबाडीचा आरोप करितात. पण ही खरोखर वस्तुस्थिति नाहीं. त्यांच्या ठिकाणीं दयेचा जेवढा अंश आहे त्यापेक्षां न्यायबुद्धि थोडी ज्यास्तच असल्यानें ते अपराध्याला शिक्षा केल्याखेरीज कधींच रहात नाहींत.

भूतदया महाराजांच्या ठिकाणीं फार मोठ्या प्रमाणांत खरोखर वसत आहे. ते जुन्या पद्धतीचा दानधर्म करीत नाहींत म्हणून, कांहीं भोळे भाबडे जीव त्यांना दयाहीन समजतात. पण तसें वास्तविक नाहीं. अगदीं हलक्या जातीपासून तों थेट उच्च जातीपर्यंत, ते सर्वांना सारखेंच शिक्षण देतात यांत त्यांची दयाबुद्धीच दिसून येते. जंगली जाती व अंत्यज यांच्याकरितां त्यांनीं मोफत वसतिगृह—शाळा उघडल्या आहेत. यांत त्यांची दयाबुद्धि दिसते कीं आणखी कांहीं ? त्याचप्रमाणें बडोदें संस्थानांत गोरगरिबांच्या औषधपाण्याची महाराजांनीं जी उत्कृष्ट सोय केली आहे, त्यांत तरी दयाबुद्धीखेरीज दुसरें काय दिसतें ? महाराजांच्या ठिकाणीं असलेल्या दयाबुद्धीचें आणखी उदाहरण त्यांचीं आपल्या नोकरांना दिली जाणारी वागणूक. बडोदें संस्थानांत एखाद्या मनुष्यानें अगदीं अक्षम्य अपराध केला असल्याखेरीज त्याला आपली नोकरी घालविण्याचा कधींहि प्रसंग येत नाहीं. सकाळीं सौभाग्यवती आणि संध्याकाळीं गंगाभागीरथी अशी स्थिति बडोद्यांत कधीं घडतच नाहीं. आणि यामुळेंच बडोद्यांत सरकारी नोकरी करावयाला लोक राजी असतात. महाराजांच्या ठिकाणीं असलेल्या न्यायबुद्धि व दयाबुद्धि यामुळें सर्वच लोकांना आपल्या वित्ताविषयीं व अब्रूविषयीं विश्वास वाटतो.

महाराजांचें खासगी आयुष्य अगदीं गंगोदकाप्रमाणें पवित्र आहे. त्यांना कोणतेंहि व्यसन नाहीं. लहानपणीं व तरुणपणीं त्यांच्या भोंवतीं बायकांचा जमाव खूब असे. मल्हाररावशाहींत जे प्रकार चालू होते, तेच पुन: सुरू करण्याचा कांहीं लोकांचा इरादा होता. पण महाराजांचा आपल्या मनावरील ताबा इतका विलक्षण कीं, ते कोणत्याहि प्रकारच्या मोहपाशांत गुंतले नाहींत. आणि हळुहळू त्यांनीं आपल्या भोंवतालच्या, बायकांचें व हलक्या लोकांचें प्रस्थ कमी केलें.

महाराजांच्या आहारांत मांसाहार व वनस्पति—आहार असे दोन्ही प्रकार आहेत. मांसाहाराचें सेवन ते फार थोडें व बेतानें करतात. मनुष्याला स्वत:चा तरतरीतपणा कायम ठेवावयाचा असेल तर त्यानें मांस थोडें खावें, असें महाराजांचें मत आहे. महाराजांच्या जेवणांतील एक मौज आहे. पंचपक्वान्नांचें जेवण जरी त्यांच्या सुवर्णाच्या पात्रांत असलें तरी देखील तिथेंच तुम्हांला बाजरीची भाकरी आढळेल. महाराजांना बाजरीची भाकरी आवडते म्हणून ते ती खातात कीं, आपल्या लहानपणची व गरिबीची आपणाला स्मृति रहावी म्हणून ते खातात हें आम्हांला माहीत नाहीं. नियमीत आहार व नियमीत विहार हें तत्त्व महाराजांना पसंत आहे.

महाराज चालणारेही मोठे विलक्षण आहेत. ते फार झपाझप पावलें टाकीत चालतात. त्यांच्याबरोबर फार थोडी मंडळी चालूं शकतात. आतां वृद्धापकाळामुळें त्यांचा चालण्याचा व्यायाम थोडा कमी झाला आहे. पण पूर्वीं ते पांच सहा मैल एकाच वेळीं जोरानें चालून जात.

महाराजांच्या ठिकाणीं ज्याला दुर्गुण म्हणतां येतील असें नाहींतच, पण एकदोन गोष्टींत सद्गुणांचा अतिरेक त्यांच्या ठिकाणीं दोषासारखा वाटतो. व्यवस्थित, पद्धतशीर काम करण्याची त्यांना संवय आहे हें मागेंच सांगितलें; पण या सद्गुणाचा त्यांच्या ठिकाणीं अतिरेक पाहावयाला

सांपडतो. प्रत्येक गोष्टीची शहानिशा, प्रत्येक प्रश्नाचा केंसनकेंस मोकळा करण्याची त्यांना संवय जडल्यामुळें स्वत: त्यांना व आजूबाजूच्या लोकांना अकारण फार श्रम होतात. आणि पुष्कळ वेळां हें श्रम वायां जातात. एकदां असें सांगतात कीं, महाराजांनीं कांहीं गृहस्थांना एका विषयांवर भाषण तयार करावयाला सांगितलें. तें भाषण ७५ पानांचें होतें; व तें मराठींत होतें. त्याचें महाराजांनीं इंग्रजी भाषांतर तयार करविलें. पुढें मुळांतल्या भाषणाचा संक्षेप करण्यांत आला. त्या संक्षेपाचें पुन: इंग्रजी भाषांतर झालें. आणि नंतर त्या संक्षिप्त भाषणांत महाराजांनीं अनुक्रमणिका, विषयसूचि, विषयाची वर्गवारी वगैरे करून घेतली; असें करण्यांत कितीतरी जणांची मेहेनत फुकट गेली असेल !

गुणांचा अतिरेक होऊन बनलेला दुसरा त्यांच्या ठिकाणचा दोष म्हणजे, त्यांचा गंभीरपणा नेहमीं कांहीं तरी शिकवावेसें व शिकावेसें त्यांना वाटतें. जो कोणी श्रोता भेटेल त्याला महाराज उपदेशामृताचें पान करावयाला लावतात. एकदां व्याख्यानाच्या रंगांत ते आले म्हणजे असेल नसेल तेवढें सारें सांगून टाकतात. त्यामुळें त्यांची पुष्कळशीं भाषणें फोनोग्राफच्या रेकार्ड्ससारखीं कंटाळवाणी वाटतात.

पण या कांहीं अत्यंत क्षुल्लक दोषांखेरीज आमच्या महाराजांच्या ठिकाणीं दुर्गुण म्हणून नाहीं, हें सांगावयाला आम्हांला अभिमान वाटतो. ते खरोखरीच एक सज्जन गृहस्थ आहेत. त्यांची वागण्या—बोलण्याची पद्धत आकर्षक, रम्य व सुसंस्कृत आहे. त्यांच्याशीं संभाषण करण्याचा ज्यांना ज्यांना प्रसंग आला असेल ते ते स्वत:ला धन्य समजतील, अशीच त्यांची बोलण्याची तऱ्हा परिणामकारक आहे. त्यांच्या बोलण्यांत प्रेमळपणा, कळकळ, ठसकेबाजपणा ओतप्रोत भरलेला

असतो. हंसत हंसत ते तुमच्याशीं संभाषण करतील, तुम्हांला बोलावयाला ते फुरसदहि देणार नाहींत, तुम्हांला प्रश्न विचार–विचारून ते छेडतील, आणि एखादी गंमतीदार कोटी करून ते तुमचा निरोप घेतील.

कामाचा त्यांच्यामागें इतका व्याप असूनहि ते तुम्हांला कधीं कंटाळलेले दिसणार नाहींत. एखादें रुक्ष विषयावरचें रुक्ष व्याख्यान ऐकून तुम्हीं कंटाळून जाल, पण महाराज तें लक्ष लावून ऐकत आहेत असें तुम्हांला आढळेल.

ते क्वचित्‌च रागावतात. आणि रागावले तरी आपला सज्जनपणा सोडीत नाहींत. रागावले कीं, ते बोलेनासे होतात किंवा बोलले तर अधिकाराच्या स्वरांत बोलतात. स्पष्टवक्तेपणा आणि सत्य हीं त्यांना अत्यंत प्रिय आहेत. तुमच्या ठिकाणीं असलेलें शौर्य आणि सत्यप्रीति हीं त्यांच्या नजरेस आलीं कीं, ते तुम्हांला नेहमीं आपलेपणाच्या भावनेनें नांदवतील. गुणांची पारख त्यांना चांगली आहे, पण त्याच्याच बरोबर अवगुणांची पारख तर त्यांना फारच चटकन् होते.

थोडक्यांत त्यांच्याविषयीं सांगावयाचें म्हणजे सयाजीराव महाराज सज्जन आहेत, सयाजीराव महाराज थोर आहेत, आणि सयाजीराव महाराज ज्ञानी व गुणग्राही आहेत.

## प्रकरण अकरावें

# आठवणी व आख्यायिका

महाराज त्यावेळीं लहान होते. म्हणजे बारा वर्षांचे नुकतेच ते बडोद्याला आलेले. त्यांच्याबरोबर त्यांचे वडील श्रीमंत काशीराव गायकवाडहि होतेच. दत्तकविधान संपल्यावर रेसिडेंट सर रीचर्ड मीड यांनीं त्यांना गादीवर बसविलें. त्यावेळीं साध्या गोपाळरावाचे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड बनले. सर्वांचे मुजरे करणें सुरू झालें. त्यांत पहिला मुजरा श्रीमंत काशीराव गायकवाड यांचा होता. महाराजांना त्यावेळीं वाईट वाटलें. पण त्याच्याहिपेक्षां आपल्या वडिलांविषयीं त्यांचा पूर्वीचा आदर व अभिमान दुणावला. "त्यावेळीं मला कळलें कीं, माझ्यावर कांहीं तरी जबाबदारी येऊन पडली आहे" असें महाराज म्हणतात.

× × × ×

महाराज सर्वांशीं इतक्या प्रेमळपणानें आणि सौजन्यानें वागतात कीं, जो जो त्यांच्या सहवासांत येईल त्याला त्याला असें वाटतें कीं, महाराज आपल्यावर खूष आहेत, आपण सांगूं तें तें ते करतील ! एकदां एका लेखकाला असेंच वाटलें म्हणून त्यानें आपलीं सर्व नाटकें आपल्या सर्व कादंबऱ्या, आपल्या सर्व लघुकथा खाकोटीला मारल्या आणि तो महाराजांना दिपवविण्याकरितां गेला. बाहेरच सेक्रेटरी उभे होते. त्यांनीं तें सारें वाङ्मय ठेवून घेतलें, आणि पुस्तकें पावल्याची पोंच दिली.

× × × ×

मैत्री आणि न्याय यांची सळमेसळ महाराज कधीं करीत नाहींत. एकदां एक वडे अधिकारी कांहीं काम करण्यांत घोडचूक करून बसले होते; महाराजांनीं त्यांच्या घरीं बदलीचा हुकूम पाठविला होता; व त्यांना बोलावणेंहि पाठविलें. महाराजांचे ते स्नेही होते, महाराज संध्याकाळीं दोन तास त्यांच्याबरोबर बगींत बसून हिंडले व त्यांच्याशीं प्रेमानें बोलले चालले. महाराजांची आपल्यावर पूर्वीसारखीच कृपा आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं घरीं जाऊन पाहिलें तों बदलीचा हुकूम येऊन पडलेला !

× × × ×

दुसरे एक अधिकारी होते व अजूनहि आहेत. त्यावेळीं ते छोटे अधिकारी होते. लश्करांतील कामाबद्दल त्यांच्या विरुद्ध काहीं तक्रार होती. महाराजांनीं त्यांना बोलाविलें. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यालाहि बोलाविलें. छोटे अधिकारी तरुण व स्पष्टवक्ते होते. त्यांना कांहीं सांगावयाचें होतें. पण वडे अधिकारी समोर बसले असतांना त्यांना सांगण्याचें धैर्य होईना. ते आपली डायरी अर्धवट वाहेर काढीत पुन: खिशांत ठेवीत. महाराजांच्या हें लक्षांत आलें. ते त्या छोट्या अधिकाऱ्याला उद्देशून म्हणाले, "So long as you tell truth and make no false allegations, no harm will be done to you." पुढें त्या तरुण अधिकाऱ्यानें आपणाला काय सांगावयाचें होतें तें सांगितलें. महाराजांना त्याचें म्हणणें फारसें पटलें नाहीं. पण त्याचें धैर्य व स्पष्टवक्तेपणा महाराजांना आवडला. त्यांनीं त्याला आपल्या खास नोकरींत तावडतोब घेतलें.

× × × ×

महाराजांच्या ठिकाणीं प्रेम किंवा कोमल भावना नाहींत असें कांहीं लोक म्हणतात. पण आम्हांला तसें वाटत नाहीं. ते आपल्या

प्रेमाचा नाटकी आविर्भाव करीत नाहींत हें मात्र खरें. एकदां महाराज, राजपुत्र धैर्यशीलराव व इतर अधिकारी दौडीकरितां गेले होते. महाराज पुढें निघून आले. पण मागें धैर्यशीलरावांच्या घोड्यानें उसळी मारून त्यांना जमिनीवर पाडलें. धैर्यशीलरावांना थोडी इजा झाली. ते पडल्याची बातमी महाराजांना मिळतांच त्यांच्यानें राजमहालांत राहवेना. ते तसेच पुन: घोड्यावर बसले आणि आपल्या मुलाला पाहून आले.

राणीसाहेब आजारी असल्या कीं महाराजांचें मन असेंच अस्वस्थ बनतें. ते तीनतीनदां आजाराची चौकशी स्वत: येऊन करतात किंवा दुसऱ्याकडूनहि करवितात.

× × × ×

एकदां स्वत:ला शहाणे समजणारे एक गृहस्थ महाराजांना कांहीं शिकविण्याच्या हेतूनें बडोद्यास आले. ते म्हणाले, "आपण मराठे आहांत. आपण मराठ्यांकरितां कांहीं केलेंच पाहिजे. आपला जन्म मराठ्यांच्या कुलांत झाला आहे." महाराज म्हणाले, "मी सर्वांना सारखे लेखतों. मराठ्यांना किंवा इतर कांहीं जातींना मी सवलती दिल्या आहेत त्या एवढ्याकरितां कीं, त्यांनीं शिकून इतर जातींच्या बरोबरीला यावें. यापेक्षां मला ज्यास्त कांहीं करतां येत नाहीं." त्यावर ते गृहस्थ म्हणाले, "आपण एखादी Policy, आपलें मत कां प्रसिद्ध करीत नाहीं!" तें ऐकून महाराज म्हणाले, "माझी Policy अशी कीं, आपल्यासारखे लोक आमच्याकडे जितके कमी येतील तितकें बरें." हें उत्तर ऐकून त्या गृहस्थांचें काय झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी.

× × × ×

मागें बडोद्यांत एका पोलिस अधिकाऱ्यानें महाराजांच्या पश्चात् कांहीं अनन्वित प्रकार केले होते. त्यामुळें लोक फार नाराज होते.

महाराज बडोद्यांत आल्यावर एका वृत्तपत्रानें यासंबंधीं सरकारला जाब विचारला होता. ज्या वर्तमानपत्रांत हा मजकूर आला होता तें विकत फिरणारीं पोरें मोठमोठ्यानें ओरडत चाललीं होतीं कीं, "राज्य सयाजीरावनुं के शंखपालनुं ?" महाराजांची मोटार जात असलेली पाहून मुलांनीं ज्यास्तच जोरानें ओरडावयाला सुरवात केली. त्यावर महाराजांनीं आपली मोटार थांबवावयाला सांगून तें वर्तमानपत्र विकत घेतलें. पुढें त्या पोलिस अधिकाऱ्याला योग्य ती शिक्षा झाली.

× × × ×

महाराज दोन वर्षांमागें पंचगणीहून महाबळेश्वराला चालले होते. वाटेंत श्री. पंडित यांचें हिंदु हायस्कूल लागलें. ते पाहण्याची महाराजांची इच्छा झाली. बरोबरचे ए. डी. सी. म्हणाले, " आपण त्यांना कळविल्यावांचून कशाला जावयाचें ? त्यांचें आमंत्रणहि नाहीं." त्यावर महाराज म्हणाले, " आमंत्रणें आपणाला नेहमींच येतात. आमंत्रण नसतांना शिक्षणसंस्था पहावयाला कोणती हरकत ? टोपी आणि सदरा चढवावयाला संस्थेंतील लोकांना किती वेळ लागणार ? तोंपर्यंत आपण थांबूं ?" नंतर महाराज हायस्कूलमध्यें गेले. त्यावेळीं पंडितांचीं सर्व मंडळी व मुलें जेवीत बसलीं होतीं. मराठे जातीचीं मुलें विजार घालून व शर्ट घालून बसलेलीं, गुजराती मुलें अर्ध्या चड्ड्या घालून बसलेलीं, व ब्राह्मणांचीं मुलें लंगोट्या नेसून बसलेलीं त्यांनीं पाहिलीं. तेव्हां ते मागाहून ए. डी. सी. नां म्हणाले, "असा भेदभाव नसावा. सर्वांनीं एकच प्रकारचे कपडे घालावयाला हवे. भेद दिसला कीं, उच्चनीच भाव सुरू होतो." शाळेंत मोठ्या पुरुषांच्या तसबिरी ऐवजीं मारुती, गणपती वगैरेंच्या तसबिरी होत्या. तेव्हां त्या संबंधानें मागाहून ते म्हणाले, " मुलांसमोर नेहमीं शिवाजी, मॅझिनी, बिसमार्क

अशांच्या तसबिरी असाव्या. अशा तसबिरी असल्या कीं, मुलें मी बिस्मार्क होईन, मी शिवाजी होईन, असें नेहमीं म्हणत राहातात.

× × × ×

मागें लढाईच्या वेळीं रिक्रुट भरती होत असतांना बडोद्यांतूनहि कांहीं व्हॉलंटियर्स तयार झाले होते. त्यावेळीं रिक्रुटभरतीच्या विरुद्ध गांवांतील लोकमत होतें. गांवांत मिलिटरीचे लोक फिरत असतांना कांहीं कारणांवरून गोष्टी बिघडल्या. आणि एकमेकांत थोडीशी बाचाबाची झाली. यामुळें गांवातले लोक चवताळले. त्यांचें एक शिष्टमंडळ महाराजांना भेटावयाला आलें. त्या शिष्टमंडळाची आणि महाराजांची भेट, मधल्या कांहीं अधिकाऱ्यांमुळें, लवकर होऊं शकली नाहीं. त्यामुळें ते लोक ज्यास्तच चिडले. पुढें भेट झाली. तेव्हां महाराजांनीं अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. तें पाहून शिष्टमंडळांतील लोक शिष्ट बनले आणि म्हणाले " महाराज, आम्हांला हिंदु–राजा किती प्रिय आहे! मागें मल्हाररावांच्या वेळेला आम्हीं आमचा राजा द्या! आम्हांला हिंदु राजा हवा असें म्हणालों. त्यावरून आपल्यावर आमचें किती प्रेम आहे हें दिसेल. पण....पण!" असें करून त्यांनीं सर्व सांगितलें. त्यावर महाराजांनीं मोठें छान उत्तर दिलें, " मी आज तुमचा राजा आहें. त्याच्या ऐवजीं दुसराहि कोणी आला असता. पण कोणाला तरी शांतता आणि सुव्यवस्था राखण्याकरितां नेमावेंच लागलें असतें. अधिकारीहि माझेच आहेत. आणि माझी प्रजाहि माझीच आहे; तेव्हां या बाबतींत न्यायकोर्टांत जो निकाल होईल तोच आपण मानावा अशी मला आशा आहे."

× × × ×

अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर हे बडोदें सरकाराकडून मिळत असलेल्या पैशावर शिकून आले. आणि असें असून ते आपणाला

कोणींहि मदत केली नाहीं, असें पुष्कळ वेळां म्हणतात; त्यावर कांहीं मंडळी स्वाभाविकपणें त्यांच्यावर नाराज आहेत. पण स्वत: महाराज त्यांच्यावर नाखुष तितकेसे नाहींत. परवां जातीभेद मोडण्यासंबंधानें डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यांत पत्रव्यवहार सुरू होता. त्या-वेळीं डॉक्टरसाहेबांनीं आपली बाजू फार कसोशीनें आणि भक्कमपणें पुढें मांडली होती. महाराज त्या वेळीं दिल्हीस होते. तो पत्रव्यवहार पाहून महाराज म्हणाले, "माझे पैसे फुकट गेले असें मला वाटत नाहीं. डॉक्टर आंबेडकरांना आपल्या हक्कांची जाणीव झाली यांतच माझ्या पैशाचें चीज झालें. लोकांना शिक्षण द्यावयाचें तें एवढ्याच करितां."

# गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें

**कादंबऱ्याः—**

| | रु. आ. |
|---|---|
| १ सदाफुली | २—० |
| २ आसवांची माळ | १—० |
| ३ प्रतिभा | १—० |
| ४ युगांच्या सीमेवर | १—० |
| ५ पुष्कराज | ०—८ |
| ६ लक्षाधीश | ०—८ |
| ७ अटकेपार | २—८ |
| ८ सुकलेलें फूल | १—० |
| ९ फोल आशा | २—० |
| १० अजिंक्यतारा | १—८ |
| ११ शृंगेरीची लक्ष्मी | २—० |
| १२ कुठें ? | १—० |
| १३ मराठशाहीची ढाल | १—८ |
| १४ राक्षसी रणसंग्राम | १—० |
| १५ गौरीशंकर | १—८ |
| १६ हंबीरराव | ०—८ |
| १७ स्वराज्याचा श्रीगणेशा | २—४ |
| १८ स्वराज्याची घटना | २—४ |
| १९ स्वराज्याची स्थापना | २—४ |
| २० स्वराज्याचा कारभार | २—४ |
| २१ स्वराज्यावरील संकट | २—४ |
| २२ स्वराज्याचें परिवर्तन | २—४ |
| २३ स्वराज्यांतील दुफळी | २—४ |

**गोष्टीः—**

| | रु. आ. |
|---|---|
| ४२ ज्योती | १—४ |
| २५ बीरबलच्या गोष्टी | ०—४ |
| २६ ओंजळ | १—० |
| २७ दीपावली | १—० |
| २८ सुख-स्वप्नें | १—४ |
| २९ कळ्यांची माळ | १—० |
| ३० मानसपूजा | १—४ |

**नाटकें:—**

| | रु. आ. |
|---|---|
| ३१ मराठ्यांचा राजा | १—० |
| ३२ सुखाचा शोध | ०—१२ |
| ३३ संगीत भोळा शंकर | १—० |
| ३४ ,, श्रीमुखांत | ०—१० |
| ३५ ,, युगान्तर | ०—१० |
| ३६ ,, गुरुदक्षिणा | ०—१२ |
| ३७ ,, सैतानी संक्रान्त | १—० |
| ३८ ,, नवजीवन | ०—१० |

**काव्य ग्रंथः—**

| | रु. आ. |
|---|---|
| ३९ काव्य—सुधा | ०—१२ |
| ४० निर्झरिणी | १—० |
| ४१ गोमान्तक | २—० |
| ४२ माधवानुज | २—० |

( ३ )

मा. नं. 6839

# गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **धार्मिक, निबंध वगैरे:—** | रु. आ. | | | रु. आ. |
| ४३ भक्तिमणिमाला | १—८ | ५९ थालिपीठ | | १—८ |
| ४४ स्वामी रामतीर्थ, खंड १, | २—८ | ६० केळकरांचीं ६ नाटकें | | १—४ |
| ४५ ,, ,, ,, २, | २—८ | **चरित्रें:—** | | |
| ४६ ,, ,, ,, ३, | २—८ | ६१ राजवाडे | | ०—८ |
| ४७ ,, ,, ,, ४, | २—८ | ६२ आपटे | | ०—८ |
| ४८ विजापूर वर्णन | ०—८ | ६३ कार्ल मार्क्स | | ०—८ |
| ४९ आपली उपनयनसंस्था | ०—१२ | ६४ गोखले | | ०—८ |
| ५० परलोकचा प्रवास | १—० | ६५ गु. अण्णा कर्वे | | ०—८ |
| ५१ आनंदाचें साम्राज्य | १—४ | ६६ अकबर | | ०—८ |
| ५२ मरणोत्तरस्थिति, | | ६७ कमालपाशा | | ०—८ |
| आणि परलोकविद्या | २—० | ६८ डॉ. ॲनी बेझंट | | ०—८ |
| | | ६९ आगरकर | | ०—८ |
| ५३ मानवी कर्तव्यें | १—० | ७० श्रीमंत सयाजीराव महाराज | | ०—८ |
| ५४ निवडक लेख | २—८ | ७१ श्रीएकनाथ | | ०—१२ |
| ५५ ग्रेटब्रिटनची शासनपद्धति | ०—१० | ७२ महात्मा गांधी | | २—[illegible] |
| ५६ हिंदुत्व | १—० | ७३ निकोलाय लेनिन | | ०—१[illegible] |
| ५७ विनोदसागर, तरंग १ ला | १—० | ७४ जोसेफ मॅझिनी | | २—[illegible] |
| ५८ स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें | १—८ | ७५ वीर वैरागी | | १—[illegible] |

---

या शिवाय श्री. गोविंद सखराम सरदेसाई यांच्या मुसलमानी–मराठी–ब्रिटिश या रिसायती कंपनीकडे मिळतात.

## गणेश महादेव आणि कंपनीचें

# प्रचलित प्रकाशन

### यशवंत

संपूर्ण व भरपूर लघुकथा देणारें लोकप्रिय मासिक. **दर अंकास ८ आणे,** वार्षिक **आगाऊ ५ रु.** व्ही. पी. नें ५।⁄ रु.

### चार आणे माला

प्रत्येक पुस्तकांत गुप्त पोलिसाच्या चातुर्याची एक चटकदार संपूर्ण कादंबरी असते. प्रत्येकीं **किं. फक्त ४ आणे.**

### आठ आणे माला

मोठ्या आकाराचीं सुमारें १२५ पृष्ठांची एक मनोवेधक व रहस्यमय संपूर्ण कादंबरी प्रत्येक पुस्तकांत असते. प्रत्येकीं **किं. फक्त ८ आणे.**

### चरित्र माला

आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस आदर्शभूत अशा एका थोर व्यक्तीचें नामांकित लेखकानें लिहिलेलें सुमारें १२५ पृष्ठांचें प्रत्येक चरित्र **फक्त ८ आण्यास मिळतें.**

### सृष्टिज्ञान

तज्ञ विद्वानांनीं शास्त्रीय विषयांवरील शक्य तितक्या सोप्या भाषेंत चालविलेलें सचित्र मासिक **दर अंकास ४ आणे,** वार्षिक वर्गणी ट. ख. सह आगाऊ **३ रुपये,** व्ही. पी. नें **३। रु.**

**व्हीलर स्टॉलस, प्रमुख बुकसेलर्स व आमचे एजंटस् यांजकडे किरकोळ अंक मिळतील.**

**गणेश महादेव** आणि **कंपनी,** सदाशिव पेठ, **पुणें शहर**